म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. १५

# मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

संग्रहालय/ वाचनालय/ जिल्हा वाचनालय शाखा.

अनुक्रम नं. | विभाग निबंध | क्रमांक

पुस्तकाचें नांव केसरीतील निवडक निबंध

लेखक आगरकर

सूचना—पुस्तक आठ दिवसांवर ठेवूं नका. पुस्तकाची खराबी करूं नका

REFBK-0019153

१९९५३

# पुनरुद्वाह.

आज पुनरुद्वाह या विषयावर चार शब्द बोलण्याचें मीं योजिलें आहे. कोणी असा प्रश्न करील कीं, हा विषय श्रोत्यांस कांहीं नवीन नाहीं, यावर आज २० वर्षें एकसारखी चर्चा सुरू आहे, असें असतां उगाच पुनः पुनः तोच तोच विषय घेऊन त्याचें पिष्टपेषण करण्यांत अर्थ काय? तरी त्यावर माझें असें उत्तर आहे कीं, जरी आज २० वर्षें या विषयासंबंधानें बरीच भवति न भवति झाली आहे, तरी शास्त्रांत त्याबद्दल काय सांगितलें आहे, हें पुर्तेपणीं पाहून, ती झालेली असल्याचें दिसत नाहीं. पुण्यास श्रीसन्निध जी वाटाघाट झाली व तसेंच अलीकडे मद्रास, बंगाल या ठिकाणीं ज्या चर्चा झाल्या त्या पुनरुद्वाह शास्त्रसंमत आहे कीं नाहीं, याच मुद्यावर झाल्या खऱ्या; तथापि त्यांतही या विषयाचा निर्णय करितांना शास्त्रदृष्ट्या ज्या ज्या गोष्टींकडे लक्ष पोंचविलें पाहिजे, त्या सर्वांकडे तें यथायोग्य पोंचविण्यांत आलें होतें, असें वाटत नाहीं. केवळ लोकव्यवहारदृष्ट्याच या विषयाचें बरेंच विवेचन होऊन आज पुष्कळ वर्षें झालीं. हिंदुस्थान सरकारानेंही पुनरुद्वाह कायदेशीर ठरवून टाकिला आहे, व त्याचा प्रसारही होऊन बरींच वर्षें झालीं आहेत. परंतु आपले लोकांची समजूत, पुनरुद्वाह हा शास्त्रविरुद्ध आहे, अशी दृढ असल्या कारणानें अद्याप लोकांत त्या कायद्यापासून व्हावा तसा फायदा झालेला निदर्शनास येत नाहीं, ही मोठी शोचनीय गोष्ट आहे.

उपोद्घात.

अशी एक आख्यायिका आहे कीं, पेशवाईतील प्रसिद्ध **परशुरामपंत भाऊ पटवर्धन** यांच्या कन्येला फार अल्पवयांत जेव्हां वैधव्य प्राप्त झालें, तेव्हां त्या वेळच्या पुण्यांतील विद्वानांनीं तिचा पुनरुद्वाह करण्याविषयीं शास्त्राधार दाखवून, तसें करण्यास आपली संमति दिली. जर वरील पुणें वगैरे तीन ठिकाणच्या वादांत या विषयासंबंधानें शास्त्रदृष्ट्या ज्या ज्या गोष्टींचा विचार केला पाहिजे त्या सर्व गोष्टींचा विचार पूर्णपणें झाला असता, तर त्यांपैकीं एका वादांतील निर्णय तरी वरील आख्यायिकेशीं जु-

ळला असता, असें आह्मांस बहुतेक खात्रीनें वाटतें; कारण पेशवाईंतील विद्वानांचा निर्णय चुकीचा होता, आणि वरील वादांत झाले ते मात्र खरे, असें ह्मणण्यास कांहीं आधार नाहीं; कारण त्या वेळचे पंडित हल्लींच्या शास्त्रिमंडळीपेक्षां विद्वत्तेनें कमी होते, अशी कल्पनाही करणें हास्यास्पद होईल. बरें धर्मबंधन पाहूं गेलें तर तेंही पूर्वीपेक्षां हल्लींच शिथिल आहे; तेव्हां वरील वादांत शास्त्रदृष्ट्या सर्व गोष्टींचा विचार पुर्तेपणीं झाला नसावा, असें अनुमान करणें भाग पडतें. या आख्यायिकेशिवाय अलीकडेही उत्तर हिंदुस्थानांत एक दोन ठिकाणीं पुनरुद्वाह शास्त्रसंमत आहे, असा निर्णय झालेला माझ्या वाचण्यांत आलेला आहे; तेव्हां याप्रमाणें या विषयासंबंधीं ज्यापेक्षां भिन्न मतें पडलेलीं आहेत व अजून कोणताच पक्ष बहुमतानें स्वीकारिलेला नाहीं, त्यापेक्षां अजून या गोष्टीचा निर्णय होणें बाकी आहे, असें मला वाटतें. यासाठीं यासंबंधानें मीं जी माहिती मिळविली आहे तिजवरून मला कोणता निर्णय खरा दिसतो तो आपणांस कळवून, चूक असल्यास ती समजावून घ्यावी, एतदर्थ आजचा विषय, बराच जुना असताही, मीं हातीं धरिला आहे.

# नियोग व पुनरुद्वाह.

नियोग ह्मणजे काय व त्यांत व पुनरुद्वाहांत भेद कोणता.

प्रस्तुत विषयाचे विवेचनास आरंभ करण्याबरोबरच एक सर्वसाधारण गैरसमज दृष्टीस पडतो. त्याचें प्रथमतः निरसन करून टाकणें सोईचें होईल. यासाठीं आधीं तें करून नंतर प्रधानविषयास प्रारंभ करूं. हल्लीं बऱ्याच शास्त्रानभिज्ञ लोकांचा असा समज आहे कीं, पुनरुद्वाह हा एक नियोगाचा पोटभेद आहे आणि त्यामुळें कांहींचें असें ह्मणणें आहे कीं, प्राचीन कालीं जर आर्य लोकांमध्यें नियोगाची वहिवाट चालू होती, व त्यांस ती मान्य होती, तर आतां ती अमलांत आणण्यास प्रत्यवाय असूं नये. परंतु हें ह्मणणें चुकीचें आहे. शास्त्रदृष्ट्या पुनरुद्वाह व नियोग यांचा परस्पर बिलकुल संबंध नाहीं. नियोग ह्मणजे नियोजित अथवा नेमून दिलेल्या पुरुषाशीं ( पतिव्यतिरिक्त ) प्रजोत्पादनासाठीं स्त्रीचा संबंध. या संबंधाला पुनरुद्वाहाप्रमाणें दान व संस्कार हे विधी सांगितले नाहींत. पुनरुद्वाह करणाऱ्या ह्मणजे गतभर्तृकेशीं विवाह करणाऱ्या पुरुषाप्रमाणें नियोजित पुरुषाला भर्ता अथवा पति असें ह्मणत नाहींत. पुनरुद्वाहापासून गोत्रभेदादि परिणाम होतात; ते नियोगापासून होत नाहींत. पुनरुद्वाह चिरस्थायी आहे, पण नियोग वंशवर्धनासाठीं एक पुत्रप्राप्ति होईपर्यंत करावयाचा असून तो दीर अथवा सपिंड यांजपाशींच केला पाहिजे, अशी शास्त्राची आज्ञा दिसते. ( प० मनु अध्याय ९ श्लोक ५९ ते ६४ व ७० ). तसेंच कलिनिषिद्धधर्मामध्यें सुद्धां नियोग आणि पुनर्विवाह यांचा भेद दाखविलेला आढळतो. जसें 'स्त्रीणां पुनर्विवाहस्तु देवरात्पुत्रसंततिः' वगैरे; शिवाय मनूनें नियोगाचा विधि निंद्य मानिला आहे, व तो बहुतकरून साधुविगर्हित आहे. नियोगाचा हेतु केवळ पुत्रप्राप्तीच असल्यामुळें तो मृतभर्तृकेचाच होत असे असाही नियम नव्हता. ( प० आदिपर्व अ. १२२ श्लो० १५७ तसेंच याज्ञवल्क्य आचार. ६८।६९ ).

सारांश, कुटुंबांतील विधवेस पुन्हा लग्न करावें न लागतां, प्रजोत्पादन करितां यावें, हा नियोगाचा उद्देश होता; आणि बऱ्याच अंशीं अविभक्त कुटुंबांत विधवेचे जे हक्क आहेत, त्यांमधीलच तो असावा, असें दिसतें. तिला जसें कुटुंबांतील पुरुषांनीं अन्नवस्त्र व राहण्यास जागा देणें अवश्य आहे, तसें प्रजा करून देणेंही पूर्वकालीं अवश्य मानिलें असावें.

नियोगाचा उद्देश.

खरोखर पाहिलें ह्मणजे नियोगांत पूर्वीच्या कुटुंबनियमांचें स्वरूप दिसतें. यापेक्षां त्यापासून जास्त फलनिष्पत्ति नाहीं. पूर्वी कुटुंबांत जो कोणी मनुष्य मुख्य असे, तो कुटुंबसंबंधीं सर्व गोष्टींविषयीं मुखत्यार असल्यामुळें, व कुटुंबांतील इतर सर्व माणसांची सर्वतोप्रकारें मालकी व जबाबदारी हे दोन्ही अधिकार त्याजकडेच असल्यामुळें, व पुत्रप्राप्ति नाहीं, तर मरणानंतर सुद्धां इष्टलोकीं गति नाहीं, असा समज पूर्वी विशेष दृढ असल्यामुळें, कुटुंबांतील कोणा स्त्रीचा पति वारला ह्मणजे पुत्रप्राप्तीकरितां त्यानें तिला कोणातरी पुरुषाची योजना करून द्यावी, हें स्वाभाविक होत असें. आतां हा रिवाज पूर्वी आपणामध्यें होता ह्मणून हल्लीं असावा, असें ह्मणण्यांत कांहींच अर्थ नाहीं. फार प्राचीन कालीं इतर प्राण्यांप्रमाणें मनुष्येंसुद्धां नग्न असत ह्मणून आतांही आपण नग्न राहण्याची वहिवाट सुरू करावी, असें ह्मणणें अगदीं वेडेपणाचें होईल. घरें बांधण्याची कला मनुष्यास सुचेपर्यंत तींही रानांत पशुवत् राहत असत. ह्मणून आपलीं घरें पाडण्याचा आरंभ कोणी करील काय?

नियोग ज्या कालीं प्रचारांत होता त्या कालची लोकास्थिति.

याप्रमाणें 'पुनरुद्वाह' शास्त्रसंमत आहे कीं नाहीं, हा जो आपला प्रधान विषय त्याच्या आरंभीं जो सर्वसाधारण गैरसमज दृष्टीस पडतो त्याचें यथामति निरसन केलें. आतां प्रधान विषयाला प्रारंभ करूं.

---

## पुनरुद्वाहाविषयीं शास्त्रार्थ.

या विषयाला आरंभ करण्यापूर्वी प्रथम शास्त्र ह्मणजे काय या प्र-

भाचा निर्णय झाला पाहिजे. खालील श्लोकांत याज्ञवल्क्यानें या प्रश्नाचा निकाल केला आहे. तो ह्मणतो—श्रुतिःस्मृतिःसदाचारः स्वस्य च प्रियमात्मनः ॥ सम्यक्संकल्पजः कामो धर्ममूलमिदंस्मृतम् ॥ १ ॥ ह्मणजे वेद व स्मृति हीं मुख्य धर्मस्थानें होत. त्यांत कोणत्याही गोष्टीचा निर्णय न सांपडल्यास मग सदाचार वगैरे ठिकाणें पहावयाचीं. याप्रमाणें शास्त्र ह्मणजे काय, ह्याचा निकाल झाला; परंतु एवढ्यानें आपलें काम भागलें नाहीं. इष्टार्थनिष्पत्तीसाठीं तें पहावयाचें कसें, हेंही आपणास ठरविलें पाहिजे. कोणी असा प्रश्न करील कीं, यांत ठरवावयाचें तें काय? ज्या गोष्टीविषयीं आपणास शास्त्राची काय आज्ञा आहे, हें पहावयाचें असेल, त्या गोष्टीविषयीं जें शास्त्रांत सांगितलें असेल, ती त्याची आज्ञा. जर शास्त्रांत एका गोष्टीविषयीं एकच सिद्धांत नेहमीं असता, तर हें उत्तर बरोबर होतें; परंतु खरोखर तशी स्थिति नाहीं. त्यांत एकाच गोष्टीसंबंधानें निरनिराळीं मतें आढळतात. श्रुति व स्मृति या भिन्न भिन्न कालीं झाल्या असल्यामुळें जसजशी समाजाची स्थिति बदलत गेली तसतसा त्यांच्यांतही फरक पडत चालला; याप्रमाणें धर्मग्रंथांची स्थिति असल्यामुळें कोणत्याही विवक्षित गोष्टीविषयीं शास्त्रार्थ काढणें झाला ह्मणजे त्या गोष्टीविषयीं निरनिराळ्या ग्रंथांत जीं निरनिराळीं वचनें सांपडतात त्यांपैकीं आपण कोणतीं ग्राह्य करावीं, ह्मणजे इष्टार्थनिष्पत्तीसाठीं शास्त्र कसें पहावें, हा प्रश्न उत्पन्न होतो. यासाठीं प्रधान विषयाला प्रारंभ करण्यापूर्वीं या प्रश्नाचाही निकाल झाला पाहिजे.

शास्त्र ह्मणजे काय ?

तें पहावयाचें कसें ?

वरील श्रुतिस्मृतींची स्थिति मनांत आणिली, ह्मणजे या प्रश्नाचा ऐतिहासिक निकाल करणें फारसें कठिण नाहीं. निरनिराळ्या वचनांत जे फरक आढळतात ते ग्रहण करून त्यांवरून निरनिराळ्या स्मृतिकारांच्या व स्मृतींच्या संबंधानें कालाचीं अनुमानें बांधिलीं आणि त्यांवरून वर्तमानकाळीं शास्त्रसंमतक्रम कोणता, हें ठरविलें, ह्मणजे झालें. या रीतीनें शास्त्रार्थ काढण्यास शास्त्रीय रीतीप्रमाणें आपणास एकही गोष्ट गृहीत घ्यावी लागत नाहीं. सर्व स्मृती सारख्या प्रमाणाच्या आहेत, असें ह्मणावें

दोन मार्ग आहेत—ऐतिहासिक.

लागत नाहीं. सर्वत्र एका कालीं झाल्या, असा आग्रह धरावा लागत नाहीं; किंवा अगदीं परस्परविरुद्ध स्मृतींची सुद्धां एकवाक्यता करण्याचे प्रचंड श्रम माथीं घ्यावे लागत नाहींत. परंतु हा ऐतिहासिक मार्ग झाला. हा आमच्या शास्त्रीमंडळास मुळींच पसंत नाहीं. त्यांच्यांत ज्या मार्गानें शास्त्राचा अर्थ करण्याची वहिवाट आहे, तो यापासून अगदीं भिन्न आहे. या मार्गाप्रमाणें सर्व स्मृति एककालीन असून त्या सर्वांचा एकच अर्थ आहे, त्यांत मुळींच विरोध नाहीं, किंबहुना श्रुति स्मृति, पुराणें, टीकाकार, कोणीही असो, त्या सर्वांचें ह्मणणें एकच आहे, हा सिद्धांत गृहीत धरून नंतर शास्त्राचा अर्थ करावयाचा. तात्पर्य, या मार्गांत एकवाक्यता हें महा तत्व असून अर्थात् त्याचें अवलंबन झाल्याशिवाय शास्त्रार्थ व्हावयाचाच नाहीं, असा तदनुयायी मंडळीचा समज आहे.

एकवाक्यतात्मक-शास्त्रीय.

---

## ऐतिहासिक मार्गानें शास्त्रार्थ.

याप्रमाणें ऐतिहासिक व एकवाक्यतात्मक असे जे शास्त्राचा अर्थ करण्याचे दोन मार्ग वर दाखविले, त्यांपैकीं ऐतिहासिक मार्गानें पुनरुद्वाह शास्त्रसंमत आहे कीं नाहीं, हें पाहूं गेल्यास, त्याचा निर्णय फार थोडक्यांत होतो. वेदांत एखाद्या स्त्रीचा पति मृत झाला असतां तिला पुनः लग्न करण्याची मोकळीक सांगितलेली आहे. (प० ऋग्वेद, १८।७।८ वगैरे). आणि मनु, वसिष्ठ, कात्यायन, शातातप, गौतम, वैशंपायन, जाबालि, व्याघ्रपात्, यांच्या स्मृतिग्रंथांतही पुनर्विवाहविधायक वचनें सांपडतात. तसेंच पुनर्विवाहित स्त्रीपासून झालेले मुलगे, ज्यांस पौनर्भव ह्मणतात, त्यांस मनु, याज्ञवल्क्य, नारद, विष्णु इत्यादि स्मृतिकारांनीं अंशग्राहक मानिले असून, त्यांस त्यांनीं दत्तपुत्रापेक्षांही वरस्थान दिलेलें आहे. कलिवर्ज्यधर्मविषयक पौराणिक वचनांवरूनही पुनर्विवाहाची चाल आपणांत पूर्वीं होती, परंतु ती अलीकडे लोपली आहे, असें ठरतें. यावरून पुनर्विवाह पूर्व कालीं शास्त्रसंमत होता, असें ह्मणण्यास तरी बिलकुल हरकत नाहीं.

आतां पुराणांत पुनर्विवाहाच्या चालीचा निषेध केला आहे, आणि कलिवर्ज्य धर्मांत तिची गणना आहे, ह्मणून सांप्रत ती शास्त्रसंमत नाहीं, असें जर कोणी ह्मणेल, तर तें बरोबर नाहीं. कारण पराशरस्मृति, जी कलियुगांत प्रधान मानावी, असें सांगितलें आहे, तींत या विधानाला अनुज्ञा आहे व स्मृतिवाक्य पुराणवाक्यापेक्षां अधिक मातब्बर मानावें, असें शास्त्रांत सांगितलें आहे, तेव्हां अन्यत्र पुनर्विवाहनिषेधक वचनें जरी असलीं, तरी वरील स्मृतींत तद्विधायक वचनें ज्यापेक्षां आहेत त्यापेक्षां अशा रीतीचा विवाह सांप्रतही अशास्त्र मानितां येणार नाहीं, हें कबूल केल्यावांचून तोड नाहीं. आतां पुनर्विवाहित विधवेला पुनर्भू ठरवून तिला व तिच्या संततीला शास्त्रांत दोष सांगितले आहेत, तेव्हां, जरी पुनर्विवाह शास्त्रसंमत आहे, असें कबूल केलें तरी, त्याचा कांहीं उपयोग नाहीं, असें जर कोणी ह्मणेल, तर त्यावर आमचें असें उत्तर आहे कीं, ते दोष आतां मानण्याची जरूरी नाहीं; कारण त्यांच्याचबरोबर दुसऱ्या ज्या गोष्टी अशुद्ध ह्मणून शास्त्रांत सांगितल्या आहेत त्या आतां आह्मीं अशुद्ध मानीत नाहीं. याज्ञवल्क्यानें रसविक्रयाचा फार निषेध केला आहे, असें असतां, तो आपण हल्लीं कोठें मानितों? असें जर आहे, तर पुनर्विवाहमात्रच आपण निषिद्ध कां मानावा? हल्लीं त्याची रूढि नाहीं, असें कोणी ह्मणेल, तर त्याला थोडा उपाय आहे. रूढि पाडली ह्मणजे झालें. याप्रमाणें ऐतिहासिक मार्गानें, पुनर्विवाह शास्त्रसंमत आहे किंवा नाहीं, याचा फार लवकर आणि सरळ असा निकाल करितां येतो. परंतु या मार्गानें अर्थवाद करण्याची आमच्या शास्त्रिमंडळांत चाल नाहीं व तो त्यांस संमतही नाहीं; तेव्हां इष्टफलसिद्धीसाठीं त्यांच्याच ह्मणजे एकवाक्यतात्मक मार्गाचेंच अवलंबन करून प्रस्तुत विषयाची जी यथामति सेवा होईल ती करण्याचा आजचा माझा प्रयत्न आहे.

---

## एकवाक्यतात्मक अथवा शास्त्रीय मार्गानें शास्त्रार्थ.

या विषयाची सध्यां अशी स्थिति आहे कीं, साधक व बाधक या

दोन्ही पक्षांकडील लोक पुराव्याचा बोजा एकमेकांवर टाकितात. साधक पक्षाकडील मंडळी असें ह्मणते कीं, पुनरुद्वाहाच्या अभावाविषयीं कोठेंही प्रमाण नाहीं; त्यावर बाधक पक्षाचे लोक असें उत्तर देतात कीं, तो विवाह असावा, असें कोठेंही दिसत नसून, त्याचा निषेध करणारीं अशीं मात्र स्पष्ट वचनें आहेत, व पुनर्विवाहित जोडप्यास दोषी ठरवून त्यास प्रायश्चित्तवचनेंही सांगितलीं आहेत. परंतु याप्रमाणें पूर्वपक्ष उत्तरपक्ष करून अजिंक्य पत्रें मिळविण्याची आमची इच्छा नाहीं. या विषयासंबंधें शास्त्रदृष्ट्या खरा निश्चय काय होतो, एवढेंच काढण्याची आह्मांस जरूरी आहे; यासाठीं कोणताच पक्ष न स्वीकारतां पुनर्विवाह शास्त्रसंमत आहे किंवा नाहीं, या प्रश्नाचा बरोबर निकाल होण्यासाठीं तद्विधायक व तन्निषेधक जीं जीं प्रमाणें शास्त्रांत सांपडतील तीं सर्व सांगून नंतर त्यांवरून आमच्या मनाला निर्णय कोणता दिसतो, तें आपल्याला निवेदन करण्याचा माझा विचार आहे.

साधक पक्ष.—'नष्टे मृते' यांत सांगितलेल्या प्रसंगीं पुनरुद्वाह शास्त्रसंमत आहे.

पुनर्विवाहविधायक जीं वचनें शास्त्रांत आढळतात त्यांपैकीं 'नष्टे मृते प्रव्रजिते क्लीबे च पतिते पतौ । पञ्चस्वापत्सु नारीणां पतिरन्यो विधीयते ॥ १ ॥ ह्मणजे 'पति सांडला, मृत झाला, सन्यस्त झाला, पुंस्त्वरहित असला किंवा धर्मभ्रष्ट झाला, तर त्याच्या स्त्रीनें दुसरा पति करावा'. हें वाक्य प्रसिद्ध असून तें साधक पक्षाच्या इमारतीचा पाया आहे. हें वाक्य मनूमध्यें आहे, असें मानण्यास आधार आहे, व वसिष्ठ व नारद यांच्या स्मृतींतही तें आहे, असें मानितात. पराशरस्मृतींमध्यें तर तें स्पष्ट आढळतेंच. या वाक्यावरून वरील पांच आपत्तींपैकीं कोणतीही आपत्ति एकाद्या स्त्रीला प्राप्त झाली असतां, तिनें पुनर्विवाह करावा, असें स्पष्ट सिद्ध होतें. असें साधक पक्षाचें ह्मणणें आहे;

निषेधक पक्ष- परंतु 'नोद्वाहिकेषु' असें एक दुसरें वचन असल्यामुळें 'नष्टे मृते' नियोगपर लाविलें पाहिजे.

परंतु यावर पुनर्विवाहनिषेधक मंडळींचा असा आक्षेप आहे कीं, तुह्मी जें वचन पुनर्विवाहविधायक ह्मणून दाखवितां त्याचा तुमच्या ह्मणण्याप्रमाणें अर्थ होत नाहीं; कारण मनूनेंच 'नोद्वाहिकेषु मंत्रेषु नियोगः कीर्त्यते क्वचित् । न विवाहविधावुक्तं विधवावेदनं पुनः ॥'

ह्मणजे 'विवाहमंत्रांत नियोगाचा कोठें समावेश नाहीं, व विवाहविधींत विधवाविवाहाचा कोठें उल्लेख नाहीं' असें ह्मटलें आहे, त्यापेक्षां तुह्मी ह्मणतां तसा वरील श्लोकाचा अर्थ न करितां मेधातिथि ह्मणतो त्याप्रमाणें तो नियोगपर लाविला पाहिजे.

उत्तर-तसें तें लागत नाहीं.

निषेधक पक्षाचा वरील आक्षेप थोडासा विचार करण्यासारखा आहे खरा. परंतु वरील वचनाची संगति लावण्याकरितां जी त्यांनीं कोटि लढविली ती, मेधातिथिसारख्या महा विद्वान टीकाकाराचा आश्रय जरी त्यांनीं धरिला आहे तरी, वडाची साल पिंपळाला लावण्यासारखी आहे, असें ह्मटल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. नियोग व विवाह यांचा जो भेद आह्मीं वर दाखविला आहे, त्यांत नियोजित पुरुषाला शास्त्रांत भर्ता किंवा पति, हीं नांवें कधींही दिलीं नसून पति हें नांव संस्कारयुक्त ज्या पुरुषाचा विवाह झाला असेल त्यालाच मात्र मिळावयाचें, असें आह्मीं दाखविलें आहे; आणि यावरून पति हें नांव ज्या पुरुषाला मिळालें त्याला नियोजित कधींही ह्मणतां येणार नाहीं, हें आपल्या सहजच ध्यानांत येईल. प्रस्तुत श्लोकांत 'पतिरन्यो विधीयते' अशी स्पष्ट उक्ति आहे. असें असतां निषेधपक्षाकडील मंडळी तो नियोगपर लावावा असें ह्मणतात याला वरील उपमा कां देऊं नये? प्रस्तुत श्लोकांत 'पति' हा शब्द आहे, तेव्हां तो श्लोक विवाहित पुरुषासंबंधेंच घेतला पाहिजे, नियोजित पुरुषाला लावितां येणार नाहीं. वरील आक्षेप ज्या वचनावरून त्यांनीं काढिला तें वचन जसें मनुस्मृतींत आहे, तसेंच दुसरेंही एक वचन त्याच स्मृतींत आहे, त्याचीही त्यांना भ्रांति पडलेली दिसते. 'सा चेदक्षतयोनिः स्याद्गतप्रत्यागताऽपिवा ॥' पौनर्भवेण भर्त्रा सा पुनःसंस्कारमर्हति" हें वचन मनुस्मृतींतच आहे आणि यावरून (सध्यां पुनर्भूविषयक वाद बाजूला ठेवून पाहिलें असतां) स्त्री अक्षतयोनि असेल तर तिचा दुसऱ्या पुरुषाबरोबर संस्कारयुक्त विवाह करितां येतो, असें स्पष्ट सिद्ध होतें. आतां यांत वरील श्लोकाप्रमाणें सर्व स्त्रियांना पुनर्विवाह करण्याचा अधिकार दिला नाहीं हें खरें, तथापि ज्यांना तो करण्याची मोकळीक दिली आहे त्यांच्या पुनर्विवाहाची गणना संस्कारयुक्त विवाहांत केली आहे. असें असतां वरील 'नष्टे मृते०" हा श्लोक

नियोगपर लावावा, असें सांगणें ह्मणजे केवळ साहस करणें आहे, हें सांगावयास नको.

आतां यावर कोणी असें ह्मणेल कीं, येवढ्यावरूनच प्राप्तकालीं मनु विधवेला पुनर्विवाह सांगतो, असें ह्मणतां येणार नाहीं; कारण हें जसें मनूचें वचन पुनरुद्वाहविधायक ह्मणून तुह्मीं दाखविलें, तसेंच त्याचें वरील 'नोद्वाहिकेषु०' हें तन्निषेधकही आहे; यासाठीं (संस्कार शब्दावर विशेष जोर न देतां) 'सा चेत्०' हेंही वचन नियोगपर घ्यावें; तरी त्यावर आमचें असें उत्तर आहे कीं, मनूच्या वचनांचा अर्थ केवळ त्याच्याच वचनांकडे लक्ष देऊन जर करावयाचा असता, तर निषेधपक्षाचें हें ह्मणणें बरोबर झालें असतें. परंतु या त्यांच्या आक्षेपावरून शास्त्रार्थ काढितांना ज्या महातत्त्वाचा त्यांनींच स्वीकार केला आहे त्याचा त्यांना विसर पडल्यासारखें दिसतें. वरप्रमाणें 'साचेदक्षतयोनिः स्यात्०' या वचनाचा जर अर्थ केला नाहीं, तर इतर स्मृतिकारांचीं जीं वाक्यें आहेत त्यांना विरोध येतो. 'साचेत्०' यांत अक्षतयोनि विधवेला जर 'पुनः संस्कार' सांगितला आहे, तर तें नियोगपर लावितांच येणार नाहीं; कारण, याज्ञवल्क्याच्या वाक्यावरून असें स्पष्ट दिसेल कीं, संस्कार व नियोग यांची अशी भेसळ कधींही होणार नाहीं. त्यांनीं नियोगपर जीं वाक्यें सांगितलीं आहेत, तीं पुनःसंस्कारवाक्यांहून अगदीं निराळीं असून त्यांचे प्रसिद्ध टीकाकार जे विज्ञानेश्वर यांनींही हा भेद पसंत केला आहे. याज्ञवल्क्य 'अक्षता वा क्षता वापि पुनर्भूः संस्कृता पुनः' असें ह्मणून नंतर खालील नियोगपर वचनें देतोः—'अपुत्रां गुर्वनुज्ञातो देवरःपुत्रकाम्यया । सपिंडो वा सगोत्रो वा घृताभ्यक्त ऋतावियात् ॥ आगर्भसंभवात् गच्छेत्०' वर जो विधवाविवाह मनूनें सांगितला तो नियोगाहून भिन्न आहे; याला दुसरें असें एक प्रमाण आहे कीं, मनूनें जे पुत्रांचे प्रकार सांगितले आहेत त्यांत क्षेत्रज ह्मणजे नियोगापासून झालेला आणि पौनर्भव ह्मणजे पुनर्विवाहित स्त्रीपासून झालेला, असे दोन प्रकार त्यानें केले आहेत. जर वरील वचन नियोगपर लागावें, असा मनूचा उद्देश असता, तर पौनर्भवाचा क्षेत्रज वर्गांतच त्यानें समावेश केला असता. याज्ञवल्क्यस्मृति पाहू

निषे०-'साचेत्' हेंही वचन नियोगपर लावावें.

उत्तर-तेंही तसें लागत नाहीं.

गेलें असतांही असाच भेद दृष्टीस पडतो. मनूप्रमाणें त्यांनींही क्षेत्रज व पौनर्भव असे पुत्रांचे निरनिराळे प्रकार केले आहेत, तेव्हां 'नष्टे मृते०' व 'सा चेत्०' हीं वाक्यें नियोगपर लावितां येणार नाहींत हें उघड झालें.

निषे०-खरें. पण या तीन वचनांची परस्परएकवाक्यता होत नाहीं.

आतां कोणी असें ह्मणेल कीं, 'नष्टे मृते०' व सा 'चेत्०' हीं वचनें नियोगपर लावितां येणार नाहींत, असें जें तुह्मी ह्मणतां, तें आह्मी कबूल करितों; परंतु मनूंतील 'नोद्वाहिकेषु०' या वचनांत विवाहविधीमध्यें विधवेचा उल्लेख नाहीं, असें स्पष्ट लिहिलें आहे तेव्हां, जरी तुह्मी ह्मणतां त्याप्रमाणें 'नष्टे मृते०' व 'सा चेत्० हीं वचनें नियोगपर न लावितां त्यांचा जसा सरळ अर्थ होईल तसा केला, तथापि त्यांची जेथपर्यंत 'नोद्वाहिकेषु०' या वचनाशीं एकवाक्यता झाली नाहीं, तेथपर्यंत साधक पक्षाकडील मंडळीला त्याचा कांहीं उपयोग नाहीं. जर ह्या वचनद्वयाच्या आधारावर स्त्रियांचा पुनर्विवाह सशास्त्र आहे, असा ते आग्रह धरूं लागले, तर आह्मी 'नोद्वाहिकेषु०' या वचनाच्या आधारानें तो अशास्त्र आहे असें ह्मणूं, आणि स्वस्थ बसूं.

उत्तर-हें ह्मणणें ठीक नाहीं. मनुवचनांची इतर स्मृतिवचनांशीं जर एकवाक्यता आहे, तर त्यांची परस्परही असलीच पाहिजे.

या निषेध पक्षाच्या आक्षेपावर आमचें असें उत्तर आहे कीं, पुनर्विवाहविषयक जर एवढींच वाक्यें शास्त्रांत असतीं, तर ते ह्मणतात त्याप्रमाणें कदाचित् आह्मींही कबूल केलें असतें. परंतु तशी गोष्ट नाहीं. या विषयासंबंधें नारद, शातातप, वशिष्ठ यांचीं अनुक्रमें खालीं लिहिल्याप्रमाणें वचनें आहेत:—'उद्वाहिताऽपि सा कन्या न चेत् संप्राप्तमैथुना। पुनःसंस्कारमर्हेत यथा कन्या तथैव सा ॥ (नारद). वरश्चेत्कुलशीलाभ्यां न युज्येत कदा च न । न मंत्राः कारणं तत्र न च कन्याऽनृतं भवेत्। समाच्छिद्य तु तां कन्यां बलादक्षतयोनिकाम् । पुनर्गुणवते दद्यात्० (शातातप). 'पाणिग्राहे मृते बाला केवलं मंत्रसंस्कृता । सा चेदक्षतयोनिःस्यात्पुनःसंस्कारमर्हति' (वशिष्ठ).

आतां शास्त्रार्थ काढण्यास प्रारंभ करितांना सर्व स्मृति सारख्याच प्रमाणाच्या आहेत, व त्या सर्व एककालीन आहेत, आणि यासाठीं त्या सर्वांनीं एकवाक्यता झाल्याशिवाय कोणताही शास्त्रार्थ ठरत नाहीं, या ज्या

गोष्टी निषेधक पक्षाकडील मंडळीनें गृहीत केल्या आहेत, त्यांनकडे जर त्यांना दुर्लक्ष्य करावयाचें नसेल, तर वरील मनूचीं 'नष्टे मृते०' व 'सा चेत्०' हीं वाक्यें त्यांच्याच 'नोद्वाहिकेषु०' या वाक्याला अपवादक आहेत, ह्मणजे 'नोद्वाहिकेषु०' या वचनांत मनूनें साधारण नियम सांगून नंतर तो नियम 'नष्टे मृते०' यांत सांगितलेल्या प्रसंगीं आणि 'सा चेत्०' यांत सांगितलेल्या मर्यादेपर्यंत मोडतां येईल, असें सांगितलें आहे, असें धरल्याखेरीज दुसरा मार्ग नाहीं, हें त्यांना कबूल करावें लागेल. कारण असें जर ते कबूल न करतील, तर मनूचा इतर स्मृतिकारांशीं विरोध येतो. परंतु तें त्यांच्या वरील गृहीत सिद्धांताच्या विरुद्ध आहे. तेव्हां मनूच्या 'नोद्वाहिकेषु०' या वाक्याला 'नष्टे मृते०' व 'सा चेत्०' हीं वाक्यें अपवादक आहेत, हें त्यांना कबूल केलें पाहिजे

निषे०—होय. पण पुनर्विवाह अमर्याद तर नाहीं, त्याला संभोगाची मर्यादा राहतेच.

यावर निषेध पक्षाकडील मंडळी जर असें ह्मणेल कीं ठीक आहे. तुह्मीं जीं इतर स्मृतिकारांचीं वाक्यें दाखविलीं त्यांवरून 'नष्टे मृते०' व 'सा चेत्०' हीं वाक्यें 'नोद्वाहिकेषु०' या वाक्याला अपवादक धरून 'नोद्वाहिकेषु०' याचा अर्थ केला पाहिजे, हें आह्मीं पत्करितों, परंतु तेवढ्यानें साधक पक्षाकडील मंडळीचें काम भागत नाहीं. ते ह्मणतात कीं, 'नष्टे मृते०' या वचनांत स्मृतिकारानें संभोगाची इयत्ता न ठेवितां त्या वचनांत सांगितलेल्या प्रसंगीं स्त्रीस अन्यपतिविधान सांगितलें आहे, तेव्हां त्या वचनाचा सार्वत्रिक अर्थ कां करूं नये ? पुणें मुक्कामीं श्रीसन्निध जो वाद झाला त्यांत विष्णुशास्त्री वगैरे साधक पक्षाकडील मंडळीचें हेंच ह्मणणें होतें. परंतु तुह्मीं जीं इतर स्मृतिकारांचीं वचनें वर दाखविलींत त्यांच्याशीं जर एकवाक्यता ठेवावयाची आहे, तर त्यावरून तसा अर्थ होत नाहीं.

उत्तर.–हें निर्विवाद आहे.

हा निषेध पक्षाचा आक्षेप आह्मी अक्षरशः कबूल करितों; जर सर्व स्मृतिवचनांची एकवाक्यता करून जो अर्थ निघेल तो काढावयाचा आहे, तर 'नष्टे मृते०' या वचनाचा अर्थ सार्वत्रिक न घेतां 'सा चेत्०' या अपवादक वचनाला जेवढा साजेल तेवढाच घेतला पाहिजे, हें निर्विवाद आहे.

यावर साधक पक्षाकडील मंडळीकडून असा आक्षेप येण्याचा संभव आहे कीं, होय, तुह्मी ह्मणतां ती गोष्ट खरी; परंतु तुह्मांस आह्मी आधीं असें विचारतों कीं, पराशरवचन जर कलियुगीं प्रधान आहे आणि 'नष्टे मृते०' हें वचन जर पराशरस्मृतींत आहे आणि त्या वचनांत व त्या स्मृतींत दुसरें कोठेंही जर संभोगमर्यादेचा उल्लेख नाहीं, तर अन्ययुगींच्या स्मृतींचा आधार घेऊन पराशरवचनाचा तुह्मांस मानेल त्याप्रमाणें संकुचित् अर्थ करण्यास तुह्मांस काय अधिकार आहे.

साध०—परंतु कलियुगीं प्रधान जी पराशरस्मृति तिजवरून असा सिद्धान्त ठरत नाहीं.

पण हें प्रतिपादन ठीक नाहीं. 'नष्टे मृते० ' हें वचन मनु, नारद, वशिष्ठ, पराशर, या चारीही स्मृतींत असून पहिल्या तिहींत त्याचा वरप्रमाणें अर्थ केला आहे. तेव्हां पहिल्या तीन स्मृतिकारांनीं जो त्या वचनाचा अर्थ मानला असेल, तोच पराशराचाही असला पाहिजे, असें मानणें सयुक्तिक आहे. नाहीं तर एकच वचन पहिले तिघे स्मृतिकार एका अर्थानें बोलले व चवथा तेंच वचन, तो स्वतः आपला अर्थ निराळा आहे, असें सांगत नसतांना, दुसऱ्याच अर्थानें बोलला, अशी कल्पना करण्याची अनवस्था अर्थ करणारांना आपल्या माथीं घ्यावी लागते.

उत्तर—पण हें प्रतिपादन ठीक नाहीं पराशरस्मृतीचाही अन्ययुगीयस्मृतींप्रमाणेंच समर्याद अर्थ केला पाहिजे.

आतां कोणी असें ह्मणेल कीं, तुह्मीं पुनर्विवाहविधायक पराशरस्मृतींतील एक आधार दाखविला हें खरें, परंतु पराशरानें सहगमन करणें, अगर सन्यस्त राहणें, हे आचार विधवांना सांगितले आहेत; त्यांवरून तुह्मीं वर दाखविलेल्या पुनर्विवाहविधायक उक्तीस बाध येतो, तर त्यावर आमचें असें ह्मणणें आहे कीं, ही शंका घेण्याची बिलकूल जरूरी नव्हती. विधवेनें संन्यस्त रहावें, हें चांगलें, असें पराशरानें सांगितलें खरें; परंतु

निषे०— अक्षत योनि विधवेला पुनरुद्वाहाचा अधिकार आहे असें जर असेल, तर स्मृतिकारांनीं विधवांना आचार कां सांगितले ?

तिनें पुनरुद्वाह केला तर ती दोषी होते असें त्यानें सांगितलें नाहीं, इं-

उत्तर—जर त्या पुनरुद्वाहन करितील तर तसें आचरण करणें श्रेयस्कर आहे म्हणून

तकेंच नव्हे, तर 'नष्टे मृते०' या वचनांत सांगितलेल्या पांच आपत्तींपैकीं कोणतीही आपत्ति प्राप्त झाली असतां, तिनें तो करावा, असें मात्र स्पष्ट सांगितलें आहे. 'शुश्रूषेत च जीवन्तं संस्थितं न च लंघयेत् ।' तसेंच 'न तु नामापि गृण्हीयात्पत्यौ प्रेते परस्यच' (मनु) या वचनांचीही अशीच व्यवस्था समजावयाची; म्हणजे हीं वचनें विधवेच्या साधारण धर्मांचीं द्योतक असून, तिनें पुनः लग्न न केल्यास, म्हणजे ती विधवाच राहिल्यास, तिनें कसें वागावें, याबद्दल लिहिलीं आहेत, असें समजावें. अश्वलायनानें सुद्धां 'अज्ञानश्च द्विजो यस्तु विधवामुद्वहेद्यदि । परित्यज्य तां चैव प्रायश्चित्तं समाचरेत् ॥' असें जें वचन दिलें आहे तें प्राप्तमैथुनाविधवापरच लाविलें पाहिजे, नाहीं तर इतर स्मृतिवचनांशीं त्याचा विरोध येतो.

याप्रमाणें मनु, वशिष्ठ, नारद, शातातप, पराशर इत्यादि स्मृतिकारांची

शेवटीं शास्त्रार्थ ठरला तो.

एकवाक्यता करून पाहिली म्हणजे विधवेला, ती प्राप्तमैथुना होईपर्यंत, संस्कारयुक्त पुनरुद्वाहाचा अधिकार आहे, असें स्पष्ट सिद्ध होतें.

---

## इतर हरकती व त्यांची निवृत्ति.

आतां कोणी असें म्हणेल कीं, ठीक आहे. उक्तस्मृतिवचनांचाच जर

१ पुनर्दानवाद.

केवळ अर्थ करावयाचा असेल, तर तुम्ही म्हणतां तसा तो होतो, हें खरें. परंतु तेवढ्यानें आमचें समाधान होत नाहीं. तुम्ही जो वरील वचनांचा अर्थ केला तो, त्यांची इतर स्मृतिवचनांशीं एकवाक्यता बिघडल्याशिवाय, होतो कीं नाहीं, तें पाहिलें पाहिजे. कारण तसें केल्याशिवाय खरा अर्थ झाला, असें म्हणतां येणार नाहीं. तुम्ही म्हणतां कीं, स्त्री अप्राप्तमैथुना असली म्हणजे 'नष्टे मृते०' या वचनांत

सांगितलेल्या आपत्तींपैकीं कोणतीही एकादी आपात्ति तिजवर आली असतां, तिला शास्त्राप्रमाणें विधियुक्त पुनर्विवाह करितां येतो. तर आतां तुह्मी ह्मणतां तसें जर घेतलें, तर ' पाणिग्रहणिका मंत्रा नियतं दारलक्षणम् । तेषां निष्ठा तु विज्ञेया विद्वद्भिः सप्तमे पदे ॥ ' या मनुवाक्याचें तुह्मी काय करणार ? यांत तर सप्तपदी झाली ह्मणजे कन्यादान पूर्ण झालें, असें सांगितलें आहे. आणि एकदां पूर्ण दान झालें ह्मणजे मग पुनर्दानाला जागा राहत नाहीं. यास्तव एकदां कोणत्याही कन्येचें पूर्णदान झालें ह्मणजे मग तिचा पति जरी दूषित अगर मृत झाला, तरी तिला पुनर्दान नाहीं, हेंच तुह्मांस पत्करिलें पाहिजे.

आमच्या प्रतिपक्ष्यांनीं जी कोटि लढविली ती आह्मांस कबूल आहे.परंतु जो पाश त्यांनीं आमच्यावर टाकिला आहे, तोच आह्मी उलट त्यांच्यावर टाकितों ह्मणजे झालें. एकदां कन्येचें दान झालें ह्मणजे तिचें पुनर्दान करितां येणार नाहीं, हा अर्थ वरील मनुवचनापासून निष्पन्न होतो, ही गोष्ट खरी. तथापि इतर स्मृतिवचनांशीं त्याची एकवाक्यता होते, असें ठरल्यावांचून तो सर्वव्यापी आहे, असें मात्र ह्मणतां कामा नये. जर ' पाणिग्रहणिका० ' याचा वरील अर्थच कायम धरिला, तर ' स तु यद्यन्यजातीयः पतितः क्लीब एवच । विकर्मस्थः सगोत्रो वा दासो दीर्घामयोऽपिवा ॥ ऊढाऽपिदेया साऽन्यस्मै सहाभरणभूषिता ॥ ' ( कात्यायन. ) ' दत्तामपिहरेत् कन्यां सगोत्रोढां तथैवच ' ( वशिष्ठ ) ' न मंत्राः कारणं तत्र नच कन्याऽनृतंभवेत् । समाछिद्य तु तां कन्यां बलादक्षतयोनिकाम् ॥ पुनर्गुणवते दद्यात् ' ( शातातप ) ह्या अन्य स्मृतिकारांच्या वचनांचें काय करावयाचें ? या वचनांत कन्येचें एकदां पूर्णदान करणें, नंतर तिला परत घेणें, आणि पुनः तिचें यथाविधि दान करणें, इतक्या गोष्टींचा समावेश होतो. जर वरील ' पाणिग्रहणिका मंत्रा० ' या वाक्याचा सर्वव्यापि अर्थ केला, तर या कात्यायनादि वचनांचा वेडावांकडा अर्थ केल्यावांचून त्यांची त्याच्याशीं एकवाक्यता राहत नाहीं. ' ऊढा ' व ' मंत्र ' या शब्दांचे सरळ शब्दार्थ सोडून देऊन सप्तपदीच्या आंत त्यांची व्याप्ति कशी तरी लावणें, हें किती स्वारस्यघातक आहे, हें सांगावयास नको. शिवाय, असा अर्थ केल्यानें वरील वचनांतील कांहीं स्पष्ट शब्दांकडे दुर्लक्ष्य केल्यावांचून

त्याचा नाहीं; कारण जरी ऊढा वगैरे कांहीं शब्दांचा अर्थ अपूर्ण दानार्थी केला, तरी वरील वचनें पूर्णदानापेक्षेनें लिहिलीं आहेत, हें त्यांतील 'हरेत्' 'समाश्रित्य,' व 'पुनर्दान,' ह्या शब्दांवरून स्पष्ट होतें. जर प्रतिपक्ष्यांच्या ह्मणण्याप्रमाणें हीं वचनें अपूर्णदानद्योतक असतील, तर 'हरेत्' इत्यादि पूर्णदानद्योतक शब्दांचा अर्थ काय ? ह्यावरून आपल्या सहजच ध्यानीं येईल कीं, निषेधक मंडळीचें प्रतिपादन स्वी-कारिलें ह्मणजे 'पाणिग्रहणिका०' या वचनाला अपवाद असा जर कात्यायनादिवचनांचा अर्थ केला नाहीं, तर स्मृतिकारांवर अयुक्त-वादाचा दोष येऊन एकवाक्यता बिघडते. यासाठीं वरील कात्यायनादि-वचनें अपवादक मानून सप्तपदीनें दानपूर्णता होते व नंतर स्त्री पुनः देतां येत नाहीं. असा जो 'पाणिग्रहणिका०' या मनुवाक्यांत नियम सांगि-तला आहे, तो सर्वव्यापी नसून अपवादकक्षम असा साधारण नियम आहे, असें धरिलें पाहिजे.

यावर निषेधक मंडळीचा आणखी असा एक आक्षेप आहे कीं, कात्या-यनादिवचनें जर अपवादक घेतलीं, तर त्याप्रमाणें सगोत्रास दिलेल्या क-न्येचेंही पुनर्दान केलें पाहिजे, असें कबूल करावें लागतें. परंतु याचा 'सगो-त्रोढांपुत्रवत्प्रतिपालयेत्' या स्मृतिवचनाशीं विरोध येतो.

परंतु असें ह्मणणें ह्मणजे पुनः वरप्रमाणेंच चुकी करणें आहे. वर आह्मीं दाखविलें आहे कीं, 'पाणिग्रहणिका०' या वचनाला जो विरोध आला, तो तें सर्वव्यापी धरिल्यामुळें आला. तसेंच वरील आक्षेपांत 'सगोत्रोढा' या-ला जो निषेधक मंडळी विरोध दाखवितात तोही ते तें सर्वव्यापी धरितात ह्मणून येतो. परंतु तें सर्वव्यापी जर धरिलें नाहीं, तर तो येणार नाहीं. 'स-गोत्रोढा०' यांत जें पालन करावयाचें ह्मणून लिहिलें आहे तें, जर पुनर्दान झालें नाहीं, तर करावयाचें, असें समजलें ह्मणजे झालें.

पुनर्दान करणें हें युक्त आहे, ह्याला दुसरें एक असें प्रमाण आहे कीं, जें दान सहेतुक असतें त्याचा हेतु तें दान घेणाराकडून जर तडीस गेला नाहीं, तर तें त्याजपासून परत घेणें हें बिलकूल गैरवाजवी नाहीं. पुष्कळ दानें याप्रमाणें परत घेण्याची वहिवाट आहे. अग्निहोत्र चालविण्यासाठीं जर राजानें भूमि दान दिलेली असली, आणि प्रतिगृहित्याकडून जर तो

हेतु सिद्धीस गेला नाहीं, तर राजा दिलेलें दान परत घेतो, आणि हें त्याचें करणें शास्त्रविरुद्ध आहे, असें कोणीही समजत नाहीं. लग्नामध्यें कन्येचें जें दान करितात, तें तरी प्रजोत्पत्त्यादि सुखें तिला प्राप्त व्हावीं ह्मणून केलेलें असतें. आतां ज्याला तें दान करावयाचें त्याजकडून जर तो मृत झाल्यानें अथवा दोषयुक्त ठरल्यानें तीं सुखें तिला प्राप्त होणार नाहींत, तर तें दान परत घेण्यास हरकत ती कोणती? नारदांनीं 'कर्ता ममायं कर्मेति' या स्मृतिवचनांत प्रतिग्रहीता कर्मकुर्वाण झाला ह्मणजे त्याला दिलेलें दान परत घेण्यास बिलकूल हरकत नाहीं, असें अगदीं स्पष्ट सांगितलें आहे. तेव्हां स्त्री क्षतयोनि होण्यापूर्वीं जर तिचा पति मृत्यु पावला तर त्याजकडून दानाचा हेतु मुळींच तडीस गेला नाहीं, असें होतें. यासाठीं वरील नारदवाक्यानें तिला परत घेणें व तिचें पुनर्दान करणें सशास्त्र ठरतें. येथें कोणी जर अशी शंका घेईल कीं, एकदां कन्येचें पूर्णदान झालें ह्मणजे तिजवरील स्वत्व नवऱ्यास जातें, ह्मणून तिचें पुनः दान करण्यास दुसऱ्यास अधिकार राहत नाहीं. तर ही शंका वरील वचनावरून दूर होते. कारण त्या वचनांत प्राप्तकालीं हरण व पुनर्दान हीं सांगितलीं असल्यामुळें वचनबलानें स्वत्व परत येतें असेंच मानिलें पाहिजे. कारण स्वत्व परत आल्यावांचून पुनर्दानाला जागा राहत नाहीं. दुसरी अशी एक गोष्ट आहे कीं, स्त्रीचें भर्त्याशीं पूर्ण ऐक्य होण्यास संभोगाची अपेक्षा आहे. 'चतुर्थीहोममंत्रेण त्वङ्मांसहृदयेन्द्रियैः। भर्त्रा संयुज्यते पत्नी तद्गोत्रा तेन सा भवेत्॥' तसेंच आपस्तम्बसूत्र 'मंत्रैरस्थिमांसत्वचैस्सह, एकत्वे सहते भर्तुः पिण्डे गोत्रेच सूतके.' या वचनावरून जेथपर्यंत संभोग झाला नाहीं तेथपर्यंत स्त्री परत घेतां येईल, असें मानण्यास हरकत दिसत नाहीं. आतां हें परत घेणें सकारण असलें पाहिजे, हें सांगावयास नको. 'नष्टे मृते०' वचनांत हीं कारणें कोणतीं तें सांगितलेलें आहे. तेव्हां जर स्त्री अक्षतयोनि असेल तर निर्दिष्ट कारणासाठीं तिला परत घेऊन तिचें पुनर्दान करणें, हें दोषार्ह होणार नाहीं, हें आपल्या सहज ध्यानीं येईल.

आतां 'सकृत्कन्याप्रदीयते,' 'न दत्वा कस्यचित्कन्यां पुनर्दद्याद्विचक्षणः,' इत्यादि जीं मनुवाक्यें आहेत त्यांची व्यवस्था काय करावी असें कोणी विचारील तर त्या प्रश्नाचा निकाल करणें मुळींच कठिण नाहीं.

वरील अशा प्रकारच्या दुसऱ्या वचनांप्रमाणेंच तींही साधारण नियामक समजून वर सांगितलेले अपवाद त्यांनाही लागतात असें समजलें ह्मणजे झालें.

इतकें झालें तरी आणखी एका वाक्यासंबंधें निषेधक पक्षाचें अजून बोलणें राहण्याचा संभव आहे. ते असें ह्मणतील कीं, याज्ञवल्क्यांनीं ' लक्षण्यांस्त्रियमुद्वहेत् अनन्यपूर्विकां कान्तां असपिंडां यवीयसीम् । अरोगिणीं भ्रातृमतीमसमानार्षगोत्रजाम् ' । असें ह्मटलें आहे यावरून ते पुनर्दानाचा निषेध करितात, असें स्पष्ट होतें. परंतु हा त्यांचा समज अगदीं भ्रांतिमूलक आहे. कारण वरील वाक्यांत एक तर त्यांनीं अनन्यपूर्विकेबरोबरच लक्षण्या, अरोगिणी, भ्रातृमती इत्यादि गोंविल्या आहेत. परंतु यावरून तो ज्या स्त्रीला बंधु नाहींत, अगर जी सुलक्षणा नाहीं तिच्या विवाहाचा निषेध करितो, असें कोणीच मानीत नाहीं. दुसरें, जर अनन्यपूर्विका स्त्रीचा विवाह निषिद्ध मानिला, तर वाग्दत्ता वगैरेंचाही निषिद्ध कां मानूं नये ? कारण बौधायनमताप्रमाणें वाग्दत्ता ही अनन्यपूर्विका होते. ( पहा, बौधायनवचन वाचादत्ता मनोदत्ता इ० ) परंतु हा विवाह निषिद्ध नाहीं, हें सर्वमान्य आहे. वरील वचनांत याज्ञवल्क्यांनीं वधूचे जे गुण सांगितले आहेत त्यांपैकीं असपिंडा आणि असमानार्षगोत्रजा हे मात्र अवश्य मानिले पाहिजेत हें खरें, कारण ते अदृष्टार्थ आहेत. परंतु बाकीचे दृष्ट विरोध असल्या कारणानें अवश्य मानण्याचें कारण नाहीं. विज्ञानेश्वरांनींही मिताक्षरेमध्यें हाच भेद केला आहे. ते ह्मणतात कीं, ' सपिंडासु समानगोत्रासु समानप्रवरासु भार्यात्वमेव नोत्पद्यते ' ह्मणजे सपिंडा, समानगोत्रा, आणि समानप्रवरा अशी स्त्री भार्या होऊं शकणार नाहीं, तेव्हां वर जे याज्ञवल्क्यांनीं गुण सांगितले, ते वरानें पहावे अशी त्यांची शिफारस आहे, याहून यांचा अधिक मतलब असावा असें दिसत नाहीं. आतां इतकें खरें कीं, कान्ता जशी भ्रातृमती, सुलक्षणा, अशी मिळाली तर चांगली, तशीच अनन्यपूर्वाही जर मिळेल तर बरेंच; परंतु यावरून ती तशी नसल्यास याज्ञवल्क्य तिच्या विवाहाचा निषेध करितात, असें मानण्यास मात्र जागा नाहीं.

आतां.यावर कोणी कदाचित् असें ह्मणेल कीं, ठीक आहे; अक्षत-योनि स्त्रीचा पति वारला किंवा दूषित ठरला तर तिला परत घेऊन तिचें पुनर्दान करावें, हें तुह्मीं सिद्ध केलेंत, परंतु यापासून तुह्मांला फलनिष्पत्ति काय? जर तसें दान करण्यास विधि असेल तर करा. मनूंनीं 'पाणिग्रहणिका मंत्राः कन्यास्वेवप्रतिष्ठिताः। नाऽकन्यासु' असें सांगितलें आहे आणि कन्या शब्दाचा अर्थ आह्मीं दत्तावधि ह्मणजे एकदां दान होई पावेतों असा समजतों. तेव्हां जरी इतर प्रमाणांनीं अक्षतयोनि स्त्रीचें पुनर्दान तुह्मीं सिद्ध केलें, तथापि त्याला शास्त्रांत विधान सांगितलेलें नाहीं, याकरितां तुमचा सर्व खटाटोप व्यर्थ गेला.

२ विधानवाद

गोष्ट खरी. जर आमचे प्रतिपक्षी ह्मणतात त्याप्रमाणें कन्या शब्दाचा अर्थ असता, तर त्यांनीं या ठिकाणीं आह्मांला खालीं पहावयास लाविलें असतें यांत संशय नाहीं. परंतु कन्या शब्दाचा अर्थ स्मृतिग्रंथांत काय केलेला आहे हें जर पाहिलें तर आमचे व त्यांचे पुष्कळ श्रम वांचतील. मनूचे प्रसिद्ध टीकाकार जे मेधातिथि व कुल्लूक यांनीं कन्या शब्दाचा अर्थ दत्तावधि न करितां अक्षतयोनिपरत्व केला आहे. मनूंनींही 'पाणिग्रहणिका०' या वचनाचे पूर्वी 'अकन्येति यः कन्यां ब्रूयात् स शतं प्राप्नुयाद्दण्डम्,' असें जें वचन लिहिलें आहे त्याचेंही स्वारस्य कन्याशब्दाचा अर्थ अक्षतयोनि केल्याखेरीज राहत नाहीं. 'अलंकृत्य कन्यामुदकपूर्वां दद्यात्, कन्यां प्रयच्छेत्' इत्यादि आश्वलायन, बोधायन वचनांचीही एकवाक्यता कन्याशब्दाचा अर्थ वरप्रमाणें केल्यानेंच होते; तसेंच मनुवचनांतही समजलें पाहिजे. यावरून ज्यां स्त्रीचें दान झालें आहे (जी विवाहित आहे) ती कन्या असूं शकते, असें त्यांचें मत आहे. पराशरही 'विधवा या भवेत् कन्या निर्दोषा भर्तृवर्जिता। तस्या वासः पितुर्वेश्म०' या वचनांत तेंच कबूल करितात, व नारदांनींही 'उद्वाहिताऽपि सा कन्या न चेत् संप्राप्तमैथुना। पुनः संस्कारमर्हेत यथा कन्या तथैवसा' या उक्तींत तोच अर्थ व्यक्त केला आहे. याप्रमाणें कन्याशब्दाचा अर्थ दत्तावधि न घेतां अक्षतयोनिपरत्वें घेतला पाहिजे. याला इतकीं स्पष्ट प्रमाणें असतां एकदां एखा-

या स्त्रीचें दान होऊन ती विवाहित झाली ह्मणजे तिचें कन्यात्व जातें असें कल्पून कन्या या शद्बाचा अर्थ दत्तावधि करून ' पाणिग्रहणिका मंत्रा० ' या मनुवाक्याचा आधार घेऊन गतभर्तृका स्त्री अप्राप्तमैथुना असली तरी तिच्या पुनर्दानाला विधानविधि नाहीं, असें ह्मणणें या साहसाला काय ह्मणावें ?

आतां हा संस्कार ब्राह्म नव्हे असें जर कोणी ह्मणेल, तर तेंही बरोबर नाहीं. कारण तसें जर असतें तर वरील ' उद्वाहिताऽपि ' या वचनांत नारदांनीं पुनःसंस्कार हा शद्ब घातला नसता. पुनःसंस्कार हा शद्ब घालण्यांत पहिल्यानें झालेला पाणिग्रहणसंस्कार तोच पुनः करावयाचा असाच नारदांचा आशय असला पाहिजे. आणि त्यांचें स्वरूप त्यांनीं ' यथा कन्या तथैव सा ' या वचनानें चांगलें निर्दिष्ट केलें आहे. तेव्हां शेवटीं असें ठरतें कीं, पुनःसंस्कार हा केवळ प्रथम संस्काराची पुनरावृत्ति आहे. आणि ह्मणून तो ब्राह्म आहे किंवा नाहीं याबद्दल शंका घ्यावयास नको.

३ पुनर्भूवाद.

आतां वर जो पुनर्भूत्वाचा विषय आह्मी बाजूला ठेविला होता, त्याचा विचार करणें जरूर आहे. कारण तो विषय इतका महत्वाचा आहे कीं, त्याचा निर्णय झाल्यावांचून पुनरुद्वाह सशास्त्र ठरणेंही फुकट आहे; कारण कोणतीही स्त्री पुनरुद्वाहित झाली असतां, मग ती प्राप्तमैथुना असो किंवा अप्राप्तमैथुना असो, जर तिची गणना पुनर्भूत होईल, तर पुनर्विवाह शास्त्रसंमत आहे, असें ठरण्यांत कांहीं तत्व नाहीं. कारण पुनर्भूला मोठे दोष सांगितले असून तिच्या संततीची एक वेगळीच जाती केल्यासारखें दिसतें. तेव्हां पुनर्भूविषयक स्मृतिवचनें कोणतीं आहेत व तीं सर्व प्रकारच्या पुनर्भूस लागतात कीं कांहीं त्यांतून मोकळ्या राहतात, तें पाहिलें पाहिजे.

पुनर्भूविषयक जीं वचनें स्मृतींतून आढळतात तीं येणेंप्रमाणें:—मनु— ' साचेदक्षतयोनिःस्याद्गतप्रत्यागताऽपिवा । पौनर्भवेण भर्त्रा सा पुनःसंस्कारमर्हति ' ॥ याज्ञवल्क्य—' क्षता च अक्षता च पुनर्भूः संस्कृता पुनः ' नारदः—' कन्यैवाक्षतयोनिर्या पाणिग्रहणदूषिता । पुनर्भूः प्रथमा नाम पुनःसंस्कारकर्मणा ॥ देशधर्मानवेक्ष्य स्त्री गुरुभिर्या प्रदीयते । उत्पन्नसाहसान्यस्मै सा द्वितीया प्रकीर्तिता ॥ असत्सु देवरेषु स्त्री बांधवैर्या प्रदीयते ।

सवर्णाय सापिंडाय सा तृतीया प्रकीर्तिता ॥ तसेंच बौधायन सात प्रकारच्या पुनर्भू सांगतातः—' वाचादत्ता, मनोदत्ता, अग्निपरिगता, सप्तमं पदंनीता, भुक्ता, गृहीतगर्भा, प्रसूता, चेति सप्तविधपुनर्भूस्तां गृहीत्वा न प्रजाधर्मं विन्दते '

प्रथमदर्शनीं हीं वचनें पुनर्विवाहाचे सशास्त्रतेचा समूळ उच्छेद करितात असें दिसतें, कारण त्यांवरून कोणत्याही स्त्रीचें एकदां दान झालें म्हणजे मग तें मनोदान असो किंवा प्रत्यक्ष दान असो, त्या स्त्रीचा पति मृत अगर दूषित झालेला असो अगर नसो, आणि ती प्राप्तमैथुना असो अगर अप्राप्तमैथुना असो, तिचें पुनर्दान करितां येत नाहीं आणि तें केलें असतां ती पुनर्भूच्या दोषास पात्र होते, असें ठरतें. परंतु या सर्व वचनांची एकवाक्यता करून दुसऱ्या स्मृतिवचनांशीं तीं ताडून पाहिलीं म्हणजे असें कबूल करावें लागेल कीं, या वचनांत पुनर्भूचे जे सात वर्ग केले आहेत, त्यांपैकीं कांहीं सदोष व कांहीं निर्दोष असे मानिले पाहिजेत. आजपर्यंतच्या कबूल झालेल्या शास्त्राप्रमाणें सुद्धां वरील बौधायनाच्या पुनर्भूचे दोन वर्ग केले जातात. एक पहिल्या तिहींचा व दुसरा राहिलेल्या चोहोंचा. असे वर्ग न केल्यास वाग्दानांतर ज्या कन्येचा पति मृत अगर दूषित होईल ती व भुक्त अगर गर्भिणी स्त्री या दोघींचीही एकच स्थिति होऊन दोघींपैकीं कोणतीचाही पुनर्विवाह झाला असतां ती पुनर्भूच्या दोषास सारखीच पात्र होईल. परंतु असा अर्थ करणें, हें अगदीं गैर असून तो टीकाकार, निबंधकार व आधुनिक शास्त्री यांसही असंमतच आहे.

पुनर्विवाहनिषेधक पक्षाकडील मंडळी सप्तपदीपर्यंत कन्येचा दुसऱ्या पतीशीं विवाह झाला असतां तिला पुनर्भूत्वाचा दोष लागत नाहीं, असें कबूल करितात. ते म्हणतात कीं, बौधायनवचनाप्रमाणें मनोदत्तेपासून प्रसूतेपर्यंत सर्व प्रकारच्या स्त्रिया पुनर्विवाहित झाल्या असतां, पुनर्भूत्वाच्या दोषास पात्र आहेत, असें जर म्हटलें, तर खालील नारद व याज्ञवल्क्य यांच्या वचनांशीं बौधायनवचनांची एकवाक्यता होत नाहीं. तीं वचनें अशीं:—दत्तान्यायेन यः कन्यां वराय न ददाति ताम् । अदुष्टश्चेद्वरो राज्ञा स दण्ड्यः; नारद ' सकृत् प्रदीयते कन्या हरंस्तां चोरदण्डभाक् दत्तामपि हरेत् कन्यां श्रेयांश्चेद्वर आव्रजेत्—याज्ञवल्क्य; यासाठीं त्यांचें असें म्हणणें आहे कीं, सप्तपदीपर्यंत पुनर्दान अथवा पुनर्विवाह केल्यास

हरकत नाहीं. विज्ञानेश्वरांचेंही असेंच मत आहे. ‘ सकृदेव कन्या प्रदीयते ’ या वचनास चांगला वर मिळाला तर पुनर्दान करावें, असा जो अपवाद आहे तो सप्तपदीच्या पूर्वी घ्यावयाचा, पुढें नाहीं, असें ते ह्मणतात. धर्मसिंधुकारही याच मताचे अनुवादक आहेत. शास्त्रामध्यें दत्ताप्रदानिकाविषयीं जो निषेध आहे तो सप्तपदी झाल्यानंतर मानावयाचा असें त्यांचें मत आहे. ‘ सकृत् कन्या प्रदीयते ’ व ‘ न दत्वा कस्यचित्कन्यां पुनर्दद्यात् विचक्षणः । दत्वा पुनः प्रयच्छन्हि प्राप्नोति पुरुषोनृतम् ’ या मनुवाक्यांचा जर शब्दार्थच घेतला, तर एकदां वाग्दान झालें ह्मणजे पुनः त्या कन्येचें दान वर्ज्य आहे असा अर्थ होतो ; परंतु तसा अर्थ केल्यानें वरील नारद व याज्ञवल्क्य वचनांशीं त्यांचा विरोध येतो, यासाठीं ‘ पाणिग्रहणिका मंत्रा नियतं दारलक्षणम् । तेषां निष्ठातु विज्ञेया विद्वद्भिः सप्तमे पदे ॥ या वचनाच्या आधारानें सप्तपदीपर्यंत पुनर्दानाची मोकळीक मानिली आहे.

याप्रमाणें नारद व याज्ञवल्क्य यांच्या वचनांशीं विरोध येतो ह्मणून निषेधक पक्षाकडील मंडळी जर सप्तपदीपर्यंत पुनर्दानाची सशास्त्रता कबूल करण्यास तयार आहेत, तर तशाच कारणासाठीं ती सीमा त्यांनीं कां उल्लंघूं नये तें समजत नाहीं. जशीं वर दर्शित केलेलीं नारद-याज्ञवल्क्यांचीं पुनर्दानविषयक वचनें आहेत तशीं तद्विषयक इतर स्मृतिकारांचींही खालील वचनें आहेतः— ‘ स तु यद्यन्यजातीयः पतितः क्लीबएवच । विकर्मस्थःसगोत्रो वा दासो दीर्घामयोऽपिवा । ऊढापि देया सान्यस्मै सहाभरणभूषणा ॥ कात्यायन. कुलशीलविहीनस्य षण्डादिपतितस्यच । अपस्मारिशविधर्मस्थरोगिणां वेशधारिणाम् दत्तामपि हरेत् कन्यां सगोत्रोढां तथैव च ॥ वसिष्ठ.

पुनर्दान करणें, हें कोठपर्यंत सशास्त्र आहे, हें या सर्व वचनांची एकवाक्यता झाल्यावांचुन ठरवितां येणार नाहीं. कोणताही शास्त्रार्थ काढणें झाला तरी ज्या विषयासंबंधें तो काढणें असेल तद्विषयक सर्व वचनांची एकवाक्यता झाल्याशिवाय तो निघत नाहीं. असें निषेध पक्षाकडील मडळीनेंच गृहीत घेतलेलें आहे. पुनर्दानसंबंधाच्या वरील सर्व वाक्यांची एकवाक्यता करावयाची ह्मटली ह्मणजे पुनर्भूत्वाची सीमा सप्तपदीच्या

पलीकडे ढकलल्याखेरीज ती होत नाहीं, हें त्या वचनांवरून सहज ध्या-नांत येईल.

आतां कांहींचें ह्मणणें आहे कीं, कैमुतिकन्यायानें या वचनांतील ऊढा या शब्दाचा अर्थ वाग्दत्ता यापेक्षां जास्त करूं नये. कारण सप्तपदीनें भा-र्यात्व स्थापित होतें, असें मनूनीं सांगितलें आहे, तेव्हां ऊढा शब्दाचा अर्थ त्या मर्यादेच्या पलीकडे नेणें, हें बरोबर होणार नाहीं. परंतु यावर आमचें असें ह्मणणें आहे कीं, ऊढा या शब्दाचा तसा अर्थ करण्याची आह्मांस जरूर दिसत नाहीं. निर्णयसिंधुकार, कमलाकर भट्ट, यांनीं हीं वचनें लावि-तांनाही तो तसा केला नाहीं आणि तो तसा करून वरील वचनांचा जरी निकाल लाविला, तरी तेवढ्यानें निषेधक पक्षाच्या मंडळींचें काम भा-गत नाहीं.

कारण वरील वचनांचा जरी त्यांनीं तसा अर्थ केला, तरी खालील नारद, शातातप, वशिष्ठ, गौतम व विश्वामित्र यांच्या वचनांची व्यवस्था कशी करावयाची हा प्रश्न बाकी राहतोच. तीं वचनें खालीं दिल्याप्रमाणें आहेत:—'उद्वाहिताऽपि सा कन्या न चेत् संप्राप्तमैथुना । पुनःसंस्कार-मर्हेत यथा कन्या तथैवसा ॥' नारद. 'वरश्चेत् कुलशीलाभ्यां न युज्येत कदाचन । न मंत्राः कारणं तत्र न च कन्यानृतंभवेत् ॥ समाच्छिद्य तु तां कन्यां बलादक्षतयोनिकाम् । पुनर्गुणवते दद्यात् ॥' शातातप 'मरणा-नंतरं भर्तुर्यद्यनाहतयोनयः । स्त्रियोविवाहमर्हंति नात्र कार्या विचारणा ॥' गौतम. 'अस्पृष्टलिंगयोनीनामाविंशतिवयस्त्रियां । पुनर्विवाहः कर्तव्यः च-तुर्षु च युगेषु च ॥' विश्वामित्र. 'पाणिग्राहे मृते बाला केवलं मन्त्रसं-स्कृता । साचेदक्षतयोनिः स्यात् पुनःसंस्कारमर्हति ॥' वशिष्ठ. या वच-नांत 'सं प्राप्तमैथुनत्व' ह्मणजे 'संभोग' ही पुनर्विवाहाला मर्यादा सां-गितली आहे; आणि 'संभोग' व सप्तपदी' यांत अंतर आहे, असें बौ-धायनानें मानिलेलें असून, वरील वचनांत 'उद्वाहिताऽपि सा कन्या नचेत् संप्राप्तमैथुना' ह्मणजे 'कन्या जरी विवाहित' असली तरी जर ती 'सं-प्राप्तमैथुना नसेल' ह्मणून जें लिहिलें आहे, त्यावरूनही तें स्पष्ट होतें. तेव्हा वरील वचनें 'सप्तपदी' व 'संभोग' यांच्या मध्यंगत कालास लागतात, हें सांगावयास नको.

आतां हीं वचनें नियोगपर लावावीं, असें जर कोणी ह्मणेल, तर तें बिलकूल चालणार नाहीं. कारण ' संस्कारमर्हति ' ' यथा कन्या तथैव सा ' ' नच कन्याऽनृतं भवेत् ' वगैरे ज्या उक्ती वरील वचनांत आहेत त्यांच्याशीं या सुचनेचा विरोध येतो. कारण, नियोगाला संस्काराची आवश्यकता नाहीं, आणि कन्यानृताच्या भीतीचें निरसन करण्याचेंही कारण नाहीं. तसेंच ' यथा कन्या तथैव सा ' ह्या वाक्यानें ती पुनर्दान करण्यास योग्य होते. कारण, मनूनें ' कन्या देया न तु अकन्या ' असें सांगितलें आहे. व नारदांनींहि अशा स्त्रीस कन्यात्व सांगून, मैथुनाची अपेक्षा केली आहे. ह्यावरून हीं वचनें सप्तपदी व संभोग ह्यांचे मध्यंगत कालास लागतात; हें निर्विवाद आहे. व असाच मेधातिथि आणि कुल्लूक भट्ट यांनींही ह्या वाक्यांचा अर्थ केला आहे. तेव्हां शेवटीं असें ठरतें कीं, जसा वचनबलानें बौधायन, याज्ञवल्क्य, नारद, वशिष्ठ व मनु यांच्या पुनर्भूविषयक वचनांचा धर्मसिंधूकारांनीं व इतरांनीं सप्तपदीपर्यंत संकोच केला आहे, तसा तो वचनबलानें संभोगापर्यंत केला पाहिजे. आणि हें एकदां पत्करिलें, म्हणजे संभोगापर्यंत स्त्रीचा सकारण पुनरुद्वाह झाला असतां, पुनर्भूत्वाच्या दोषास ती पात्र होत नाहीं.

आतां कांहींचें म्हणणें असें आहे कीं, पुनरुद्वाह वैध असेल, ह्मणजे विधिप्रमाणें झाला असेल, तर तो केव्हांही झाला असला, तथापि स्त्रीस पुनर्भूत्वाचा दोष प्राप्त होत नाहीं. ते ह्मणतात कीं, असा जो दोष येतो, तो पुनःसंबंध अवैध झाला असेल—म्हणजे विधिप्रमाणें झाला नसेल, तरच प्राप्त होतो, आणि याला ते खालील मनु, वशिष्ठ, ब्रम्हपुराण इत्यादि वचनांचा आधार दाखवितात. तीं वचनेः— ' या पत्या वा परित्यक्ता विधवा च स्वयेच्छया । उत्पादयेत् पुनर्भूत्वा स पौनर्भव उच्यते मनु. ' या क्लीबं पतितं उन्मतं वा भर्तारमुत्सृज्यान्यं पतिं विन्दते । मृतेव सा पुनर्भूर्भवति ' वशिष्ठ. ( या वचनांत मृतेव हें पद चांगलें बसत नाहीं. असो. ) तसेंच ' मृते भर्तरि या नारी त्यक्तवत्यथ तं स्वयम् । सवर्णाच्चनयेद्गर्भं भर्तुःपौनर्भवं सुतम् ॥ यदि सा बालविधवा बलात्त्यक्ताऽथवा क्वचित् । तदा भूयस्तु संस्कार्या गृहीता येन केन चित्

ब्रह्मपुराण इ० त्यांचें ह्मणणें असें कीं, जेव्हां स्त्री, सकारण कां होईना, परंतु आपणच होऊन कामवासनेनें दुसऱ्याजवळ संबंध करिते, तेव्हां ती पुनर्भूत्वाच्या दोषास पात्र होते. परंतु जिचा संबंध दांडगाईचा नसून, संस्कारानें झाला आहे, ती पुनर्भूचे लक्षणांत मुळींच पडत नाहीं. परंतु हें त्यांचें ह्मणणें खालील नारद व याज्ञवल्क्य यांच्या वचनांशीं जुळत नाहीं. पुनर्भूत्वाचा दोष हा संस्काराचे अभावावर अगर सद्भावावर अवलंबून ठेवून चालत नाहीं, हें ' अक्षता वा क्षता वाऽपि पुनर्भूः संस्कृता पुनः ' या याज्ञवल्क्यांच्या वचनावरून व ' कन्यैवाक्षतयोनिर्या पाणिग्रहणदूषिता । पुनर्भूः प्रथमा प्रोक्ता पुनःसंस्कारमर्हति ॥' या नारदवचनावरून स्पष्ट होईल; कारण, यांत स्त्रीला संस्कृता असूनही पुनर्भूत्व सांगितलें आहे. तेव्हां वैधपुनर्विवाह केव्हांही झाला तरी पुनर्भूत्वाचा दोष त्यास लागत नाहीं, असें जर मानलें, तर हीं वचनें व्यर्थ होतील, व तसेंच बोधायनवचनही अगदीं व्यर्थ जाईल. स्त्री प्राप्तमैथुना असो अगर नसो, वैधपुनर्विवाहास पुनर्भूत्वाचा दोष कधींच लागत नाहीं, असें ह्मणणारांचे प्रतिपादनास दुसरी अशी एक नड आहे कीं, असंस्कृतत्व हेंच जर पुनर्भूचें अवश्य लक्षण मानिलें, तर पुनर्भू व स्वैरिणी यांमध्यें भेद मुळींच राहत नाहीं. परंतु तो याज्ञवल्क्य व नारद यांनीं केला आहे. व तसेंच मनूंनीं पौनर्भव, कुण्ड, गोलक, असे जे पुरुषांचे प्रकार केले आहेत, त्यांमध्यें भेदाचें कारण उरत नाहीं. जर स्त्री विवाहाची अपेक्षा न करितां अन्य पुरुषाशीं संबंध करील, तर त्या पुरुषाला जार ह्मटलें पाहिजे, व त्याची संतति जारज ह्मणजे कुण्ड अथवा गोलक होईल ( मनु–' अमृते जारजः कुण्डो मृते भर्तरि गोलकः ' ). परंतु पुनर्भूचीं अपत्यें जारजांत समाविष्ट होत नाहींत. तीं क्षेत्रजांत कदाचित् पडतील. तेव्हां अशा रीतीनें पुनर्भू शब्दाची व्याख्या केली ह्मणजे एक तर प्रत्यक्ष वचनविरोध येतो व दुसरें कांहीं स्मृतिवचनांचें स्वारस्य व सार्थकता जाते. हें इष्ट नाहीं, व असें प्रतिपादन वर सांगितलेल्या नारद, कात्यायन, वसिष्ठ, इत्यादिकांचे वचनांतील ' न चेत् संप्राप्तमैथुना ' वगैरे स्पष्ट सांगितलेल्या सीमेचें उल्लंघन करितें.

यासाठीं दोन्ही पक्षीं विचार पाहतां, सदोष पुनर्भूत्वाची मर्यादा संभोगापासून सुरू होते, असें ह्मणणें सयुक्तिक दिसतें; आणि ह्मणून जो-

पर्यंत स्त्री अक्षतयोनि आहे, तोंपर्यंत निर्दिष्ट आपत्ति प्राप्त झाली असतां, तिला पुनरुद्वाह करण्यास शास्त्रसंमति आहे, त्यापलीकडे मात्र नाहीं, असें शेवटीं ठरतें.

आतां, कांहीं ह्मणतात कीं, अक्षतयोनीचा अर्थ आसाप्तपदीक करावाः ह्मणजे सप्तपदीपर्यंत स्त्री अक्षतयोनि असतेच, तेव्हां तेथपर्यंत आपत्ति प्राप्त झाली असतां, तिचा पुनरुद्वाह करितां येईल, असें मानावें. ह्मणजे 'तेषां निष्ठा तु विज्ञेया विद्वद्भिः सप्तमे पदे' असें जें मनुवचन आहे, त्याला बाध येणार नाहीं. परंतु तसा अर्थ करण्याची जरूरी दिसत नाहीं. विवाहमन्त्रांची निष्ठा सप्तपदीच्या ठिकाणीं होते, असें जें मनुवचन आहे, तें या प्रसंगीं मुळींच लागत नाहीं. कारण, सर्व मनुवचनांमध्यें, एकदां वाग्दान झालें ह्मणजे त्यानंतर पुनर्दानाचा संभव नाहीं, असा अर्थ असतां त्या वचनांना निषेधपक्षाकडील मंडळी जर फक्त दोषाभावें ह्मणजे पति दूषित अगर मृत झाला नाहीं, तर मान देतात, तर मग वरील 'तेषां निष्ठा तु विज्ञेया विद्वद्भिः सप्तमे पदे' या सप्तपदीच्या वचनालाही तोच नियम कां लावूं नये ? एका वचनाचा अर्थ करण्याला जो नियम लावावयाचा, तोच सर्व वचनांचा अर्थ करण्यासही लागू केला पाहिजे. वर सांगितलेल्या स्मृतिवचनावरून काढलेला सिद्धांत—ह्मणजे सप्तपदी झाल्यानंतर कारण उत्पन्न झाल्यास स्त्रीचा पुनर्विवाह विहित आहे—हा सिद्धांत निर्णयसिंधुकार कमलाकर भट्ट यांसही संमत आहे. वाग्दत्ता कन्या मन्त्रोपनीता नसतांना जर गतभर्तृका झाली, तर तिचे पित्यानें पुनर्दान करणें, हें सशास्त्र आहे, असें दाखवून, ते पुढें लिहितातः-यत्तु नारदः— 'उद्वाहितापि सा कन्या न चेत् संप्राप्तमैथुना । पुनःसंस्कारमर्हेत यथा कन्या तथैव सा ॥' इति । यच्च कात्यायनः, 'वरो यद्यन्यजातीयः पतितः क्लीब एव च । विकर्मस्थः सगोत्रो वा दासो दीर्घामयोपि वा । ऊढापि देया सान्यस्मै सहाभरणभूषणा ॥' इति । इदं कलौ निषिद्धं । देवरेण सुतोत्पत्तिर्दत्ता कन्या न दीयते । इत्यादित्यपुराणे कलौ निषेधात् । दत्ता शब्द ऊढापरः । आतां वरील नारद आणि कात्यायन वचनांमधील ऊढा व उद्वाहिता या पदांचा अर्थ पूर्णदानपर ते करितात, हें स्पष्ट आहे. पूर्वींच वासिष्ठवचनांत पूर्णदानाच्या पूर्वींची गोष्ट सांगून पुढील वचनांत पूर्णदानानंतरची व्यवस्था ते घेतात, व ती कलिवर्ज्य आहे ह्मणून मात्र सांग-

तात. हल्लींच्या कांहीं शास्त्रीलोकांच्या मताप्रमाणें, ऊढा, उद्वाहिता या शब्दांचा अर्थ सप्तपदीच्या पूर्वी, असा जर कमलाकर भट्ट करिते, तर त्यांस नारदादिवचनांस कलिवर्ज्यांत टाकण्याचें कारण नव्हतें. तीं वचनें पूर्वीच्या वसिष्ठवचनाप्रमाणेंच पूर्णदानाच्या आधींच्या काळीं लागू घेतलीं, तर त्यांत कलिवर्ज्य असें कांहींच नाहीं. तशीं लग्नें आतांच्या काळींही सशास्त्र आहेत, असें सर्व मानीत आहेत. भट्टांनीं ऊढा पदाचा अर्थ सप्तपदीच्या आधीं असा न करितां उलटा कलिनिषेधांपैकीं दत्ता पदाचा अर्थ ऊढा असा केला आहे. यावरून भट्टांच्या मतें सप्तपदी झाल्यानंतरही पूर्व युगीं कन्येचा पुनर्विवाह सशास्त्र होता, असें स्पष्ट होतें. ( पहा. निर्णय सिंधु, पत्र २६९, मुंबई आवृत्ति. )

ह्याप्रमाणें अप्राप्तसंभोगा स्त्रीला पुनर्भू दोषाचें अप्राप्तत्व सिद्ध झाल्यानें तिच्या अपत्यांस पौनर्भव दोष प्राप्त होत नाहीं, हें वेगळें सांगावयास नको. वाग्दत्तेचा, कारणामुळें, अन्यपतीशीं विवाह झाला असतां, तिचा पुत्र जर पौनर्भव मानिला जात नाहीं, तर ह्या वरील प्रकारच्या स्त्रीचाही पुत्र पौनर्भव होऊं नये, हें उघड आहे.

* कलिवर्ज्यप्रकरण.

आतां कलिवर्ज्य धर्मप्रकरणामध्यें विधवाविवाहनिषेधक वचनें आहेत, त्यांचा विचार करणें आवश्यक आहे. तीं वचनें बहुतेक पौराणिक आहेत व पौराणिक वचनें याज्ञवल्क्यादींच्या मतानें स्मृतिवचनांपेक्षां दुर्बल आहेत. तेव्हां 'कलौ पाराशरः स्मृतः' या वचनानें कलिप्रमाण जी पराशरस्मृति त्या स्मृतीप्रमाणें जर आपत्कालीं स्त्रीचा पुनर्विवाह विहित आहे, तर तिजला पुराणवचनांचा बाध येऊं नये. पराशरस्मृतीमध्यें अमुकच कालपर्यंत पुनर्विवाह विहित आहे, असें सांगितलें नाहीं, व त्या स्मृतीमध्यें पौनर्भव व पुनर्भू यांविषयीं उल्लेखही नाहीं. यास्तव कलियुगामध्यें पुनर्विवाहास तो केव्हांही केला असतां, दोष नाहीं, असें मानिलें पाहिजे. बरें, दुसरें असें जरी ह्मटलें कीं, पराशरवचन इतर स्मृतिवचनांच्या बलानें अक्षतयोनिपरच लावणें जरूर आहे, तरी निदान इतकें त्याजपासून निघतें कीं, त्या कालापर्यंत तरी कलियुगामध्यें पुनर्विवाहास बाध नाहीं. आतां पुराणवचनें हीं स्मृतिवचनांपेक्षां बलवत्तर आहेत, असें घेऊन चाललें, तरी

एकवाक्यतेच्या नियमानें त्यापासून जो अर्थ निघतो, तो पाहिला असतां, एकवाक्यतेच्या नियमानें अक्षतयोनि स्त्रीच्या पुनर्विवाहास बाध नाहीं, असें दिसून येतें. हीं कलिनिषेधक वचनें खालीं लिहिल्याप्रमाणें आहेतः— ' ऊढायाः पुनरुद्वाहं ज्येष्ठांशं गोवधं तथा। कलौ पंच न कुर्वीत भ्रातृजायां कमंडलुम् ' ॥ हेमाद्रि. ' दत्तायाश्चैव कन्यायाः पुनर्दानं परस्य च ॥ बृहन्नारदीय पुराण. ' स्त्रीणां पुनर्विवाहस्तु देवरात्पुत्रसंततिः ॥ ब्रह्मपुराण. ' देवरेण सुतोत्पत्ति र्दत्ता कन्या न दीयते ' आणि ' बालायाः क्षतयोन्यास्तु वरेणान्येन संस्कृतिः ॥ ' आदित्यपुराण. या वचनांतील ' दत्ता ' या पदाचा अर्थ जसा सरळ दिसतो, तसाच करावयाचा म्हटला म्हणजे एकदां कन्या दत्ता झाली कीं तिचा पुनर्विवाह मुळींच करितां येत नाहीं, असें कबूल केलें पाहिजे. परंतु हा अर्थ चुकीचा आहे, कारण तो रूढीच्या विरुद्ध असून, त्यानें वरील वचनांची एकवाक्यता राहत नाहीं. यासाठीं ' दत्ता ' या पदाचा अर्थ केवळ ' दिलेली ' असा न करितां, तो कमलाकर भट्ट करितात त्याप्रमाणें ' ऊढा ' म्हणजे ' विवाहिता ' असाच केला पाहिजे. तसेंच वरील वचनांतील हेमाद्रि व बृहन्नारदीय पुराणांतील वाक्यें हीं साधारण नियामक समजून, आदित्यपुराणांतील वाक्यें हीं विशेषनियामक धरिलीं पाहिजेत. कारण, तसें न मानल्यास त्या वाक्यांना स्थल राहत नाहीं. यासाठीं निर्दिष्ट वचनांवरून आदित्यपुराणांतील उक्तीप्रमाणें, क्षतयोनीचा पुनर्विवाह कलियुगांत वर्ज्य आहे, परंतु अक्षतयोनीचा शास्त्रसंमतच आहे, असें मानणें जरूर आहे.

ही कलिवर्ज्य धर्मसंबंधीं विचारसरणि ध्यानांत आणिली असतां, एक शंका उत्पन्न होते ती अशीः—जर प्राप्तसंभोगा स्त्रीचा पुनर्विवाह कलीमध्यें निषिद्ध आहे, तर अशा स्त्रीचा पुनर्विवाह अन्ययुगीं संमत होता, असें ध्वनित होतें. व माझ्या आतांपर्यंत केलेल्या प्रतिपादनावरून हा विवाह पूर्व युगींही सशास्त्र नव्हता, असें सिद्ध झालेलें आहे. तेव्हां ह्या दोन गोष्टी परस्परविरोधी होतात. व त्यांतील एकीची सत्यता कबूल केली, तर दुसरी असत्य ठरते. अनियत विधवाविवाह प्रथम संमत होता, असें म्हटलें म्हणजे पुराणगत वाक्यांचें समर्थन होतें. पण तो असंमत

होता असें ठरविलेलें वाचां जातें. बरें, विधवाविवाह अक्षतयोनि स्त्रीचाच पूर्व कालीं संमत होता, असें ह्मटलें तर पुराणांतील वचनांचा विचार नीटसा जुळत नाहीं. ही स्थिति टाळण्यास एक मार्ग आहे. तो हा कीं, कालिवर्ज्य ह्मणून ज्या गोष्टी सांगितल्या आहेत, त्या युगांतरीं तशाच होत्या, असें न समजणें. अमुक अमुक कामें कलीमध्यें करूं नयेत, असें सांगितल्यानें तीं कर्में अवश्यमेव कलीच्या अगोदरच्या युगांत केलीं जातच असत, असें मानण्यास आधार नाहीं. शिवाय, अन्ययुगीं जी गोष्ट रूढ नव्हती, तीच गोष्ट कलीमध्यें करूं नये, असें सांगितल्याचें आपणांस आढळतें. उदाहरणार्थ, ब्रह्मपुराण—' स्त्रीणां पुनर्विवाहस्तु देवरात्पुत्रसंततिः। स्वातंत्र्यं न कलियुगे...॥' यांत स्त्रीस्वातंत्र्य कलींत नसावें ह्मणून सांगितलें, पण पूर्वीही नव्हतें. असें आपणांस पक्कें माहित आहे, कारण 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' वगैरे अनेक वाक्यें त्यासंबंधानें आपल्यास स्मृतींतून आढळतात. ह्या दृष्टीनें पाहिलें असतां, प्राप्तसंभोगा स्त्रीचा पुनर्विवाह कलिवर्ज्यांत घातलेला आहे, ह्मणून तो पूर्वकालीं विहित होता, असें मानण्याची जरूरी नाहीं.

बरें, यदाकदाचित् हा पुनर्विवाह वर्ज्य असें ह्मणून चाललें, तरी ज्याप्रमाणें, संन्यासग्रहण कालिवर्ज्य असतां, आचार्यांनीं तें स्थापित केलें, त्या प्रमाणें असा पुनर्विवाह आचार्यांना संमत वाटल्यास स्थापित करितां येईल. संन्यासग्रहणाच्या उक्ततेप्रमाणेंच अप्राप्तमैथुना स्त्रीच्या पुनर्विवाहाची उक्तता श्रीस स्मृतींत सांपडणारी आहे; व जर अशा स्त्रियांस पुनर्विवाहाची मोकळीक असणें, ही गोष्ट समाजास इष्ट आहे, व प्रत्येक मनुष्यास त्यांचे शोचनीय स्थितीची कळकळ येऊन दुःख होतें, तर ती मोकळीक हल्लींचे धर्माधिकारी आचार्य व विद्वान् शास्त्रीमंडळ यांनीं द्यावी, हें योग्य आहे.

उपसंहार.

वरील मजकुरावरून असा सिद्धांत ठरतो कीं, शास्त्रारीत्या स्त्री जेथपर्यंत अक्षतयोयोनि—ह्मणजे अप्राप्तमैथुना आहे—तेथपर्यंत तिचा, शास्त्रानिर्दिष्ट कारणें उपस्थित झालीं असतां, ह्मणजे पति नष्ट अगर मृत अगर पातित अगर क्लीब झाला असतां, पुनर्विवाह उक्त आहे, व तसा झाला असतां, त्या स्त्रीस कांहीं दोष लागत नाहीं. इतर

स्त्रियांप्रमाणेंच ती राहते, व तिची प्रजा इतर ज्या स्त्रियांचें एकदांच दान झालें आहे, त्यांचे प्रजेप्रमाणेंच निर्दोषी असते. हा सिद्धांत, पुणें मुक्कामीं वादामध्यें विष्णुशास्त्रिप्रभृति मंडळीनें जो पक्ष उचलिला होता तो, व त्याविरुद्ध निषेधवादी शास्त्री यांनीं जें प्रतिपादन केलें तें, या दोहोंशींही मिळत नाहीं. वरील सिद्धांत हा त्या दोघांच्या प्रतिपादनाचा मध्यवर्ती आहे, हें वरील लेखावरून दिसून आलें असेलच.

हा विषय बराच विस्तृत आहे, तेव्हां त्याचें लहानशा निबंधामध्यें संपूर्ण विवेचन करणें अशक्य आहे. तथापि जितकें करवेल तितकें करून शास्त्रसिद्धांत थोडक्यांत सांगितला आहे. विनंति इतकीच आहे कीं, प्रत्येकानें ह्याचें निरभिमानपणानें मनन करून आपली खात्री करून घ्यावी, व वर लिहिलेला सिद्धांत खरा वाटत असल्यास तो अमलांत आणण्यास झटावें. प्रस्तुत विषय 'पुनर्विवाहविषयीं शास्त्रार्थ' हा आहे, यास्तव ह्यांत दुसऱ्या विचारांस स्थान दिलें नाहीं.

कित्येक लोकांस हा निघालेला सिद्धांत अप्रिय होईल हें खरें. परंतु जें ह्मणून खरें आहे तें प्रिय असो किंवा अप्रिय असो, प्रत्येक प्रांजलबुद्धीचा मनुष्य ग्रहण करील, अशी उमेद आहे. हा निबंध लिहिण्यांत केवळ सत्यान्वेषण हाच उद्देश आहे, यास्तव हाच सिद्धांत ठरला पाहिजे, असा आग्रह नाहीं. परंतु वरील प्रतिपादनावरून हाच सिद्धांत जर खरा ठरत आहे, तर कित्येकांस अप्रिय होईल ह्मणून त्याच्या उपपादनाच्या संबंधानें भीरुता अंगीकारणें प्रशस्त होणार नाहीं. आतां, जर हा सिद्धांत कित्येकांस मनापासून सकारण चुकीचा वाटत असेल, तर त्यांस एवढीच विनंति आहे कीं, केवळ उपहास न करितां, त्यांनीं लेखनद्वारा आपलीं कारणें प्रगट करावीं, व अशा रीतीनें वादे वादे तत्वबोधाचा उदय होइल, असें करावें.

समाप्त.

वा. नि. ८९/२

# पुनरुद्वाह.

आज पुनरुद्वाह या विषयावर चार शब्द बोलण्याचें मीं योजिलें आहे.

उपोद्घात.

कोणी असा प्रश्न करील कीं, हा विषय श्रोत्यांस कांहीं नवीन नाहीं, यावर आज २० वर्षे एकसारखी चर्चा सुरू आहे, असें असतां उगाच पुनः पुनः तोच तोच विषय घेऊन त्याचें पिष्टपेषण करण्यांत अर्थ काय? तरी त्यावर माझें असें उत्तर आहे कीं, जरी आज २० वर्षे या विषयासंबंधानें बरीच भवति न भवति झाली आहे, तरी शास्त्रांत त्याबद्दल काय सांगितलें आहे, हें पुर्तेपणीं पाहून, ती झालेली असल्याचें दिसत नाहीं. पुण्यास श्रीसन्निध जी वाटाघाट झाली व तसेंच अलीकडे मद्रास, बंगाल या ठिकाणीं ज्या चर्चा झाल्या त्या पुनरुद्वाह शास्त्रसंमत आहे कीं नाहीं, यात्र मुद्यावर झाल्या खऱ्या; तथापि त्यांतही या विषयाचा निर्णय करितांना शास्त्रदृष्ट्या ज्या ज्या गोष्टींकडे लक्ष पोंचविलें पाहिजे, त्या सर्वांकडे तें यथायोग्य पोंचविण्यांत आलें होतें, असें वाटत नाहीं. केवळ लोकव्यवहारदृष्ट्याच या विषयाचें बरेंच विवेचन होऊन आज पुष्कळ वर्षे झालीं. हिंदुस्थान सरकारांनेंही पुनरुद्वाह कायदेशीर ठरवून टाकिला आहे, व त्याचा प्रसारही होऊन बरींच वर्षे झालीं आहेत. परंतु आपले लोकांची समजूत, पुनरुद्वाह हा शास्त्रविरुद्ध आहे, अशी दृढ असल्या कारणानें अद्याप लोकांत त्या कायद्यापासून व्हावा तसा फायदा झालेला निदर्शनास येत नाहीं, ही मोठी शोचनीय गोष्ट आहे. अशी एक आख्यायिका आहे कीं, पेशवाईतील प्रसिद्ध **परशुरामपंत भाऊ पटवर्धन** यांच्या कन्येला फार अल्पवयांत जेव्हां वैधव्य प्राप्त झालें, तेव्हां त्या वेळच्या पुण्यांतील विद्वानांनीं तिचा पुनरुद्वाह करण्याविषयीं शास्त्राधार दाखवून, तसें करण्यास आपली संमति दिली. जर वरील पुणें वगैरे तीन ठिकाणच्या वादांत या विषयासंबंधानें शास्त्रदृष्ट्या ज्या ज्या गोष्टींचा विचार केला पाहिजे त्या सर्व गोष्टींचा विचार पूर्णपणें झाला असता, तर त्यांपैकीं एका वादांतील निर्णय तरी वरील आख्यायिकेशीं जु-

ळला असता, असें आह्मांस बहुतेक खात्रीनें वाटतें; कारण पेशवाईंतील विद्वानांचा निर्णय चुकीचा होता, आणि वरील वादांत झाले ते मात्र खरे, असें ह्मणण्यास कांहीं आधार नाहीं; कारण त्या वेळचे पंडित हल्लींच्या शास्त्रिमंडळीपेक्षां विद्वत्तेंत कमी होते, अशी कल्पनाही करणें हास्यास्पद होईल. बरें धर्मबंधन पाहूं गेलें तर तेंही पूर्वीपेक्षां हल्लींच शिथिल आहे; तेव्हां वरील वादांत शास्त्रदृष्ट्या सर्व गोष्टींचा विचार पुर्तेपणीं झाला नसावा, असें अनुमान करणें भाग पडतें. या आख्यायिकेशिवाय अलीकडेही उत्तर हिंदुस्थानांत एक दोन ठिकाणीं पुनरुद्वाह शास्त्रसंमत आहे, असा निर्णय झालेला माझ्या वाचण्यांत आलेला आहे; तेव्हां याप्रमाणें या विषयासंबंधीं ज्यापेक्षां भिन्न मतें पडलेलीं आहेत व अजून कोणताच पक्ष बहुमतानें स्वीकारिलेला नाहीं, त्यापेक्षां अजून या गोष्टीचा निर्णय होणें बाकी आहे, असें मला वाटतें. यासाठीं यासंबंधानें मीं जी माहिती मिळविली आहे तिजवरून मला कोणता निर्णय खरा दिसतो तो आपणांस कळवून, चूक असल्यास ती समजावून घ्यावी, एतदर्थ आजचा विषय, बराच जुना असतांही, मी हातीं धरिला आहे.

---

वा.नि. ६

# नियोग व पुनरुद्वाह.

नियोग ह्मणजे काय व त्यांत व पुनरुद्वाहांत भेद कोणता.

प्रस्तुत विषयाचे विवेचनास आरंभ करण्याबरोबरच एक सर्वसाधारण गैरसमज दृष्टीस पडतो. त्याचें प्रथमतः निरसन करून टाकणें सोईचें होईल. यासाठीं आधीं तें करून नंतर प्रधानविषयास प्रारंभ करूं. हल्लीं बऱ्याच शास्त्रानभिज्ञ लोकांचा असा समज आहे कीं, पुनरुद्वाह हा एक नियोगाचा पोटभेद आहे आणि त्यामुळें कांहींचें असें ह्मणणें आहे कीं, प्राचीन कालीं जर आर्य लोकांमध्यें नियोगाची वहिवाट चालू होती, व त्यांस ती मान्य होती, तर आतां ती अमलांत आणण्यास प्रत्यवाय असूं नये. परंतु हें ह्मणणें चुकीचें आहे. शास्त्रदृष्ट्या पुनरुद्वाह व नियोग यांचा परस्पर बिलकुल संबंध नाहीं. नियोग ह्मणजे नियोजित अथवा नेमून दिलेल्या पुरुषाशीं ( पतिव्यतिरिक्त ) प्रजोत्पादनासाठीं स्त्रीचा संबंध. या संबंधाला पुनरुद्वाहाप्रमाणें दान व संस्कार हे विधी सांगितले नाहींत. पुनरुद्वाह करणाऱ्या ह्मणजे गतभर्तृकेशीं विवाह करणाऱ्या पुरुषाप्रमाणें नियोजित पुरुषाला भर्ता अथवा पति असें ह्मणत नाहींत. पुनरुद्वाहापासून गोत्रभेदादि परिणाम होतात; ते नियोगापासून होत नाहींत. पुनरुद्वाह चिरस्थायी आहे, पण नियोग वंशवर्धनासाठीं एक पुत्रप्राप्ति होईपर्यंत करावयाचा असून तो दीर अथवा सपिंड यांजपाशींच केला पाहिजे, अशी शास्त्राची आज्ञा दिसते. ( प० मनु अध्याय ९ श्लोक ५९ ते ६४ व ७० ). तसेंच कलिनिषिद्धधर्मामध्यें सुद्धां नियोग आणि पुनर्विवाह यांचा भेद दाखविलेला आढळतो. जसें 'स्त्रीणां पुनर्विवाहस्तु देवरात्पुत्रसंततिः' वगैरे; शिवाय मनूनें नियोगाचा विधि निंद्य मानिला आहे, व तो बहुतकरून साधुविगर्हित आहे. नियोगाचा हेतु केवळ पुत्रप्राप्तीच असल्यामुळें तो मृतभर्तृकेचाच होत असे असाही नियम नव्हता. ( प० आदिपर्व अ. १२२ पा० १४७ तसेंच याज्ञवल्क्य आचार. ६८।६९ ).

सारांश, कुटुंबांतील विधवेस पुन्हा लग्न करावें न लागतां, प्रजोत्पादन करितां यावें, हा नियोगाचा उद्देश होता; आणि बऱ्याच अंशीं अविभक्त कुटुंबांत विधवेचे जे हक्क आहेत, त्यांमधीलच तो असावा, असें दिसतें. तिला जसें कुटुंबांतील पुरुषांनीं अन्नवस्त्र व राहण्यास जागा देणें अवश्य आहे, तसें प्रजा करून देणेंही पूर्वकालीं अवश्य मानिलें असावें.

नियोगाचा उद्देश.

खरोखर पाहिलें ह्मणजे नियोगांत पूर्वीच्या कुटुंबनियमांचें स्वरूप दिसतें. यापेक्षां त्यापासून जास्त फलनिष्पत्ति नाहीं. पूर्वी कुटुंबांत जो कोणी मनुष्य मुख्य असे, तो कुटुंबसंबंधीं सर्व गोष्टींविषयीं मुखत्यार असल्यामुळें, व कुटुंबांतील इतर सर्व माणसांची सर्वतोप्रकारें मालकी व जबाबदारी हे दोन्ही अधिकार त्याजकडेच असल्यामुळें, व पुत्रप्राप्ति नाहीं, तर मरणानंतर सुद्धां इष्टलोकीं गति नाहीं, असा समज पूर्वी विशेष दृढ असल्यामुळें, कुटुंबांतील कोणा स्त्रीचा पति वारला ह्मणजे पुत्रप्राप्तीकरितां त्यानें तिला कोणातरी पुरुषाची योजना करून द्यावी, हें स्वाभाविक होत असे. आतां हा रिवाज पूर्वी आपणामध्यें होता ह्मणून हल्लीं असावा, असें ह्मणण्यांत कांहींच अर्थ नाहीं. फार प्राचीन कालीं इतर प्राण्यांप्रमाणें मनुष्येंसुद्धां नग्न असत ह्मणून आतांही आपण नग्न राहण्याची वहिवाट सुरू करावी, असें ह्मणणें अगदीं वेडेपणाचें होईल. घरें बांधण्याची कला मनुष्यास सुचेपर्यंत तींही रानांत पशुवत् राहत असत. ह्मणून आपलीं घरें पाडण्याचा आरंभ कोणी करील काय?

नियोग ज्या कालीं प्रचारांत होता त्या कालची लोकास्थिति.

याप्रमाणें 'पुनरुद्वाह' शास्त्रसंमत आहे कीं नाहीं, हा जो आपला प्रधान विषय त्याच्या आरंभीं जो सर्वसाधारण गैरसमज दृष्टीस पडतो त्याचें यथामति निरसन केलें. आतां प्रधान विषयाला प्रारंभ करूं.

---

## पुनरुद्वाहाविषयीं शास्त्रार्थ.

या विषयाला आरंभ करण्यापूर्वी प्रथम शास्त्र ह्मणजे काय या प्र-

भ्नाचा निर्णय झाला पाहिजे. खालील श्लोकांत याज्ञवल्क्यानें या प्रश्नाचा

**शास्त्र ह्मणजे काय?**

निकाल केला आहे. तो ह्मणतो—श्रुतिःस्मृतिःसदाचारः स्वस्य च प्रियमात्मनः ॥ सम्यक्संकल्पजः कामो धर्ममूलमिदंस्मृतम् ॥ १ ॥ ह्मणजे वेद व स्मृति हीं मुख्य धर्मस्थानें होत. त्यांत कोणत्याही गोष्टीचा निर्णय न सांपडल्यास मग सदाचार वगैरे ठिकाणें पहावयाचीं. याप्रमाणें शास्त्र ह्मणजे काय, ह्याचा निकाल झाला; परंतु एवढ्यानें आपलें काम भागलें नाहीं. इष्टार्थनिष्पत्तीसाठीं तें पहावयाचें कसें, हेंही आपणास ठरविलें पाहिजे. कोणी असा

**तें पहावयाचें कसें?**

प्रश्न करील कीं, यांत ठरवावयाचें तें काय? ज्या गोष्टीविषयीं आपणास शास्त्राची काय आज्ञा आहे, हें पहावयाचें असेल, त्या गोष्टीविषयीं जें शास्त्रांत सांगितलें असेल, ती त्याची आज्ञा. जर शास्त्रांत एका गोष्टीविषयीं एकच सिद्धांत नेहमीं असता, तर हें उत्तर बरोबर होतें; परंतु खरोखर तशी स्थिति नाहीं. त्यांत एकाच गोष्टींसंबंधानें निरनिराळीं मतें आढळतात. श्रुति व स्मृति या भिन्न भिन्न कालीं झाल्या असल्यामुळें जसजशी समाजाची स्थिति बदलत गेली तसतसा त्यांच्यांतही फरक पडत चालला; याप्रमाणें धर्मग्रंथांची स्थिति असल्यामुळें कोणत्याही विवक्षित गोष्टीविषयीं शास्त्रार्थ काढणें झाला ह्मणजे त्या गोष्टीविषयीं निरनिराळ्या ग्रंथांत जीं निरनिराळीं वचनें सांपडतात त्यांपैकीं आपण कोणतीं ग्राह्य करावीं, ह्मणजे इष्टार्थनिष्पत्तीसाठीं शास्त्र कसें पहावें, हा प्रश्न उत्पन्न होतो. यासाठीं प्रधान विषयाला प्रारंभ करण्यापूर्वीं या प्रश्नाचाही निकाल झाला पाहिजे.

वरील श्रुतिस्मृतींची स्थिति मनांत आणिली, ह्मणजे या प्रश्नाचा ऐति-

**दोन मार्ग आहेत— ऐतिहासिक.**

हासिक निकाल करणें फारसें कठिण नाहीं. निरनिराळ्या वचनांत जे फरक आढळतात ते ग्रहण करून त्यांवरून निरनिराळ्या स्मृतिकारांच्या व स्मृतींच्या संबंधानें कालाचीं अनुमानें बांधिलीं आणि त्यांवरून वर्तमानकाळीं शास्त्रसंमतक्रम कोणता, हें ठरविलें, ह्मणजे झालें. या रीतीनें शास्त्रार्थ काढण्यास शास्त्रीय रीतीप्रमाणें आपणास एकही गोष्ट गृहीत घ्यावी लागत नाहीं. सर्व स्मृती सारख्या प्रमाणाच्या आहेत, असें ह्मणावें

लागत नाहीं. सर्वच एका कालीं झाल्या, असा आग्रह धरावा लागत नाहीं; किंवा अगदीं परस्परविरुद्ध स्मृतींची सुद्धां एकवाक्यता करण्याचे प्रचंड श्रम माथीं घ्यावे लागत नाहींत. परंतु हा ऐतिहासिक मार्ग झाला. हा आमच्या शास्त्रीमंडळास मुळींच पसंत नाहीं. त्यांच्यांत ज्या मार्गानें शास्त्राचा अर्थ करण्याची वहिवाट आहे, तो यापासून अगदीं भिन्न आहे. या मार्गाप्रमाणें सर्व स्मृति एककालीन असून त्या सर्वांचा एकच अर्थ आहे, त्यांत मुळींच विरोध नाहीं, किंबहुना श्रुति स्मृति, पुराणें, टीकाकार, कोणीही असो, त्या सर्वांचें ह्मणणें एकच आहे, हा सिद्धांत गृहीत धरून नंतर शास्त्राचा अर्थ करावयाचा. तात्पर्य, या मार्गांत एकवाक्यता हें महा तत्व असून अर्थात् त्याचें अवलंबन झाल्याशिवाय शास्त्रार्थ व्हावयाचाच नाहीं, असा तदनुयायी मंडळीचा समज आहे.

एकवाक्यतात्मक–शास्त्रीय.

---

## ऐतिहासिक मार्गानें शास्त्रार्थ.

याप्रमाणें ऐतिहासिक व एकवाक्यतात्मक असे जे शास्त्राचा अर्थ करण्याचे दोन मार्ग वर दाखविले, त्यांपैकीं ऐतिहासिक मार्गानें पुनरुद्वाह शास्त्रसंमत आहे कीं नाहीं, हें पाहूं गेल्यास, त्याचा निर्णय फार थोडक्यांत होतो. वेदांत एखाद्या स्त्रीचा पति मृत झाला असतां तिला पुनः लग्न करण्याची मोकळीक सांगितलेली आहे. (प० ऋग्वेद, १०।७।८ वगैरे). आणि मनु, वसिष्ठ, कात्यायन, शातातप, गौतम, वैशंपायन, जाबालि, व्याघ्रपात्, यांच्या स्मृतिग्रंथांतही पुनर्विवाहविधायक वचनें सांपडतात. तसेंच पुनर्विवाहित स्त्रीपासून झालेले मुलगे, ज्यांस पौनर्भव ह्मणतात, त्यांस मनु, याज्ञवल्क्य, नारद, विष्णु इत्यादि स्मृतिकारांनीं अंशग्राहक मानिले असून, त्यांस त्यांनीं दत्तपुत्रापेक्षांही वरस्थान दिलेलें आहे. कलिवर्ज्यधर्मविषयक पौराणिक वचनांवरूनही पुनर्विवाहाची चाल आपणांत पूर्वी होती, परंतु ती अलीकडे लोपली आहे, असें ठरतें. यावरून पुनर्विवाह पूर्व कालीं शास्त्रसंमत होता, असें ह्मणण्यास तरी बिलकुल हरकत नाहीं.

आतां पुराणांत पुनर्विवाहाच्या चालीचा निषेध केला आहे, आणि कलिवर्ज्य धर्मांत तिची गणना आहे, ह्मणून सांप्रत ती शास्त्रसंमत नाहीं, असें जर कोणी ह्मणेल, तर तें बरोबर नाहीं. कारण पराशरस्मृति, जी कलियुगांत प्रधान मानावी, असें सांगितलें आहे, तींत या विधानाला अनुज्ञा आहे व स्मृतिवाक्य पुराणवाक्यापेक्षां अधिक मातब्बर मानावें, असें शास्त्रांत सांगितलें आहे, तेव्हां अन्यत्र पुनर्विवाहनिषेधक वचनें जरी असलीं, तरी वरील स्मृतींत तद्विधायक वचनें ज्यापेक्षां आहेत त्यापेक्षां अशा रीतीचा विवाह सांप्रतही अशास्त्र मानितां येणार नाहीं, हें कबूल केल्यावांचून तोड नाहीं. आतां पुनर्विवाहित विधवेला पुनर्भू ठरवून तिला व तिच्या संततीला शास्त्रांत दोष सांगितले आहेत, तेव्हां, जरी पुनर्विवाह शास्त्रसंमत आहे, असें कबूल केलें तरी, त्याचा कांहीं उपयोग नाहीं, असें जर कोणी ह्मणेल, तर त्यावर आमचें असें उत्तर आहे कीं, ते दोष आतां मानण्याची जरूरी नाहीं; कारण त्यांच्याचबरोबर दुसऱ्या ज्या गोष्टी अशुद्ध ह्मणून शास्त्रांत सांगितल्या आहेत त्या आतां आह्मीं अशुद्ध मानींत नाहीं. याज्ञवल्क्यानें रसविक्रयाचा फार निषेध केला आहे, असें असतां, तो आपण हल्लीं कोठें मानितों? असें जर आहे, तर पुनर्विवाहमात्रच आपण निषिद्ध कां मानावा? हल्लीं त्याची रूढि नाहीं, असें कोणी ह्मणेल, तर त्याला थोडा उपाय आहे. रूढि पाडली ह्मणजे झालें. याप्रमाणें ऐतिहासिक मार्गानें, पुनर्विवाह शास्त्रसंमत आहे किंवा नाहीं, याचा फार लवकर आणि सरळ असा निकाल करितां येतो. परंतु या मार्गानें अर्थवाद करण्याची आमच्या शास्त्रीमंडळांत चाल नाहीं व तो त्यांस संमतही नाहीं; तेव्हां इष्टफलसिद्धीसाठीं त्यांच्याच ह्मणजे एकवाक्यतात्मक मार्गाचेंच अवलंबन करून प्रस्तुत विषयाची जी यथामति सेवा होईल ती करण्याचा आजचा माझा प्रयत्न आहे.

---

## एकवाक्यतात्मक अथवा शास्त्रीय मार्गानें शास्त्रार्थ.

या विषयाची सध्यां अशी स्थिति आहे कीं, साधक व बाधक या

दोन्ही पक्षांकडील लोक पुराव्याचा बोजा एकमेकांवर टाकितात. साधक पक्षाकडील मंडळी असें ह्मणते कीं, पुनरुद्वाहाच्या अभावाविषयीं कोठेंही प्रमाण नाहीं; त्यावर बाधक पक्षाचे लोक असें उत्तर देतात कीं, तो विवाह असावा, असें कोठेंही दिसत नसून, त्याचा निषेध करणारीं अशीं मात्र स्पष्ट वचनें आहेत, व पुनर्विवाहित जोडप्यास दोषी ठरवून त्यास प्रायश्चित्तवचनेंही सांगितलीं आहेत. परंतु याप्रमाणें पूर्वपक्ष उत्तरपक्ष करून अजिंक्य पत्रें मिळविण्याची आमची इच्छा नाहीं. या विषयासंबंधें शास्त्रदृष्ट्या खरा निश्चय काय होतो, एवढेंच काढण्याची आह्मांस जरूरी आहे; यासीठा कोणताच पक्ष न स्वीकारतां पुनर्विवाह शास्त्रसंमत आहे किंवा नाहीं, या प्रश्नाचा बरोबर निकाल होण्यासाठीं तद्विधायक व तन्निषेधक जीं जीं प्रमाणें शास्त्रांत सांपडतील तीं सर्व सांगून नंतर त्यांवरून आमच्या मनाला निर्णय कोणता दिसतो, तें आपल्याला निवेदन करण्याचा माझा विचार आहे.

साधक पक्ष.–'नष्टे मृते' यांत सांगितलेल्या प्रसंगीं पुनरुद्वाह शास्त्रसंमत आहे.

पुनर्विवाहविधायक जीं वचनें शास्त्रांत आढळतात त्यांपैकीं 'नष्टे मृते प्रव्रजिते क्लीबे च पतिते पतौ। पञ्चस्वापत्सु नारीणां पतिरन्यो विधीयते ॥ १ ॥ ह्मणजे 'पति सांडला, मृत झाला, सन्यस्त झाला, पुंस्त्वरहित असला किंवा धर्मभ्रष्ट झाला, तर त्याच्या स्त्रीनें दुसरा पति करावा'. हें वाक्य प्रसिद्ध असून तें साधक पक्षाच्या इमारतीचा पाया आहे. हें वाक्य मनूमध्यें आहे, असें मानण्यास आधार आहे, व वसिष्ठ व नारद यांच्या स्मृतींतही तें आहे, असें मानितात. पराशरस्मृतीमध्यें तर तें स्पष्ट आढळतेंच. या वाक्यावरून वरील पांच आपत्तींपैकीं कोणतीही आपत्ति एकाद्या स्त्रीला प्राप्त झाली असतां, तिनें पुनर्विवाह करावा, असें स्पष्ट सिद्ध होतें. असें साधक पक्षाचें ह्मणणें आहे;

निषेधक पक्ष-परंतु 'नोद्वाहिकेषु' असें एक दुसरें वचन असल्यामुळें 'नष्टे मृते' नियोगपर लाविलें पाहिजे.

परंतु यावर पुनर्विवाहनिषेधक मंडळीचा असा आक्षेप आहे कीं, तुह्मी जें वचन पुनर्विवाहविधायक ह्मणून दाखवितां त्याचा तुमच्या ह्मणण्याप्रमाणें अर्थ होत नाहीं; कारण मनूनेंच 'नोद्वाहिकेषु मंत्रेषु नियोगः कीर्त्यते क्वचित्। न विवाहविधावुक्तं विधवावेदनं पुनः ॥'

ह्मणजे 'विवाहमंत्रांत नियोगाचा कोठें समावेश नाहीं, व विवाह-विधींत विधवाविवाहाचा कोठें उल्लेख नाहीं' असें ह्मटलें आहे, त्यापेक्षां तुह्मी ह्मणतां तसा वरील श्लोकाचा अर्थ न करितां मेधातिथि ह्मणतो त्याप्रमाणें तो नियोगपर लाविला पाहिजे.

उत्तर-तसें तें लागत नाहीं.

निषेधक पक्षाचा वरील आक्षेप थोडासा विचार करण्यासारखा आहे खरा. परंतु वरील वचनाची संगति लावण्याकरितां जी त्यांनीं कोटि लढविली ती, मेधातिथिसारख्या महा विद्वान टीकाकाराचा आश्रय जरी त्यांनीं धरिला आहे तरी, वडाची साल पिंपळाला लावण्यासारखी आहे, असें ह्मटल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. नियोग व विवाह यांचा जो भेद आह्मीं वर दाखविला आहे, त्यांत नियोजित पुरुषाला शास्त्रांत भर्ता किंवा पति, हीं नांवें कधींही दिलीं नसून पति हें नांव संस्कारयुक्त ज्या पुरुषाचा विवाह झाला असेल त्यालाच मात्र मिळावयाचें,असें आह्मीं दाखविलें आहे;आणि यावरून पति हें नांव ज्या पुरुषाला मिळालें त्याला नियोजित कधींही ह्मणतां येणार नाहीं, हें आपल्या सहजच ध्यानांत येईल. प्रस्तुत श्लोकांत 'पतिरन्यो विधीयते' अशी स्पष्ट उक्ति आहे. असें असतां निषेधपक्षाकडील मंडळी तो नियोगपर लावावा असें ह्मणतात याला वरील उपमा कां देऊं नये? प्रस्तुत श्लोकांत 'पति' हा शब्द आहे, तेव्हां तो श्लोक विवाहित पुरुषासंबंधेंच घेतला पाहिजे, नियोजित पुरुषाला लावितां येणार नाहीं. वरील आक्षेप ज्या वचनावरून त्यांनीं काढिला तें वचन जसें मनुस्मृतींत आहे, तसेंच दुसरेंही एक वचन त्याच स्मृतींत आहे, त्याचीही त्यांना भ्रांति पडलेली दिसते. 'सा चेदक्षतयेनिः स्याद्गतप्रत्यागताऽपिवा ॥' पौनर्भवेण भर्त्रा सा पुनःसंस्कारमर्हति " हें वचन मनुस्मृतींतच आहे आणि यावरून ( सध्यां पुनर्भूविषयक वाद बाजूला ठेवून पाहिलें असतां ) स्त्री अक्षतयोनि असेल तर तिचा दुसऱ्या पुरुषाबरोबर संस्कारयुक्त विवाह करितां येतो, असें स्पष्ट सिद्ध होतें. आतां यांत वरील श्लोकाप्रमाणें सर्व स्त्रियांना पुनर्विवाह करण्याचा अधिकार दिला नाहीं हें खरें, तथापि ज्यांना तो करण्याची मोकळीक दिली आहे त्यांच्या पुनर्विवाहाची गणना संस्कारयुक्त विवाहांत केली आहे. असें असतां वरील 'नष्टे मृते०' हा श्लोक

नियोगपर लावावा, असें सांगणें ह्मणजे केवळ साहस करणें आहे, हें सांगावयास नको.

निषे०-'साचेत्' हेंही वचन नियोगपर लावावें.

आतां यावर कोणी असें ह्मणेल कीं, येवढ्यावरूनच प्रामकालीं मनु विधवेला पुनर्विवाह सांगतो, असें ह्मणतां येणार नाहीं; कारण हें जसें मनूचें वचन पुनरुद्वाहविधायक ह्मणून तुह्मीं दाखविलें, तसेंच त्याचें वरील 'नोद्वाहिकेषु० हें तन्निषेधकही आहे; यासाठीं (संस्कार शब्दावर विशेष जोर न देतां) 'सा चेत्०' हेंही वचन नियोगपर घ्यावें; तरी त्यावर आमचें असें उत्तर आहे कीं, मनूच्या वचनांचा अर्थ केवळ त्याच्याच वचनांकडे लक्ष देऊन जर करावयाचा असता, तर निषेधपक्षाचें हें ह्मणणें बरोबर झालें असतें. परंतु या त्यांच्या आक्षेपावरून शास्त्रार्थ काढितांना ज्या महातत्वाचा त्यांनींच स्वीकार केला आहे त्याचा त्यांना विसर पडल्यासारखें दिसतें. वरप्रमाणें 'साचेदक्षतयोनिः स्यात्०' या वचनाचा जर अर्थ केला नाहीं, तर इतर स्मृतिकारांचीं जीं वाक्यें आहेत त्यांना विरोध येतो. 'साचेत्०' यांत अक्षतयोनि विधवेला जर 'पुनः संस्कार' सांगितला आहे, तर तें नियोगपर लावितांच येणार नाहीं; कारण, याज्ञवल्क्याच्या वाक्यावरून असें स्पष्ट दिसेल कीं, संस्कार व नियोग यांची अशी भेसळ कधींही होणार नाहीं. त्यांनीं नियोगपर जीं वाक्यें सांगितलीं आहेत, तीं पुनःसंस्कारवाक्यांहून अगदीं निराळीं असून त्यांचे प्रसिद्ध टीकाकार जे विज्ञानेश्वर यांनींही हा भेद पसंत केला आहे. याज्ञवल्क्य 'अक्षता वा क्षता वापि पुनर्भूः संस्कृता पुनः' असें ह्मणून नंतर खालील नियोगपर वचनें देतोः—'अपुत्रां गुर्वनुज्ञातो देवरःपुत्रकाम्यया। सपिंडो वा सगोत्रो वा घृताभ्यक्त ऋतावियात् ॥ आगर्भसंभवात् गच्छेत्०' वर जो विधवाविवाह मनूनें सांगितला तो नियोगाहून भिन्न आहे; याला दुसरें असें एक प्रमाण आहे कीं, मनूनें जे पुत्रांचे प्रकार सांगितले आहेत त्यांत क्षेत्रज ह्मणजे नियोगापासून झालेला आणि पौनर्भव ह्मणजे पुनर्विवाहित स्त्रीपासून झालेला, असे दोन प्रकार त्यांनें केले आहेत. जर वरील वचन नियोगपर लागावें, असा मनूचा उद्देश असता, तर पौनर्भवाचा क्षेत्रज वर्गांतच त्यानें समावेश केला असता. याज्ञवल्क्यस्मृति पाहू

उत्तर-तेंही तसें लागत नाहीं.

गेलें असतांही असाच भेद दृष्टीस पडतो. मनूप्रमाणें त्यांनेंही क्षेत्रज व पौनर्भव असे पुत्रांचे निरनिराळे प्रकार केले आहेत, तेव्हां 'नष्टे मृते०' व 'सा चेत्०' हीं वाक्यें नियोगपर लावितां येणार नाहींत हें उघड झालें.

निषे०-खरें.पण या तीन वचनांची परस्परएकवाक्यता होत नाहीं.

आतां कोणी असें ह्मणेल कीं, 'नष्टे मृते०' व सा 'चेत्०' हीं वचनें नियोगपर लावितां येणार नाहींत, असें जें तुह्मी ह्मणतां, तें आह्मी कबूल करितों; परंतु मनूंतील 'नोद्वाहिकेषु०' या वचनांत विवाहविधीमध्यें विधवेचा उल्लेख नाहीं, असें स्पष्ट लिहिलें आहे तेव्हां, जरी तुह्मी ह्मणतां त्याप्रमाणें 'नष्टे मृते०' व 'सा चेत्०' हीं वचनें नियोगपर न लावितां त्यांचा जसा सरळ अर्थ होईल तसा केला, तथापि त्यांची जेथपर्यंत 'नोद्वाहिकेषु०' या वचनाशीं एकवाक्यता झाली नाहीं, तेथपर्यंत साधक पक्षाकडील मंडळीला त्याचा कांहीं उपयोग नाहीं. जर ह्या वचनद्वयाच्या आधारावर स्त्रियांचा पुनर्विवाह सशास्त्र आहे, असा ते आग्रह धरूं लागले, तर आह्मी 'नोद्वाहिकेषु०' या वचनाच्या आधारानें तो अशास्त्र आहे असें ह्मणूं, आणि स्वस्थ बसूं.

उत्तर-हें ह्मणणें ठीक नाहीं. मनुवचनांची इतर स्मृतिवचनाशीं जर एकवाक्यता आहे, तर त्यांची परस्परही असलीच पाहिजे.

या निषेध पक्षाच्या आक्षेपावर आमचें असें उत्तर आहे कीं, पुनर्विवाहविषयक जर एवढींच वाक्यें शास्त्रांत असतीं, तर तें ह्मणतात त्याप्रमाणें कदाचित् आह्मींही कबूल केलें असतें. परंतु तशी गोष्ट नाहीं. या विषयासंबंधें नारद, शातातप, वशिष्ठ यांचीं अनुक्रमें खालीं लिहिल्याप्रमाणें वचनें आहेत:—'उद्वाहिताऽपि सा कन्या न चेत् संप्राप्तमैथुना। पुनःसंस्कारमर्हति यथा कन्या तथैव सा ॥ (नारद). वरश्चेत्कुलशीलाभ्यां न युज्येत कदा च न। न मंत्राः कारणं तत्र न च कन्याऽनृतं भवेत्। समाच्छिद्य तु तां कन्यां बलादक्षतयोनिकाम्। पुनर्गुणवते दद्यात्० (शातातप). 'पाणिग्राहे मृते बाला केवलं मंत्रसंस्कृता। सा चेदक्षतयोनिःस्यात्पुनःसंस्कारमर्हति' (वशिष्ठ).

आतां शास्त्रार्थ काढण्यास प्रारंभ करितांना सर्व स्मृति सारख्याच प्रमाणाच्या आहेत, व त्या सर्व एककालीन आहेत, आणि यासाठीं त्या सर्वांची एकवाक्यता झाल्याशिवाय कोणताही शास्त्रार्थ ठरत नाहीं, या ज्या

गोष्टी निषेधक पक्षाकडील मंडळीनें गृहीत केल्या आहेत, त्यांजकडे जर त्यांना दुर्लक्ष्य करावयाचें नसेल, तर वरील मनूचीं ' नष्टे मृते० ' व ' सा-चेत्० ' हीं वाक्यें त्यांच्याच ' नोद्वाहिकेषु० ' या वाक्याला अपवादक आ-हेत, ह्मणजे ' नोद्वाहिकेषु० ' या वचनांत मनूनें साधारण नियम सांगून नंतर तो नियम ' नष्टे मृते० ' यांत सांगितलेल्या प्रसंगीं आणि ' सा चेत्० ' यांत सांगितलेल्या मर्यादपर्यंत मोडतां येईल, असें सांगितलें आहे, असें ध-रल्याखेरीज दुसरा मार्ग नाहीं, हें त्यांना कबूल करावें लागेल. कारण असें जर ते कबूल न करतील, तर मनूचा इतर स्मृतिकारांशीं विरोध येतो. परंतु तें त्यांच्या वरील गृहीत सिद्धांताच्या विरुद्ध आहे. तेव्हां मनूच्या ' नोद्वाहिकेषु० ' या वाक्याला ' नष्टे मृते० ' व ' सा चेत्० ' हीं वाक्यें अ-पवादक आहेत, हें त्यांना कबूल केलें पाहिजे

निषे०--होय. पण पुनर्विवाह अमर्याद तर नाहीं, त्याला संभोगाची मर्यादा राहतेच.

यावर निषेध पक्षाकडील मंडळी जर असें ह्मणेल कीं ठीक आहे. तुह्मीं जीं इतर स्मृतिकारांचीं वाक्यें दाखविलीं त्यांवरून ' नष्टे मृते० ' व ' सा चेत्०' हीं वाक्यें ' नोद्वाहिकेषु० ' या वाक्याला अपवादक धरून ' नोद्वाहिकेषु० ' याचा अर्थ केला पाहिजे, हें आह्मीं पत्करितों, परंतु तेवढ्यानें साधक पक्षाकडील मंडळीचें काम भागत नाहीं. ते ह्म-णतात कीं, ' नष्टे मृते० ' या वचनांत स्मृतिकारानें संभोगाची इयत्ता न ठेवितां त्या वचनांत सांगितलेल्या प्रसंगीं स्त्रीस अन्यपतिविधान सांगितलें आहे, तेव्हां त्या वचनाचा सार्वत्रिकत्व अर्थ कां करूं नये ? पुणें मुक्कामीं श्रीसन्निध जो वाद झाला त्यांत विष्णुशास्त्री वगैरे साधक पक्षाकडील मंडळीचें हेंच ह्मणणें होतें. परंतु तुह्मीं जीं इतर स्मृतिकारांचीं वचनें वर दाखविलींत त्यांच्याशीं जर एकवाक्यता ठेवावयाची आहे, तर त्यावरून तसा अर्थ होत नाहीं.

उत्तर.-हें निर्विवाद आहे.

हा निषेध पक्षाचा आक्षेप आह्मी अक्षरशः कबूल करितों; जर सर्व स्मृतिवचनांची एकवाक्यता करून जो अर्थ निघेल तो काढावयाचा आहे, तर ' नष्टे मृते० ' या वचनाचा अर्थ सार्वत्रिक न घेतां ' सा चेत्० ' या अपवादक वचनाला जेवढा साजेल तेवढाच घेतला पाहिजे, हें निर्विवाद आहे.

साध०—परंतु कलियुगीं प्रधान जी पराशरस्मृति तिजवरून असा सिद्धान्त ठरत नाहीं.

यांवर साधक पक्षाकडील मंडळीकडून असा आक्षेप येण्याचा संभव आहे कीं, होय, तुह्मी ह्मणतां ती गोष्ट खरी; परंतु तुह्मांस आह्मी आधीं असें विचारतों कीं, पराशरवचन जर कलियुगीं प्रधान आहे आणि 'नष्टे मृते०' हें वचन जर पराशरस्मृतींत आहे आणि त्या वचनांत व त्या स्मृतींत दुसरें कोठेंही जर संभोगमर्यादेचा उल्लेख नाहीं, तर अन्ययुगींच्या स्मृतींचा आधार घेऊन पराशरवचनाचा तुह्मांस मानेल त्याप्रमाणें संकुचित् अर्थ करण्यास तुह्मांस काय अधिकार आहे.

उत्तर—पण हें प्रतिपादन ठीक नाहीं. पराशरस्मृतीचाही अन्ययुगीयस्मृतींप्रमाणेंच समर्याद अर्थ केला पाहिजे.

पण हें प्रतिपादन ठीक नाहीं. 'नष्टे मृते०' हें वचन मनु, नारद, वशिष्ठ, पराशर, या चारीही स्मृतींत असून पहिल्या तिहींत त्याचा वरप्रमाणें अर्थ केला आहे. तेव्हां पहिल्या तीन स्मृतिकारांनीं जो त्या वचनाचा अर्थ मानला असेल, तोच पराशराचाही असला पाहिजे, असें मानणें सयुक्तिक आहे. नाहीं तर एकच वचन पहिले तिघे स्मृतिकार एका अर्थानें बोलले व चवथा तेंच वचन, तो स्वतः आपला अर्थ निराळा आहे, असें सांगत नसतांना, दुसऱ्याच अर्थानें बोलला, अशी कल्पना करण्याची अनवस्था अर्थ करणारांना आपल्या माथीं घ्यावी लागते.

निषे०— अक्षत योनि विधवेला पुनरुद्वाहाचा अधिकार आहे असें जर असेल, तर स्मृतिकारांनीं विधवांना आचार कां सांगितले ?

आतां कोणी असें ह्मणेल कीं, तुह्मीं पुनर्विवाहविधायक पराशरस्मृतींतील एक आधार दाखविला हें खरें, परंतु पराशरानें सहगमन करणें, अगर सन्यस्त राहणें, हे आचार विधवांना सांगितले आहेत; त्यांवरून तुह्मीं वर दाखविलेल्या पुनर्विवाहविधायक उक्तीस बाध येतो, तर त्यावर आमचें असें ह्मणणें आहे कीं, ही शंका घेण्याची बिलकूल जरूरी नव्हती. विधवेनें संन्यस्त रहावें, हें चांगलें, असें पराशरानें सांगितलें खरें; परंतु

तिनें पुनरुद्वाह केला तर ती दोषी होते असें त्यानें सांगितलें नाहीं, इतकेंच नव्हे, तर 'नष्टे मृते०' या वचनांत सांगितलेल्या पांच आपत्तींपैकीं कोणतीही आपत्ति प्राप्त झाली असतां, तिनें तो करावा, असें मात्र स्पष्ट सांगितलें आहे. 'शुश्रूषेत च जीवस्थं संस्थितं न च लंघयेत् ।' तसेंच 'न तु नामाऽपि गृण्हीयात्पत्यौ प्रेते परस्यच' (मनु) या वचनांचीही अशीच व्यवस्था समजावयाची; ह्मणजे हीं वचनें विधवेच्या साधारण धर्माचीं द्योतक असून, तिनें पुनः लग्न न केल्यास, ह्मणजे ती विधवाच राहिल्यास, तिनें कसें वागावें, याबद्दल लिहिलीं आहेत, असें समजावें. अश्वलायनानें सुद्धां 'अज्ञातश्च द्विजो यस्तु विधवामुद्वहेद्यदि । परित्यज्य तां चैव प्रायश्चित्तं समाचरेत् ॥' असें जें वचन दिलें आहे तें प्राप्तमैथुनाविधवापरच लाविलें पाहिजे, नाहीं तर इतर स्मृतिवचनांशीं त्याचा विरोध येतो.

उत्तर–जर त्या पुनरुद्वाहन करितील तर तसें आचरण करणें श्रेयस्कर आहे ह्मणून

याप्रमाणें मनु, वशिष्ठ, नारद, शातातप, पराशर इत्यादि स्मृतिकारांची एकवाक्यता करून पाहिली ह्मणजे विधवेला, ती प्राप्तमैथुना होईपर्यंत, संस्कारयुक्त पुनरुद्वाहाचा अधिकार आहे, असें स्पष्ट सिद्ध होतें.

शेवटीं शास्त्रार्थ ठरला तो.

## इतर हरकती व त्यांची निवृत्ति.

आतां कोणी असें ह्मणेल कीं, ठीक आहे. उक्तस्मृतिवचनांचाच जर केवळ अर्थ करावयाचा असेल, तर तुह्मी ह्मणतां तसा तो होतो, हें खरें. परंतु तेवढ्यानें आमचें समाधान होत नाहीं. तुह्मी जो वरील वचनांचा अर्थ केला तो, त्यांची इतर स्मृतिवचनांशीं एकवाक्यता बिघडल्याशिवाय, होतो कीं नाहीं, तें पाहिलें पाहिजे. कारण तसें केल्याशिवाय खरा अर्थ झाला, असें ह्मणतां येणार नाहीं. तुह्मी ह्मणतां कीं, स्त्री अप्राप्तमैथुना असली ह्मणजे 'नष्टे मृते०' या वचनांत

१ पुनर्दानवाद.

सांगितलेल्या आपत्तींपैकीं कोणतीही एकादी आपात्ति तिजवर आली अ-सतां, तिला शास्त्रप्रमाणें विधियुक्त पुनर्विवाह करितां येतो. तर आतां तुह्मी ह्मणतां तसें जर घेतलें, तर ‘ पाणिग्रहणिका मंत्रा नियतं दारलक्षणम् । तेषां निष्ठा तु विज्ञेया विद्वद्भिः सप्तमे पदे ॥ ’ या मनुवाक्याचें तुह्मी काय करणार ? यांत तर सप्तपदी झाली ह्मणजे कन्यादान पूर्ण झालें, असें सांगितलें आहे. आणि एकदां पूर्ण दान झालें ह्मणजे मग पुनर्दानाला जागा राहत नाहीं. यास्तव एकदां कोणत्याही कन्येचें पूर्णदान झालें ह्मणजे मग तिचा पति जरी दूषित अगर मृत झाला, तरी तिला पुनर्दान नाहीं, हेंच तुह्मांस पत्करिलें पाहिजे.

आमच्या प्रतिपक्ष्यांनीं जी कोटि लढविली ती आह्मांस कबूल आहे.परंतु जो पाश त्यांनीं आमच्यावर टाकिला आहे, तोच आह्मी उलट त्यांच्यावर टाकितों ह्मणजे झालें. एकदां कन्येचें दान झालें ह्मणजे तिचें पुनर्दान करितां येणार नाहीं, हा अर्थ वरील मनुवचनापासून निष्पन्न होतो, ही गोष्ट खरी. तथापि इतर स्मृतिवचनांशीं त्याची एकवाक्यता होते, असें ठरल्यावांचून तो सर्वव्यापी आहे, असें मात्र ह्मणतां कामा नये. जर ‘ पाणिग्रहणिका० ’ याचा वरील अर्थच कायम धरिला, तर ‘ स तु यद्यन्यजातीयः पतितः क्लीब एवच । विकर्मस्थः सगोत्रो वा दासो दीर्घामयोऽपिवा ॥ ऊढाऽपिदेया साऽन्यस्मै सहाभरणभूषिता ॥ ’ ( कात्यायन. ) ‘ दत्तामपिहरेत् कन्यां सगोत्रोढां तथैवच ’ ( वशिष्ठ ) ‘ न मंत्राः कारणं तत्र नच कन्याऽनृतंभवेत् । समाछिद्य तु तां कन्यां बलादक्षतयोनिकाम् ॥ पुनर्गुणवते दद्यात् ’ ( शातातप ) ह्या अन्य स्मृतिकारांच्या वचनांचें काय करावयाचें ? या वचनांत कन्येचें एकदां पूर्णदान करणें, नंतर तिला परत घेणें, आणि पुनः तिचें यथाविधि दान करणें, इतक्या गोष्टींचा समावेश होतो. जर वरील ‘ पाणिग्रहणिका मंत्रा० ’ या वाक्याचा सर्वव्यापि अर्थ केला, तर या कात्यायनादि वचनांचा वेडावांकडा अर्थ केल्यावांचून त्यांची त्याच्याशीं एकवाक्यता राहत नाहीं. ‘ ऊढा ’ व ‘ मंत्र ’ यां शब्दांचे सरळ शब्दार्थ सोडून देऊन सप्तपदीच्या आंत त्यांची व्याप्ति कशी तरी लावणें, हें किती स्वारस्यघातक आहे, हें सांगावयास नको. शिवाय, असा अर्थ केल्यानें वरील वचनांतील कांहीं स्पष्ट शब्दांकडे दुर्लक्ष्य केल्यावांचून

चालत नाहीं; कारण जरी ऊढा वगैरे कांहीं शब्दांचा अर्थ अपूर्ण दानार्थीं केला, तरी वरील वचनें पूर्णदानापेक्षेनें लिहिलीं आहेत, हें त्यांतील 'हरेत्' 'समाछिद्य,' व 'पुनर्दान,' ह्या शब्दांवरून स्पष्ट होतें. जर प्रतिपक्ष्यांच्या ह्मणण्याप्रमाणें हीं वचनें अपूर्णदानद्योतक असतील, तर 'हरेत्' इत्यादि पूर्णदानद्योतक शब्दांचा अर्थ काय? ह्यावरून आपल्या सहजच ध्यानीं येईल कीं, निषेधक मंडळीचें प्रतिपादन स्वीकारिलें ह्मणजे 'पाणिग्रहणिका०' या वचनाला अपवाद असा जर कात्यायनादिवचनांचा अर्थ केला नाहीं, तर स्मृतिकारांवर अयुक्तवादाचा दोष येऊन एकवाक्यता बिघडते. यासाठीं वरील कात्यायनादिवचनें अपवादक मानून सप्तपदीनें दानपूर्णता होते व नंतर स्त्री पुनः देतां येत नाहीं असा जो 'पाणिग्रहणिका०' या मनुवाक्यांत नियम सांगितला आहे, तो सर्वव्यापी नसून अपवादकक्षम असा साधारण नियम आहे, असें धरिलें पाहिजे.

यावर निषेधक मंळीचा आणखी असा एक आक्षेप आहे कीं, कात्यायनादिवचनें जर अपवादक घेतलीं, तर त्याप्रमाणें सगोत्रास दिलेल्या कन्येचेंही पुनर्दान केलें पाहिजे, असें कबूल करावें लागतें. परंतु याचा 'सगोत्रोढांपुत्रवत्प्रतिपालयेत्' या स्मृतिवचनाशीं विरोध येतो.

परंतु असें ह्मणणें ह्मणजे पुनः वरप्रमाणेंच चुकी करणें आहे. वर आह्मीं दाखविलें आहे कीं, 'पाणिग्रहणिका०' या वचनाला जो विरोध आला, तो तें सर्वव्यापी धरिल्यामुळें आला. तसेंच वरील आक्षेपांत 'सगोत्रोढा' याला जो निषेधक मंडळीं विरोध दाखवितात तोही ते तें सर्वव्यापी धरितात ह्मणून येतो. परंतु तें सर्वव्यापी जर धरिलें नाहीं, तर तो येणार नाहीं. 'सगोत्रोढा०' यांत जें पालन करावयाचें ह्मणून लिहिलें आहे तें, जर पुनर्दान झालें नाहीं, तर करावयाचें, असें समजलें ह्मणजे झालें.

पुनर्दान करणें हें युक्त आहे, ह्याला दुसरें एक असें प्रमाण आहे कीं, जें दान सहेतुक असतें त्याचा हेतु तें दान घेणाराकडून जर तडीस गेला नाहीं, तर तें त्याजपासून परत घेणें हें बिलकूल गैरवाजवी नाहीं. पुष्कळ दानें याप्रमाणें परत घेण्याची वहिवाट आहे. अग्निहोत्र चालविण्यासाठीं जर राजानें भूमि दान दिलेली असली, आणि प्रतिगृहित्याकडून जर तो

हेतु सिद्धीस गेला नाहीं, तर राजा दिलेलें दान परत घेतो, आणि हें त्याचें करणें शास्त्रविरुद्ध आहे, असें कोणीही समजत नाहीं. लग्नामध्यें कन्येचें जें दान करितात, तें तरी प्रजोत्पत्त्यादि सुखें तिला प्राप्त व्हावीं ह्मणून केलेलें असतें. आतां ज्याला तें दान करावयाचें त्याजकडून जर तो मृत झाल्यानें अथवा दोषयुक्त ठरल्यानें तीं सुखें तिला प्राप्त होणार नाहींत, तर तें दान परत घेण्यास हरकत ती कोणती? नारदांनीं 'कर्ता ममायं कर्मेति' या स्मृतिवचनांत प्रतिग्रहीता कर्मकुर्वाण झाला ह्मणजे त्याला दिलेलें दान परत घेण्यास बिलकूल हरकत नाहीं, असें अगदीं स्पष्ट सांगितलें आहे. तेव्हां स्त्री क्षतयोनि होण्यापूर्वीं जर तिचा पति मृत्यु पावला तर त्याजकडून दानाचा हेतु मुळींच तडीस गेला नाहीं, असें होतें. यासाठीं वरील नारदवाक्यानें तिला परत घेणें व तिचें पुनर्दान करणें सशास्त्र ठरतें. येथें कोणी जर अशी शंका घेईल कीं, एकदां कन्येचें पूर्णदान झालें ह्मणजे तिजवरील स्वत्व नवऱ्यास जातें, ह्मणून तिचें पुनः दान करण्यास दुसऱ्यास अधिकार राहत नाहीं. तर ही शंका वरील वचनावरून दूर होते. कारण त्या वचनांत प्राप्तकालीं हरण व पुनर्दान हीं सांगितलीं असल्यामुळें वचनबलानें स्वत्व परत येतें असेंच मानिलें पाहिजे. कारण स्वत्व परत आल्यावांचून पुनर्दानाला जागा राहत नाहीं. दुसरी अशी एक गोष्ट आहे कीं, स्त्रीचें भर्त्याशीं पूर्ण ऐक्य होण्यास संभोगाची अपेक्षा आहे. 'चतुर्थीहोममंत्रेण त्वङ्मांसहृदयेन्द्रियैः। भर्त्रा संयुज्युते पत्नी तद्गोत्रा तेन सा भवेत् ॥' तसेंच आपस्तम्बसूत्र 'मंत्रैरस्थिमांसत्वचैस्सह, एकत्वे सहते भर्तुः पिण्डे गोत्रेच सूतके.' या वचनावरून जेथपर्यंत संभोग झाला नाहीं तेथपर्यंत स्त्री परत घेतां येईल, असें मानण्यास हरकत दिसत नाहीं. आतां हें परत घेणें सकारण असलें पाहिजे, हें सांगावयास नको. 'नष्टे मृते०' वचनांत हीं कारणें कोणतीं तें सांगितलेलें आहे. तेव्हां जर स्त्री अक्षतयोनि असेल तर निर्दिष्ट कारणासाठीं तिला परत घेऊन तिचें पुनर्दान करणें, हें दोषार्ह होणार नाहीं, हें आपल्या सहज ध्यानीं येईल.

आतां 'सकृत्कन्याप्रदीयते,' 'न दत्वा कस्यचित्कन्यां पुनर्दद्याद्विचक्षणः,' इत्यादि जीं मनुवाक्यें आहेत त्यांची व्यवस्था काय करावी असें कोणी विचारील तर त्या प्रश्नाचा निकाल करणें मुळींच कठिण नाहीं,

वरील अशा प्रकारच्या दुसऱ्या वचनांप्रमाणेंच तींही साधारण नियामक समजून वर सांगितलेले अपवाद त्यांनाही लागतात असें समजलें ह्मणजे झालें.

इतकें झालें तरी आणखी एका वाक्यासंबंधें निषेधक पक्षाचें अजून बोलणें राहण्याचा संभव आहे. ते असें ह्मणतील कीं, याज्ञवल्क्यांनीं ' लक्षण्यांस्त्रियमुद्वहेत् अनन्यपूर्विकां कान्तां असपिंडां यवीयसीम् । अरोगिणीं भ्रातृमतीमसमानार्षगोत्रजाम् ' । असें ह्मटलें आहे यावरून ते पुनर्दानाचा निषेध करितात, असें स्पष्ट होतें. परंतु हा त्यांचा समज अगदीं भ्रांतिमूलक आहे. कारण वरील वाक्यांत एक तर त्यांनीं अनन्यपूर्विकेबरोबरच लक्षण्या, अरोगिणी, भ्रातृमती इत्यादि गोविल्या आहेत. परंतु यावरून तो ज्या स्त्रीला बंधु नाहींत, अगर जी सुलक्षणा नाहीं तिच्या विवाहाचा निषेध करितो, असें कोणीच मानीत नाहीं. दुसरें, जर अनन्यपूर्विका स्त्रीचा विवाह निषिद्ध मानिला, तर वाग्दत्ता वगैरेंचाही निषिद्ध कां मानूं नये ? कारण बौधायनमताप्रमाणें वाग्दत्ता ही अनन्यपूर्विका होते. ( पहा, बौधायनवचन वाचादत्ता मनोदत्ता इ० ) परंतु हा विवाह निषिद्ध नाहीं, हें सर्वमान्य आहे. वरील वचनांत याज्ञवल्क्यांनीं वधूचे जे गुण सांगितले आहेत त्यांपैकीं असपिंडा आणि असमानार्षगोत्रजा हे मात्र अवश्य मानिले पाहिजेत हें खरें, कारण ते अदृष्टार्थ आहेत. परंतु बाकीचे दृष्ट विरोध असल्या कारणानें अवश्य मानण्याचें कारण नाहीं. विज्ञानेश्वरांनींही मिताक्षरेमध्यें हाच भेद केला आहे. ते ह्मणतात कीं, ' सपिंडासु समानगोत्रासु समानप्रवरासु भार्यात्वमेव नोत्पद्यते ' ह्मणजे सपिंडा, समानगोत्रा, आणि समानप्रवरा अशी स्त्री भार्या होऊं शकणार नाहीं, तेव्हां वर जे याज्ञवल्क्यांनीं गुण सांगितले, ते वरानें पहावे अशी त्यांची शिफारस आहे, याहून यांचा अधिक मतलब असावा असें दिसत नाहीं. आतां इतकें खरें कीं, कान्ता जशी भ्रातृमती, सुलक्षणा, अशी मिळाली तर चांगली, तशीच अनन्यपूर्वाही जर मिळेल तर बरेंच; परंतु यावरून ती तशी नसल्यास याज्ञवल्क्य तिच्या विवाहाचा निषेध करितात, असें मानण्यास मात्र जागा नाहीं.

आतां यावर कोणी कदाचित् असें ह्मणेल कीं, ठीक आहे. अक्षतयोनि स्त्रीचा पति वारला किंवा दूषित ठरला तर तिला परत घेऊन तिचें पुनर्दान करावें, हें तुह्मीं सिद्ध केलेंत, परंतु यापासून तुह्मांला फलनिष्पत्ति काय ? जर तसें दान करण्यास विधि असेल तर करा. मनूनीं ' पाणिग्रहणिका मंत्राः कन्यास्वेवप्रतिष्ठिताः । नाऽकन्यासु ' असें सांगितलें आहे आणि कन्या शब्दाचा अर्थ आह्मीं दत्तावधि ह्मणजे एकदां दान होई पावेतों असा समजतों. तेव्हां जरी इतर प्रमाणांनीं अक्षतयोनि स्त्रीचें पुनर्दान तुह्मीं सिद्ध केलें, तथापि त्याला शास्त्रांत विधान सांगितलेलें नाहीं, याकरितां तुमची सर्व खटाटोप व्यर्थ गेला.

२ विधानवाद

गोष्ट खरी. जर आमचे प्रतिपक्षी ह्मणतात त्याप्रमाणें कन्या शब्दाचा अर्थ असता, तर त्यांनीं या ठिकाणीं आह्मांला खालीं पहावयास लाविलें असतें यांत संशय नाहीं. परंतु कन्या शब्दाचा अर्थ स्मृतिग्रंथांत काय केलेला आहे हें जर पाहिलें तर आमचे व त्यांचे पुष्कळ श्रम वांचतील. मनूचे प्रसिद्ध टीकाकार जे मेधातिथि व कुल्लूक यांनीं कन्या शब्दाचा अर्थ दत्तावधि न करितां अक्षतयोनिपरच केला आहे. मनूनींही ' पाणिग्रहणिका० ' या वचनाचे पूर्वीं ' अकन्यकेति यः कन्यां ब्रूयात् स शतं प्राप्नुयाद्दण्डम्, ' असें जें वचन लिहिलें आहे त्याचेंही स्वारस्य कन्याशब्दाचा अर्थ अक्षतयोनि केल्याखेरीज राहत नाहीं. ' अलंकृत्य कन्यामुदकपूर्वं दद्यात् । कन्यां प्रयच्छेत् ' इत्यादि आश्वलायन, बोधायन वचनांचीही एकवाक्यता कन्याशब्दाचा अर्थ वरप्रमाणें केल्यानेंच होते; तसेंच मनुवचनांतही समजलें पाहिजे. यावरून ज्यां स्त्रीचें दान झालें आहे ( जी विवाहित आहे ) ती कन्या असूं शकते, असें त्यांचें मत आहे. पराशरही ' विधवा या भवेत् कन्या निर्दोषा भर्तृवर्जिता । तस्या वासः पितुर्वेश्म० ' या वचनांत तेंच कबूल करितात, व नारदांनींही ' उद्वाहिताऽपि सा कन्या न चेत् संप्राप्तमैथुना । पुनः संस्कारमर्हेत यथा कन्या तथैवसा ' या उक्तींत तोच अर्थ व्यक्त केला आहे. याप्रमाणें कन्याशब्दाचा अर्थ दत्तावधि न घेतां अक्षतयोनिपरच घेतला पाहिजे. याला इतकीं स्पष्ट प्रमाणें असतां एकदां एखा-

या स्त्रीचें दान होऊन ती विवाहित झाली ह्मणजे तिचें कन्यात्व जातें असें कल्पून कन्या या शद्वाचा अर्थ दत्तावधि करून ' पाणिग्रहणिका मंत्रा० ' या मनुवाक्याचा आधार घेऊन गतभर्तृका स्त्री अप्राप्तमैथुना असली तरी तिच्या पुनर्दानाला विधानविधि नाहीं, असें ह्मणणें या साहसाला काय ह्मणावें ?

आतां हा संस्कार ग्राह्म नव्हे असें जर कोणी ह्मणेल, तर तेंही बरोबर नाहीं. कारण तसें जर असतें तर वरील ' उद्वाहिताऽपि ' या वचनांत नारदांनीं पुनःसंस्कार हा शद्ब घातला नसता. पुनःसंस्कार हा शद्ब घालण्यांत पहिल्यानें झालेला पाणिग्रहणसंस्कार तोच पुनः करावयाचा असाच नारदांचा आशय असला पाहिजे. आणि त्याचें स्वरूप त्यांनीं ' यथा कन्या तथैव सा ' या वचनानें चांगलें निर्दिष्ट केलें आहे. तेव्हां शेवटीं असें ठरतें कीं, पुनःसंस्कार हा केवळ प्रथम संस्काराची पुनरावृत्ति आहे. आणि ह्मणून तो ग्राह्म आहे किंवा नाहीं याबद्दल शंका घ्यावयास नको.

आतां वर जो पुनर्भूत्वाचा विषय आह्मी बाजूला ठेविला होता, त्याचा विचार करणें जरूर आहे. कारण तो विषय इतका महत्वाचा आहे कीं, त्याचा निर्णय झाल्यावांचून पुनरुद्वाह सशास्त्र ठरणेंही फुकट आहे; कारण कोणतीही स्त्री पुनरुद्वाहित झाली असतां, मग ती प्राप्तमैथुना असो किंवा अप्राप्तमैथुना असो, जर तिची गणना पुनर्भूंत होईल, तर पुनर्विवाह शास्त्रसंमत आहे, असें ठरण्यांत कांहीं तत्व नाहीं. कारण पुनर्भूला मोठे दोष सांगितले असून तिच्या संततीची एक वेगळीच जाती केल्यासारखें दिसतें. तेव्हां पुनर्भूविषयक स्मृतिवचनें कोणतीं आहेत व तीं सर्व प्रकारच्या पुनर्भूस लागतात कीं कांहीं त्यांतून मोकळ्या राहतात, तें पाहिलें पाहिजे.

३ पुनर्भूवाद.

पुनर्भूविषयक जीं वचनें स्मृतींतून आढळतात तीं येणेंप्रमाणें:—मनु— ' साचेदक्षतयोनिःस्याद्गतप्रत्यागताऽपिवा । पौनर्भवेण भर्त्रा सा पुनःसंस्कार मर्हति ' ॥ याज्ञवल्क्य—' क्षता च अक्षता च पुनर्भूःसंस्कृता पुनः ' नारदः—' कन्यैवाक्षतयोनिर्या पाणिग्रहणदूषिता । पुनर्भूः प्रथमा नाम पुनःसंस्कारकर्मणा ॥ देशधर्मानवेक्ष्य स्त्री गुरुभिर्या प्रदीयते । उत्पन्नसाहसान्यस्मै सा द्वितीया प्रकीर्तिता ॥ असत्सु देवरेषु स्त्री बांधवैर्या प्रदीयते ।

सवर्णाय सपिंडाय सा तृतीया प्रकीर्तिता ॥ तसेंच बौधायन सात प्रकारच्या पुनर्भू सांगतातः—'वाचादत्ता, मनोदत्ता, अग्निपरिगता, सप्तमं पदंनीता, भुक्ता, गृहीतगर्भा, प्रसूता, चेति सप्तविधपुनर्भूस्तां गृहीत्वा न प्रजाधर्मं विन्दते '

प्रथमदर्शनीं हीं वचनें पुनर्विवाहाचे सशास्त्रतेचा समूळ उच्छेद करितात असें दिसतें, कारण त्यांवरून कोणत्याही स्त्रीचें एकदां दान झालें ह्मणजे मग तें मनोदान असो किंवा प्रत्यक्ष दान असो, त्या स्त्रीचा पति मृत अगर दूषित झालेला असो अगर नसो, आणि ती प्राप्तमैथुना असो अगर अप्राप्तमैथुना असो, तिचें पुनर्दान करितां येत नाहीं आणि तें केलें असतां ती पुनर्भूच्या दोषास पात्र होते, असें ठरतें. परंतु या सर्व वचनांची एकवाक्यता करून दुसऱ्या स्मृतिवचनांशीं तीं ताडून पाहिलीं ह्मणजे असें कबूल करावें लागेल कीं, या वचनांत पुनर्भूचे जे सात वर्ग केले आहेत, त्यांपैकीं कांहीं सदोष व कांहीं निर्दोष असे मानिले पाहिजेत. आजपर्यंतच्या कबूल झालेल्या शास्त्रप्रमाणें सुद्धां वरील बौधायनाच्या पुनर्भूचे दोन वर्ग केले जातात. एक पहिल्या तिहींचा व दुसरा राहिलेल्या चौहोंचा. असे वर्ग न केल्यास वाग्दानांतर ज्या कन्येचा पति मृत अगर दूषित होईल ती व भुक्त अगर गर्भिणी स्त्री या दोघींचीही एकच स्थिति होऊन दोघींपैकीं कोणतीचाही पुनर्विवाह झाला असतां ती पुनर्भूच्या दोषास सारखीच पात्र होईल. परंतु असा अर्थ करणें, हें अगदीं गैर असून तो टीकाकार, निबंधकार व आधुनिक शास्त्री यांसही असंमतच आहे.

पुनर्विवाहनिषेधक पक्षाकडील मंडळी सप्तपदीपर्यंत कन्येचा दुसऱ्या पतीशीं विवाह झाला असतां तिला पुनर्भूत्वाचा दोष लागत नाहीं, असें कबूल करितात. ते ह्मणतात कीं, बौधायनवचनाप्रमाणें मनोदत्तेपासून प्रसूतेपर्यंत सर्व प्रकारच्या स्त्रिया पुनर्विवाहित झाल्या असतां, पुनर्भूत्वाच्या दोषास पात्र आहेत, असें जर ह्मटलें, तर खालील नारद व याज्ञवल्क्य यांच्या वचनांशीं बौधायनवचनांची एकवाक्यता होत नाहीं. तीं वचनें अशीं:—दत्तान्यायेन यः कन्यां वराय न ददाति ताम् । अदुष्टश्चेद्वरो राज्ञा स दण्डयः; नारद 'सकृत् प्रदीयते कन्या हरंस्तां चोरदण्डभाक् दत्तामपि हरेत् कन्यां श्रेयांश्चेद्वर आव्रजेत्—याज्ञवल्क्य; यासाठीं त्यांचें असें ह्मणणें आहे कीं, सप्तपदीपर्यंत पुनर्दान अथवा पुनर्विवाह केल्यास

हरकत नाहीं. विज्ञानेश्वरांचेंही असेंच मत आहे. ' सकृदेव कन्या प्रदीयते ' या वचनास चांगला वर मिळाला तर पुनर्दान करावें, असा जो अपवाद आहे तो सप्तपदीच्या पूर्वी घ्यावयाचा, पुढें नाहीं, असें ते ह्मणतात. धर्मसिंधुकारही याच मताचे अनुवादक आहेत. शास्त्रामध्यें दत्ताप्रदानिकाविषयीं जो निषेध आहे तो सप्तपदी झाल्यानंतर मानावयाचा असें त्यांचें मत आहे. ' सकृत् कन्या प्रदीयते ' व ' न दत्वा कस्यचित्कन्यां पुनर्दद्यात् विचक्षणः । दत्वा पुनः प्रयच्छन्हि प्राप्नोति पुरुषोनृतम् ' या मनुवाक्यांचा जर शब्दार्थच घेतला, तर एकदां वाग्दान झालें ह्मणजे पुनः त्या कन्येचें दान वर्ज्य आहे असा अर्थ होतो ; परंतु तसा अर्थ केल्यानें वरील नारद व याज्ञवल्क्य वचनांशीं त्यांचा विरोध येतो, यासाठीं ' पाणिग्रहणिका मंत्रा नियतं दारलक्षणम् । तेषां निष्ठातु विज्ञेया विद्वद्भिः सप्तमे पदे ॥ या वचनाच्या आधारानें सप्तपदीपर्यंत पुनर्दानाची मोकळीक मानिली आहे.

याप्रमाणें नारद व याज्ञवल्क्य यांच्या वचनांशीं विरोध येतो ह्मणून निषेधक पक्षाकडील मंडळी जर सप्तपदीपर्यंत पुनर्दानाची सशास्त्रता कबूल करण्यास तयार आहेत, तर तशाच कारणासाठीं ती सीमा त्यांनीं कां उल्लंघू नये तें समजत नाहीं. जशीं वर दर्शित केलेलीं नारद-याज्ञवल्क्यांचीं पुनर्दानविषयक वचनें आहेत तशीं तद्विषयक इतर स्मृतिकारांचींही खालील वचनें आहेतः— ' स तु यद्यन्यजातीयः पतितः क्लीबएवच । विकर्मस्थःसगोत्रो वा दासो दीर्घामयोऽपिवा । ऊढापि देया सान्यस्मै सहाभरणभूषणा ॥ कात्यायन. कुलशीलविहीनस्य षण्डादिपतितस्यच । अपस्मारिशविधर्मस्यरोगिणां वेशधारिणाम् दत्तामपि हरेत् कन्यां सगोत्रोढां तथैव च ॥ वसिष्ठ.

पुनर्दान करणें, हें कोठपर्यंत सशास्त्र आहे, हें या सर्व वचनांची एकवाक्यता झाल्यावांचून ठरवितां येणार नाहीं. कोणताही शास्त्रार्थ काढणें झाला तरी ज्या विषयासंबंधें तो काढणें असेल तद्विषयक सर्व वचनांची एकवाक्यता झाल्याशिवाय तो निघत नाहीं. असें निषेध पक्षाकडील मंडळींनेंच गृहीत घेतलेलें आहे. पुनर्दानसंबंधाच्या वरील सर्व वाक्यांची एकवाक्यता करावयाची ह्मटली ह्मणजे पुनर्भूत्वाची सीमा सप्तपदीच्या

पलीकडे ढकलल्याखेरीज ती होत नाहीं, हें त्या वचनांवरून सहज ध्या-नांत येईल.

आतां कांहींचें ह्मणणें आहे कीं, कैमुतिकन्यायानें या वचनांतील ऊढा या शब्दाचा अर्थ वाग्दत्ता यापेक्षां जास्त करूं नये. कारण सप्तपदीनें भार्यात्व स्थापित होतें, असें मनूनीं सांगितलें आहे, तेव्हां ऊढा शब्दाचा अर्थ त्या मर्यादेच्या पलीकडे नेणें, हें बरोबर होणार नाहीं. परंतु यावर आमचें असें ह्मणणें आहे कीं, ऊढा या शब्दाचा तसा अर्थ करण्याची आह्मांस जरूर दिसत नाहीं. निर्णयसिंधुकार, कमलाकर भट्ट, यांनीं हीं वचनें लावितांनाही तो तसा केला नाहीं आणि तो तसा करून वरील वचनांचा जरी निकाल लाविला, तरी तेवढ्यानें निषेधक पक्षाच्या मंडळींचें काम भागत नाहीं.

कारण वरील वचनांचा जरी त्यांनीं तसा अर्थ केला, तरी खालील नारद, शातातप, वशिष्ठ, गौतम व विश्वामित्र यांच्या वचनांची व्यवस्था कशी करावयाची हा प्रश्न बाकी राहतोच. तीं वचनें खालीं दिल्याप्रमाणें आहेत:—'उद्वाहिताऽपि सा कन्या न चेत् संप्राप्तमैथुना । पुनःसंस्कारमर्हंत यथा कन्या तथैवसा ॥' नारद. 'वरश्चेत् कुलशीलाभ्यां न युज्येत कदाचन । न मंत्राः कारणं तत्र न च कन्यानृतंभवेत् ॥ समाच्छिद्य तु तां कन्यां बलादक्षतयोनिकाम् । पुनर्गुणवते दद्यात् ॥' शातातप 'मरणानंतरं भर्तुर्यद्यनाहतयोनयः । स्त्रियोविवाहमर्हंति नात्र कार्या विचारणा ॥' गौतम. 'अस्पृष्टलिंगयोनीनामाविंशतिवयस्त्रियां । पुनर्विवाहः कर्तव्यः चतुर्षु च युगेषु च ॥' विश्वामित्र. 'पाणिग्राहे मृते बाला केवलं मन्त्रसंस्कृता । साचेदक्षतयोनिः स्यात् पुनःसंस्कारमर्हति ॥' वशिष्ठ. या वचनांत 'सं प्राप्तमैथुनत्व' ह्मणजे 'संभोग' ही पुनर्विवाहाला मर्यादा सांगितली आहे; आणि 'संभोग' व सप्तपदी' यांत अंतर आहे, असें बौधायनानें मानिलेलें असून, वरील वचनांत 'उद्वाहिताऽपि सा कन्या नचेत् संप्राप्तमैथुना' ह्मणजे 'कन्या जरी विवाहित' असली तरी जर ती 'संप्राप्तमैथुना नसेल' ह्मणून जें लिहिलें आहे, त्यावरूनही तें स्पष्ट होतें. तेव्हा वरील वचनें 'सप्तपदी' व 'संभोग' यांच्या मध्यंगत कालास लागतात, हें सांगावयास नको.

आतां हीं वचनें नियोगपर लावावीं, असें जर कोणी ह्मणेल, तर तें बिलकूल चालणार नाहीं. कारण ‘ संस्कारमर्हति ’ ‘ यथा कन्या तथैव सा ’ ‘ नच कन्याऽनृतं भवेत् ’ वगैरे ज्या उक्ती वरील वचनांत आहेत त्यांच्याशीं या सूचनेचा विरोध येतो. कारण, नियोगाला संस्काराची आवश्यकता नाहीं, आणि कन्यानृताच्या भीतीचें निरसन करण्याचेंही कारण नाहीं. तसेंच ‘ यथा कन्या तथैव सा ’ ह्या वाक्यानें ती पुनर्दान करण्यास योग्य होते. कारण, मनूनें ‘ कन्या देया न तु अकन्या ’ असें सांगितलें आहे. व नारदांनींहि अशा स्त्रीस कन्यात्व सांगून, मैथुनाची अपेक्षा केली आहे. ह्यावरून हीं वचनें सप्तपदी व संभोग ह्यांचे मध्यंगत कालास लागतात; हें निर्विवाद आहे. व असाच मेधातिथि आणि कुल्लूक भट्ट यांनींही ह्या वाक्यांचा अर्थ केला आहे. तेव्हां शेवटीं असें ठरतें कीं, जसा वचनबलानें बौधायन, याज्ञवल्क्य, नारद, वशिष्ठ व मनु यांच्या पुनर्भूविषयक वचनांचा धर्मसिंधुकारांनीं व इतरांनीं सप्तपदीपर्यंत संकोच केला आहे, तसा तो वचनबलानें संभोगापर्यंत केला पाहिजे. आणि हें एकदां पत्करिलें, म्हणजे संभोगापर्यंत स्त्रीचा सकारण पुनरुद्वाह झाला असतां, पुनर्भूत्वाच्या दोषास ती पात्र होत नाहीं.

आतां कांहींचें म्हणणें असें आहे कीं, पुनरुद्वाह वैध असेल, ह्मणजे विधिप्रमाणें झाला असेल, तर तो केव्हांही झाला असला, तथापि स्त्रीस पुनर्भूत्वाचा दोष प्राप्त होत नाहीं. ते ह्मणतात कीं, असा जो दोष येतो, तो पुनःसंबंध अवैध झाला असेल—म्हणजे विधिप्रमाणें झाला नसेल, तरच प्राप्त होतो, आणि याला ते खालील मनु, वशिष्ठ, ब्रम्हपुराण इत्यादि वचनांचा आधार दाखवितात. तीं वचनें:— ‘ या पत्या वा परित्यक्ता विधवा च स्वयेच्छया । उत्पादयेत् पुनर्भूत्वा स पौनर्भव उच्यते मनु. ‘ या क्लीबं पतितं उन्मतं वा भर्तारमुत्सृज्यान्यं पतिं विन्दते ’ मृतेव सा पुनर्भूर्भवति ’ वशिष्ठ. ( या वचनांत मृतेव हें पद चांगलें बसत नाहीं. असो. ) तसेंच ‘ मृते भर्तरि या नारी त्यक्तवत्यथ तं स्वयम् । सवर्णाचनयेद्गर्भं भर्तुःपौनर्भवं सुतम् ॥ यदि सा बालविधवा बलात्यक्ताऽथवा क्वचित् । तदा भूयस्तु संस्कार्या गृहीता येन केन चित्

ब्रह्मपुराण इ० त्यांचें ह्मणणें असें कीं, जेव्हां स्त्री, सकारण का होईना, परंतु आपणच होऊन कामवासनेनें दुसऱ्याजवळ संबंध करिते, तेव्हां ती पुनर्भूत्वाच्या दोषास पात्र होते. परंतु जिचा संबंध दांडगाईचा नसून, संस्कारानें झाला आहे, ती पुनर्भूचे लक्षणांत मूळींच पडत नाहीं. परंतु हें त्यांचें ह्मणणें खालील नारद व याज्ञवल्क्य यांच्या वचनांशीं जुळत नाहीं. पुनर्भूत्वाचा दोष हा संस्काराचे अभावावर अगर सद्भावावर अवलंबून ठेवून चालत नाहीं, हें ' अक्षता वा क्षता वाऽपि पुनर्भूः संस्कृता पुनः ' या याज्ञवल्क्यांच्या वचनावरून व ' कन्यैवाक्षतयोनिर्या पाणिग्रहणदूषिता । पुनर्भूः प्रथमा प्रोक्ता पुनःसंस्कारमर्हति ॥' या नारदवचनावरून स्पष्ट होईल; कारण, यांत स्त्रीला संस्कृता असूनही पुनर्भूत्व सांगितलें आहे. तेव्हां वैधपुनर्विवाह केव्हांही झाला तरी पुनर्भूत्वाचा दोष त्यास लागत नाहीं, असें जर मानलें, तर हीं वचनें व्यर्थ होतील, व तसेंच बोधायनवचनही अगदीं व्यर्थ जाईल. स्त्री प्राप्तमैथुना असो अगर नसो, वैधपुनर्विवाहास पुनर्भूत्वाचा दोष कधींच लागत नाहीं, असें ह्मणणारांचे प्रतिपादनास दुसरी अशी एक नड आहे कीं, असंस्कृतत्व हेंच जर पुनर्भूचें अवश्य लक्षण मानिलें, तर पुनर्भू व स्वैरिणी यांमध्यें भेद मुळींच राहत नाहीं. परंतु तो याज्ञवल्क्य व नारद यांनीं केला आहे. व तसेंच मनूंनीं पौनर्भव, कुण्ड, गोलक, असे जे पुरुषांचे प्रकार केले आहेत, त्यांमध्यें भेदाचें कारण उरत नाहीं. जर स्त्री विवाहाची अपेक्षा न करितां अन्य पुरुषाशीं संबंध करील, तर त्या पुरुषाला जार ह्मटलें पाहिजे, व त्याची संतति जारज ह्मणजे कुण्ड अथवा गोलक होईल ( मनु–' अमृते जारजः कुण्डो मृते भर्तरि गोलकः ' ). परंतु पुनर्भूचीं अपत्यें जारजांत समाविष्ट होत नाहींत. तीं क्षेत्रजांत कदाचित् पडतील. तेव्हां अशा रीतीनें पुनर्भू शब्दाची व्याख्या केली ह्मणजे एक तर प्रत्यक्ष वचनविरोध येतो व दुसरें कांहीं स्मृतिवचनांचें स्वारस्य व सार्थकता जाते. हें इष्ट नाहीं, व असें प्रतिपादन वर सांगितलेल्या नारद, कात्यायन, वशिष्ठ, इत्यादिकांचे वचनांतील ' न चेत् संप्राप्तमैथुना ' वगैरे स्पष्ट सांगितलेल्या सीमेचें उल्लंघन करितें.

यासाठीं दोन्ही पक्षीं विचार पाहतां, सदोष पुनर्भूत्वाची मर्यादा संभोगापासून सुरू होते, असें ह्मणणें सयुक्तिक दिसतें; आणि ह्मणून जों-

पर्यंत स्त्री अक्षतयोनि आहे, तोंपर्यंत निर्दिष्ट आपत्ति प्राप्त झाली असतां, तिला पुनरुद्वाह करण्यास शास्त्रसंमति आहे, त्यापलीकडे मात्र नाहीं, असें शेवटीं ठरतें.

आतां, कांहीं ह्मणतात कीं, अक्षतयोनिचा अर्थ आसाप्तपदीक करावा: ह्मणजे सप्तपदीपर्यंत स्त्री अक्षतयोनि असतेच, तेव्हां तेथपर्यंत आपत्ति प्राप्त झाली असतां, तिचा पुनरुद्वाह करितां येईल, असें मानावें. ह्मणजे 'तेषां निष्ठा तु विज्ञेया विद्वद्भिः सप्तमे पदे' असें जें मनुवचन आहे, त्याला बाध येणार नाहीं. परंतु तसा अर्थ करण्याची जरूरी दिसत नाहीं. विवाहमन्त्रांची निष्ठा सप्तपदीच्या ठिकाणीं होते, असें जें मनुवचन आहे, तें या प्रसंगीं मुळींच लागत नाहीं. कारण, सर्व मनुवचनांमध्यें, एकदां वाग्दान झालें ह्मणजे त्यानंतर पुनर्दानाचा संभव नाहीं, असा अर्थ असतां त्या वचनांना निषेधपक्षाकडील मंडळी जर फक्त दोषाभावें ह्मणजे पति दूषित अगर मृत झाला नाहीं, तर मान देतात, तर मग वरील 'तेषां निष्ठा तु विज्ञेया विद्वद्भिः सप्तमे पदे' या सप्तपदीच्या वचनालाही तोच नियम कां लावूं नये ? एका वचनाचा अर्थ करण्याला जो नियम लावावयाचा, तोच सर्व वचनांचा अर्थ करण्यासही लागू केला पाहिजे. वर सांगितलेल्या स्मृतिवचनावरून काढलेला सिद्धांत–ह्मणजे सप्तपदी झाल्यानंतर कारण उत्पन्न झाल्यास स्त्रीचा पुनर्विवाह विहित आहे–हा सिद्धांत निर्णयसिंधुकार कमलाकर भट्ट यांसही संमत आहे. वाग्दत्ता कन्या मन्त्रोपनीता नसतांना जर गतभर्तृका झाली, तर तिचे पित्यानें पुनर्दान करणें, हें सशास्त्र आहे, असें दाखवून, ते पुढें लिहितात:–यत्तु नारदः—'उद्वाहितापि सा कन्या न चेत् संप्राप्तमैथुना । पुनःसंस्कारमर्हैत यथा कन्या तथैव सा ॥' इति । यच्च कात्यायनः, 'वरो यद्यन्यजातीयः पतितः क्लीब एव च । विकर्मस्थः सगोत्रो वा दासो दीर्घामयोऽपि वा । ऊढापि देया सान्यस्मै सहाभरणभूषणा ॥' इति । इदं कलौ निषिद्धं । देवरेण सुतोत्पत्तिर्दत्ता कन्या न दीयते । इत्यादित्यपुराणे कलौ निषेधात् । दत्ता शब्द ऊढापरः । आतां वरील नारद आणि कात्यायन वचनांमधील ऊढा व उद्वाहिता या पदांचा अर्थ पूर्णदानपर ते करितात, हें स्पष्ट आहे. पूर्वीच वासिष्ठवचनांत पूर्णदानाच्या पूर्वीची गोष्ट सांगून पुढील वचनांत पूर्णदानानंतरची व्यवस्था ते घेतात, व ती कलिवर्ज्य आहे ह्मणून मात्र सांग-

तात. हल्लींच्या कांहीं शास्त्रीलोकांच्या मताप्रमाणें, ऊढा, उद्वाहिता या शब्दांचा अर्थ सप्तपदीच्या पूर्वी, असा जर कमलाकर भट्ट करिते, तर त्यांस नारदादिवचनांस कलिवर्ज्यांत टाकण्याचें कारण नव्हतें. तीं वचनें पूर्वीच्या वसिष्ठवचनाप्रमाणेंच पूर्णदानाच्या आधींच्या काळीं लागू घेतलीं, तर त्यांत कलिवर्ज्य असें कांहींच नाहीं. तशीं लग्नें आतांच्या काळींही सशास्त्र आहेत, असें सर्व मानीत आहेत. भट्टांनीं ऊढा पदाचा अर्थ सप्तपदीच्या आधीं असा न करितां उलटा कलिनिषेधांपैकीं दत्ता पदाचा अर्थ ऊढा असा केला आहे. यावरून भट्टांच्या मतें सप्तपदी झाल्यानंतरही पूर्व युगीं कन्येचा पुनर्विवाह सशास्त्र होता, असें स्पष्ट होतें. ( पहा. निर्णय सिंधु, पत्र २६९, मुंबई आवृत्ति. )

ह्याप्रमाणें अप्राप्तसंभोगा स्त्रीला पुनर्भू दोषाचें अप्राप्तत्व सिद्ध झाल्यानें तिच्या अपत्यांस पौनर्भव दोष प्राप्त होत नाहीं, हें वेगळें सांगावयास नको. वाग्दत्तेचा, कारणामुळें, अन्यपतीशीं विवाह झाला असतां, तिचा पुत्र जर पौनर्भव मानिला जात नाहीं, तर ह्या वरील प्रकारच्या स्त्रीचाही पुत्र पौनर्भव होऊं नये, हें उघड आहे.

* कलिवर्ज्यप्रकरण.

आतां कलिवर्ज्य धर्मप्रकरणामध्यें विधवाविवाहनिषेधक वचनें आहेत, त्यांचा विचार करणें आवश्यक आहे. तीं वचनें बहुतेक पौराणिक आहेत व पौराणिक वचनें याज्ञवल्क्यादींच्या मतानें स्मृतिवचनांपेक्षां दुर्बल आहेत. तेव्हां ' कलौ पाराशरः स्मृतः ' या वचनानें कलिप्रमाण जी पराशरस्मृति त्या स्मृतीप्रमाणें जर आपत्कालीं स्त्रीचा पुनर्विवाह विहित आहे, तर तिजला पुराणवचनांचा बाध येऊं नये. पराशरस्मृतीमध्यें अमुकच कालपर्यंत पुनर्विवाह विहित आहे, असें सांगितलें नाहीं, व त्या स्मृतीमध्यें पौनर्भव व पुनर्भू यांविषयीं उल्लेखही नाहीं. यास्तव कलियुगामध्यें पुनर्विवाहासतो केव्हांही केला असतां, दोष नाहीं, असें मानिलें पाहिजे. बरें, दुसरें असें जरी ह्मटलें कीं, पराशरवचन इतर स्मृतिवचनांच्या बलानें अक्षतयोनिपरच लावणें जरूर आहे, तरी निदान इतकें त्याजपासून निघतें कीं, त्या कालापर्यंत तरी कलियुगामध्यें पुनर्विवाहास बाध नाहीं. आतां पुराणवचनें हीं स्मृतिवचनांपेक्षां बलवत्तर आहेत, असें घेऊन चाललें, तरी

एकवाक्यतेच्या नियमानें त्यापासून जो अर्थ निघतो, तो पाहिला असतां, एकवाक्यतेच्या नियमानें अक्षतयोनि स्त्रीच्या पुनर्विवाहास बाध नाहीं, असें दिसून येतें. हीं कलिनिषेधक वचनें खालीं लिहिल्याप्रमाणें आहेतः— ‘ ऊढायाः पुनरुद्वाहं ज्येष्ठांशं गोवधं तथा। कलौ पंच न कुर्वीत भ्रातृजायां कमंडलुम् ’ ॥ हेमाद्रि. ‘ दत्तायाश्चैव कन्यायाः पुनर्दानं परस्य च ॥ बृहन्नारदीय पुराण. ‘ स्त्रीणां पुनर्विवाहस्तु देवरात्पुत्रसंततिः ॥ ब्रह्मपुराण. ‘ देवरेण सुतोत्पत्ति र्दत्ता कन्या न दीयते ’ आणि ‘ बालायाः क्षतयोन्यास्तु वरेणान्येन संस्कृतिः ॥ ’ आदित्यपुराण. या वचनांतील ‘ दत्ता ’ या पदाचा अर्थ जसा सरळ दिसतो, तसाच करावयाचा झटला ह्मणजे एकदां कन्या दत्ता झाली कीं तिचा पुनर्विवाह मुळींच करितां येत नाहीं, असें कबूल केलें पाहिजे. परंतु हा अर्थ चुकीचा आहे, कारण तो रूढीच्या विरुद्ध असून, त्यानें वरील वचनांची एकवाक्यता राहत नाहीं. यासाठीं ‘ दत्ता ’ या पदाचा अर्थ केवळ ‘ दिलेली ’ असा न करितां, तो कमलाकर भट्ट करितात त्याप्रमाणें ‘ ऊढा ’ ह्मणजे ‘ विवाहिता ’ असाच केला पाहिजे. तसेंच वरील वचनांतील हेमाद्रि व बृहन्नारदीय पुराणांतील वाक्यें हीं साधारण नियामक समजून, आदित्यपुराणांतील वाक्यें हीं विशेषनियामक धरिलीं पाहिजेत. कारण, तसें न मानल्यास त्या वाक्यांना स्थल राहत नाहीं. यासाठीं निर्दिष्ट वचनांवरून आदित्यपुराणांतील उक्तीप्रमाणें, क्षतयोनीचा पुनर्विवाह कलियुगांत वर्ज्य आहे, परंतु अक्षतयोनीचा शास्त्रसंमतच आहे, असें मानणें जरूर आहे.

ही कलिवर्ज्य धर्मसंबंधीं विचारसरणि ध्यानांत आणिली असतां, एक शंका उत्पन्न होते ती अशीः—जर प्राप्तसंभोगा स्त्रीचा पुनर्विवाह कलीमध्यें निषिद्ध आहे, तर अशा स्त्रीचा पुनर्विवाह अन्ययुगीं संमत होता, असें ध्वनित होतें. व माझ्या आतांपर्यंत केलेल्या प्रतिपादनावरून हा विवाह पूर्व युगींही सशास्त्र नव्हता, असें सिद्ध झालेलें आहे. तेव्हां ह्या दोन गोष्टी परस्परविरोधी होतात. व त्यांतील एकीची सत्यता कबूल केली, तर दुसरी असत्य ठरते. अनियत विधवाविवाह प्रथम संमत होता, असें ह्मटलें ह्मणजे पुराणगत वाक्यांचें समर्थन होतें. पण तो असंमत

होता असें ठरविलेलें वाटतें जातें. बरें, विधवाविवाह अक्षतयोनि स्त्रीचाच पूर्व कालीं संमत होता, असें ह्मटलें तर पुराणांतील वचनांचा विचार नीटसा जुळत नाहीं. ही स्थिति टाळण्यास एक मार्ग आहे. तो हा कीं, कलिवर्ज्य ह्मणून ज्या गोष्टी सांगितल्या आहेत, त्या युगांतरीं तशाच होत्या, असें न समजणें. अमुक अमुक कामें कलीमध्यें करूं नयेत, असें सांगितल्यानें तीं कर्में अवश्यमेव कलीच्या अगोदरच्या युगांत केलीं जातच असत, असें मानण्यास आधार नाहीं. शिवाय, अन्ययुगीं जी गोष्ट रूढ नव्हती, तीच गोष्ट कलीमध्यें करूं नये, असें सांगितल्याचें आपणांस आढळतें. उदाहरणार्थ, ब्रह्मपुराण—' स्त्रीणां पुनर्विवाहस्तु देवरात्पुत्रसंततिः । स्वातंत्र्यं न कलियुगे...॥' यांत स्त्रीस्वातंत्र्य कलींत नसावें ह्मणून सांगितलें, पण पूर्वींही नव्हतें. असें आपणांस पक्कें माहित आहे, कारण ' न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ' वगैरे अनेक वाक्यें त्यासंबंधानें आपल्यास स्मृतींतून आढळतात. ह्या दृष्टीनें पाहिलें असतां, प्राप्तसंभोगा स्त्रीचा पुनर्विवाह कलिवर्ज्यांत घातलेला आहे, ह्मणून तो पूर्वकालीं विहित होता, असें मानण्याची जरूरी नाहीं.

बरें, यदाकदाचित् हा पुनर्विवाह वर्ज्य असें ह्मणून चाललें, तरी ज्याप्रमाणें, संन्यासग्रहण कलिवर्ज्य असतां, आचार्यांनीं तें स्थापित केलें, त्या प्रमाणें असा पुनर्विवाह आचार्यांना संमत वाटल्यास स्थापित करितां येईल. संन्यासग्रहणाच्या उक्ततेप्रमाणेंच अप्राप्तमैथुना स्त्रीच्या पुनर्विवाहाची उक्तता श्रीस स्मृतींत सांपडणारी आहे; व जर अशा स्त्रियांस पुनर्विवाहाची मोकळीक असणें, ही गोष्ट समाजास इष्ट आहे, व प्रत्येक मनुष्यास त्यांचे शोचनीय स्थितीची कळकळ येऊन दुःख होतें, तर ती मोकळीक हल्लींचे धर्माधिकारी आचार्य व विद्वान् शास्त्रीमंडळ यांनीं द्यावी, हें योग्य आहे.

उपसंहार.

वरील मजकुरावरून असा सिद्धांत ठरतो कीं, शास्त्रारीत्या स्त्री जेथपर्यंत अक्षतयोयोनि—ह्मणजे अप्राप्तमैथुना आहे—तेथपर्यंत तिचा, शास्त्रनिर्दिष्ट कारणें उपस्थित झालीं असतां, ह्मणजे पति नष्ट अगर मृत अगर पतित अगर क्लीब झाला असतां, पुनर्विवाह उक्त आहे, व तसा झाला असतां, त्या स्त्रीस कांहीं दोष लागत नाहीं. इतर

स्त्रियांप्रमाणेंच ती राहते, व तिची प्रजा इतर ज्या स्त्रियांचें एकदांच दान झालें आहे, त्यांचे प्रजेप्रमाणेंच निर्दोषी असते. हा सिद्धांत, पुणें मुक्कामीं वादामध्यें विष्णुशास्त्रिप्रभृति मंडळीनें जो पक्ष उचलिला होता तो, व त्याविरुद्ध निषेधवादी शास्त्री यांनीं जें प्रतिपादन केलें तें, या दोहोंशींही मिळत नाहीं. वरील सिद्धांत हा त्या दोघांच्या प्रतिपादनाचा मध्यवर्ती आहे, हें वरील लेखावरून दिसून आलें असेलच.

हा विषय बराच विस्तृत आहे, तेव्हां त्याचें लहानशा निबंधामध्यें संपूर्ण विवेचन करणें अशक्य आहे. तथापि जितकें करवेल तितकें करून शास्त्रसिद्धांत थोडक्यांत सांगितला आहे. विनंति इतकीच आहे कीं, प्रत्येकानें ह्याचें निरभिमानपणानें मनन करून आपली खात्री करून घ्यावी, व वर लिहिलेला सिद्धांत खरा वाटत असल्यास तो अमलांत आणण्यास झटावें. प्रस्तुत विषय 'पुनर्विवाहाविषयीं शास्त्रार्थ' हा आहे, यास्तव ह्यांत दुसऱ्या विचारांस स्थान दिलें नाहीं.

कित्येक लोकांस हा निघालेला सिद्धांत अप्रिय होईल हें खरें. परंतु जें ह्मणून खरें आहे तें प्रिय असो किंवा अप्रिय असो, प्रत्येक प्रांजलबुद्धीचा मनुष्य ग्रहण करील, अशी उमेद आहे. हा निबंध लिहिण्यांत केवळ सत्यान्वेषण हाच उद्देश आहे. यास्तव हाच सिद्धांत ठरला पाहिजे, असा आग्रह नाहीं. परंतु वरील प्रतिपादनावरून हाच सिद्धांत जर खरा ठरत आहे, तर कित्येकांस अप्रिय होईल ह्मणून त्याच्या उपपादनाच्या संबंधानें भीरुता अंगीकारणें प्रशस्त होणार नाहीं. आतां, जर हा सिद्धांत कित्येकांस मनापासून सकारण चुकीचा वाटत असेल, तर त्यांस एवढीच विनंति आहे कीं, केवळ उपहास न करितां, त्यांनीं लेखनद्वारा आपलीं कारणें प्रगट करावीं, व अशा रीतीनें वादे वादे तत्वबोधाचा उदय होइल, असें करावें.

समाप्त.

# पुनरुद्वाह.

आज पुनरुद्वाह या विषयावर चार शब्द बोलण्याचें मीं योजिलें आहे. कोणी असा प्रश्न करील कीं, हा विषय श्रोत्यांस कांहीं नवीन नाहीं, यावर आज २० वर्षें एकसारखी चर्चा सुरू आहे, असें असतां उगाच पुनः पुनः तोच तोच विषय घेऊन त्याचें पिष्टपेषण करण्यांत अर्थ काय? तरी त्यावर माझें असें उत्तर आहे कीं, जरी आज २० वर्षें या विषयासंबंधानें बरीच भवति न भवति झाली आहे, तरी शास्त्रांत त्याबद्दल काय सांगितलें आहे, हें पुर्तेपणीं पाहून, ती झालेली असल्याचें दिसत नाहीं. पुण्यास श्रीसन्निध जी वाटाघाट झाली व तसेंच अलीकडे मद्रास, बंगाल या ठिकाणीं ज्या चर्चा झाल्या त्या पुनरुद्वाह शास्त्रसंमत आहे कीं नाहीं, यात्र मुद्यावर झाल्या खऱ्या; तथापि त्यांतही या विषयाचा निर्णय करितांना शास्त्रदृष्ट्या ज्या ज्या गोष्टींकडे लक्ष पोंचविलें पाहिजे, त्या सर्वांकडे तें यथायोग्य पोंचविण्यांत आलें होतें, असें वाटत नाहीं. केवळ लोकव्यवहारदृष्ट्याच या विषयाचें बरेंच विवेचन होऊन आज पुष्कळ वर्षें झालीं. हिंदुस्थान सरकारानेंही पुनरुद्वाह कायदेशीर ठरवून टाकिला आहे, व त्याचा प्रसारही होऊन बरींच वर्षें झालीं आहेत. परंतु आपले लोकांची समजूत, पुनरुद्वाह हा शास्त्रविरुद्ध आहे, अशी दृढ असल्या कारणानें अद्याप लोकांत त्या कायद्यापासून व्हावा तसा फायदा झालेला निदर्शनास येत नाहीं, ही मोठी शोचनीय गोष्ट आहे. अशी एक आख्यायिका आहे कीं, पेशवाईतील प्रसिद्ध **परशुरामपंत भाऊ पटवर्धन** यांच्या कन्येला फार अल्पवयांत जेव्हां वैधव्य प्राप्त झालें, तेव्हां त्या वेळच्या पुण्यांतील विद्वानांनीं तिचा पुनरुद्वाह करण्याविषयीं शास्त्राधार दाखवून, तसें करण्यास आपली संमति दिली. जर वरील पुणें वगैरे तीन ठिकाणच्या वादांत या विषयासंबंधानें शास्त्रदृष्ट्या ज्या ज्या गोष्टींचा विचार केला पाहिजे त्या सर्व गोष्टींचा विचार पूर्णपणें झाला असता, तर त्यांपैकीं एका वादांतील निर्णय तरी वरील आख्यायिकेशीं जु-

उपोद्घात.

ळला असता, असें आह्मांस बहुतेक खात्रीनें वाटतें; कारण पेशवाईंतील विद्वानांचा निर्णय चुकीचा होता, आणि वरील वादांत झाले ते मात्र खरे, असें ह्मणण्यास कांहीं आधार नाहीं; कारण त्या वेळचे पंडित हल्लींच्या शास्त्रिमंडळीपेक्षां विद्वत्तेनें कमी होते, अशी कल्पनाही करणें हास्यास्पद होईल. बरें धर्मबंधन पाहूं गेलें तर तेंही पूर्वींपेक्षां हल्लींच शिथिल आहे; तेव्हां वरील वादांत शास्त्रदृष्ट्या सर्व गोष्टींचा विचार पुर्तेपणीं झाला नसावा, असें अनुमान करणें भाग पडतें. या आश्चर्याकेशिवाय अलीकडेही उत्तर हिंदुस्थानांत एक दोन ठिकाणीं पुनरुद्वाह शास्त्रसंमत आहे, असा निर्णय झालेला माझ्या वाचण्यांत आलेला आहे; तेव्हां याप्रमाणें या विषयासंबंधीं ज्यापेक्षां भिन्न मतें पडलेलीं आहेत व अजून कोणताच पक्ष बहुमतानें स्वीकारिलेला नाहीं, त्यापेक्षां अजून या गोष्टीचा निर्णय होणें बाकी आहे, असें मला वाटतें. यासाठीं यासंबंधानें मीं जी माहिती मिळविली आहे तिजवरून मला कोणता निर्णय खरा दिसतो तो आपणांस कळवून, चूक असल्यास ती समजावून घ्यावी, एतदर्थ आजचा विषय, बराच जुना असतांही, मी हातीं धरिला आहे.

# नियोग व पुनरुद्वाह.

प्रस्तुत विषयाचे विवेचनास आरंभ करण्याबरोबरच एक सर्वसाधारण गैरसमज दृष्टीस पडतो. त्याचें प्रथमतः निरसन करून टाकणें सोईचें होईल. यासाठीं आधीं तें करून नंतर प्रधानविषयास प्रारंभ करूं. हल्लीं बऱ्याच शास्त्रानभिज्ञ लोकांचा असा समज आहे कीं, पुनरुद्वाह हा एक नियोगाचा पोटभेद आहे आणि त्यामुळें कांहींचें असें ह्मणणें आहे कीं, प्राचीन कालीं जर आर्य लोकांमध्यें नियोगाची वहिवाट चालू होती, व त्यांस ती मान्य होती, तर आतां तीं अमलांत आणण्यास प्रत्यवाय असूं नये. परंतु हें ह्मणणें चुकीचें आहे. शास्त्रदृष्ट्या पुनरुद्वाह व नियोग यांचा परस्पर बिलकुल संबंध नाहीं. नियोग ह्मणजे नियोजित अथवा नेमून दिलेल्या पुरुषाशीं ( पतिव्यतिरिक्त ) प्रजोत्पादनासाठीं स्त्रीचा संबंध. या संबंधाला पुनरुद्वाहाप्रमाणें दान व संस्कार हे विधी सांगितले नाहींत. पुनरुद्वाह करणाऱ्या ह्मणजे गतभर्तृकेशीं विवाह करणाऱ्या पुरुषाप्रमाणें नियोजित पुरुषाला भर्ता अथवा पति असें ह्मणत नाहींत. पुनरुद्वाहापासून गोत्रभेदादि परिणाम होतात; ते नियोगापासून होत नाहींत. पुनरुद्वाह चिरस्थायी आहे, पण नियोग वंशवर्धनासाठीं एक पुत्रप्राप्ति होईपर्यंत करावयाचा असून तो दीर अथवा सपिंड यांजपाशींच केला पाहिजे, अशी शास्त्राची आज्ञा दिसते. ( प० मनु अध्याय ९ श्लोक ५९ ते ६४ व ७० ). तसेंच कलिनिषिद्धधर्मांमध्यें सुद्धां नियोग आणि पुनर्विवाह यांचा भेद दाखविलेला आढळतो. जसें 'स्त्रीणां पुनर्विवाहस्तु देवरात्पुत्रसंततिः' वगैरे; शिवाय मनूनें नियोगाचा विधि निंद्य मानिला आहे, व तो बहुतकरून साधुविगर्हित आहे. नियोगाचा हेतु केवळ पुत्रप्राप्तीच असल्यामुळें तो मृतभर्तृकेचाच होत असे असाही नियम नव्हता. ( प० आदिपर्व अ. १२२ पा० १४७ तसेंच याज्ञवल्क्य आचार. ६८।६९ ).

नियोग ह्मणजे काय व त्यांत व पुनरुद्वाहांत भेद कोणता.

सारांश, कुटुंबांतील विधवेस पुन्हा लग्न करावें न लागतां, प्रजोत्पादन करितां यावें, हा नियोगाचा उद्देश होता; आणि बऱ्याच अंशीं अविभक्त कुटुंबांत विधवेचे जे हक्क आहेत, त्यांमधीलच तो असावा, असें दिसतें. तिला जसें कुटुंबांतील पुरुषांनीं अन्नवस्त्र व राहण्यास जागा देणें अवश्य आहे, तसें प्रजा करून देणेंही पूर्वकालीं अवश्य मानिलें असावें.

*नियोगाचा उद्देश.*

खरोखर पाहिलें ह्मणजे नियोगांत पूर्वींच्या कुटुंबनियमांचें स्वरूप दिसतें. यापेक्षां त्यापासून जास्त फलनिष्पत्ति नाहीं. पूर्वीं कुटुंबांत जो कोणी मनुष्य मुख्य असे, तो कुटुंबसंबंधीं सर्व गोष्टींविषयीं मुखत्यार असल्यामुळें, व कुटुंबांतील इतर सर्व माणसांची सर्वतोप्रकारें मालकी व जबाबदारी हे दोन्ही अधिकार त्याजकडेच असल्यामुळें, व पुत्रप्राप्ति नाहीं, तर मरणानंतर सुद्धां इष्टलोकीं गति नाहीं, असा समज पूर्वीं विशेष दृढ असल्यामुळें, कुटुंबांतील कोणा स्त्रीचा पति वारला ह्मणजे पुत्रप्राप्तीकरितां त्यानें तिला कोणातरी पुरुषाची योजना करून द्यावी, हें स्वाभाविक होत असें. आतां हा रिवाज पूर्वीं आपणामध्यें होता ह्मणून हल्लीं असावा, असें ह्मणण्यांत कांहींच अर्थ नाहीं. फार प्राचीन कालीं इतर प्राण्यांप्रमाणें मनुष्येंसुद्धां नग्न असत ह्मणून आतांही आपण नग्न राहण्याची वहिवाट सुरू करावी, असें ह्मणणें अगदीं वेडेपणाचें होईल. घरें बांधण्याची कला मनुष्यास सुचेपर्यंत तींही रानांत पशुवत् राहत असत. ह्मणून आपलीं घरें पाडण्याचा आरंभ कोणी करील काय?

*नियोग ज्या कालीं प्रचारांत होता त्या कालची लोकास्थिति.*

याप्रमाणें 'पुनरुद्वाह' शास्त्रसंमत आहे कीं नाहीं, हा जो आपला प्रधान विषय त्याच्या आरंभीं जो सर्वसाधारण गैरसमज दृष्टीस पडतो त्याचें यथामति निरसन केलें. आतां प्रधान विषयाला प्रारंभ करूं.

---

## पुनरुद्वाहाविषयीं शास्त्रार्थ.

या विषयाला आरंभ करण्यापूर्वीं प्रथम शास्त्र ह्मणजे काय या प्र-

श्नाचा निर्णय झाला पाहिजे. खालील श्लोकांत याज्ञवल्क्यानें या प्रश्नाचा निकाल केला आहे. तो ह्मणतो—श्रुतिःस्मृतिःसदाचारः स्वस्य च प्रियमात्मनः ॥ सम्यक्संकल्पजः कामो धर्ममूलमिदंस्मृतम् ॥ १ ॥ ह्मणजे वेद व स्मृति हीं मुख्य धर्मस्थानें होत. त्यांत कोणत्याही गोष्टीचा निर्णय न सांपडल्यास मग सदाचार वगैरे ठिकाणें पहावयाचीं. याप्रमाणें शास्त्र ह्मणजे काय, ह्याचा निकाल झाला; परंतु एवढ्यानें आपलें काम भागलें नाहीं. इष्टार्थनिष्पत्तीसाठीं तें पहावयाचें कसें, हेंही आपणास ठरविलें पाहिजे. कोणी असा

शास्त्र ह्मणजे काय ?

प्रश्न करील कीं, यांत ठरवावयाचें तें काय? ज्या गोष्टीविषयीं आपणास शास्त्राची काय आज्ञा आहे, हें पहावयाचें असेल, त्या गोष्टीविषयीं जें शास्त्रांत सांगितलें असेल, ती त्याची आज्ञा. जर शास्त्रांत एका गोष्टीविषयीं एकच सिद्धांत नेहमीं असता, तर हें उत्तर बरोबर होतें; परंतु खरोखर तशी स्थिति नाहीं. त्यांत एकाच गोष्टीसंबंधानें निरनिराळीं मतें आढळतात. श्रुति व स्मृति या भिन्न भिन्न कालीं झाल्या असल्यामुळें जसजशी समाजाची स्थिति बदलत गेली तसतसा त्यांच्यांतही फरक पडत चालला; याप्रमाणें धर्मग्रंथांची स्थिति असल्यामुळें कोणत्याही विवक्षित गोष्टीविषयीं शास्त्रार्थ काढणें झाला ह्मणजे त्या गोष्टीविषयीं निरनिराळ्या ग्रंथांत जीं निरनिराळीं वचनें सांपडतात त्यांपैकीं आपण कोणतीं ग्राह्य करावीं, ह्मणजे इष्टार्थनिष्पत्तीसाठीं शास्त्र कसें पहावें, हा प्रश्न उत्पन्न होतो. यासाठीं प्रधान विषयाला प्रारंभ करण्यापूर्वीं या प्रश्नाचाही निकाल झाला पाहिजे.

तें पहावयाचें कसें ?

वरील श्रुतिस्मृतींची स्थिति मनांत आणिली, ह्मणजे या प्रश्नाचा ऐतिहासिक निकाल करणें फारसें कठिण नाहीं. निरनिराळ्या वचनांत जे फरक आढळतात ते ग्रहण करून त्यांवरून निरनिराळ्या स्मृतिकारांच्या व स्मृतींच्या संबंधानें कालाचीं अनुमानें बांधिलीं आणि त्यांवरून वर्तमानकाळीं शास्त्रसंमतक्रम कोणता, हें ठरविलें, ह्मणजे झालें. या रीतीनें शास्त्रार्थ काढण्यास शास्त्रीय रीतीप्रमाणें आपणास एकही गोष्ट गृहीत घ्यावी लागत नाहीं. सर्व स्मृती सारख्या प्रमाणाच्या आहेत, असें ह्मणावें

दोन मार्ग आहेत—
ऐतिहासिक.

लागत नाहीं. सर्वच एका कालीं झाल्या, असा आग्रह धरावा लागत नाहीं; किंवा अगदीं परस्परविरुद्ध स्मृतींची सुद्धां एकवाक्यता करण्याचे प्रचंड श्रम माथीं घ्यावे लागत नाहींत. परंतु हा ऐतिहासिक मार्ग झाला. हा आमच्या शास्त्रीमंडळास मुळींच पसंत नाहीं. त्यांच्यांत ज्या मार्गानें शास्त्राचा अर्थ करण्याची वहिवाट आहे, तो यापासून अगदीं भिन्न आहे. या मार्गाप्रमाणें सर्व स्मृति एककालीन असून त्या सर्वांचा एकच अर्थ आहे, त्यांत मुळींच विरोध नाहीं, किंबहुना श्रुति स्मृति, पुराणें, टीकाकार, कोणीही असो, त्या सर्वांचें ह्मणणें एकच आहे, हा सिद्धांत गृहीत धरून नंतर शास्त्राचा अर्थ करावयाचा. तात्पर्य, या मार्गांत एकवाक्यता हें महा तत्त्व असून अर्थात् त्याचें अवलंबन झाल्याशिवाय शास्त्रार्थ व्हावयाचाच नाहीं, असा तदनुयायी मंडळीचा समज आहे.

एकवाक्यतात्मक–शास्त्रीय.

---

# ऐतिहासिक मार्गानें शास्त्रार्थ.

याप्रमाणें ऐतिहासिक व एकवाक्यतात्मक असे जे शास्त्राचा अर्थ करण्याचे दोन मार्ग वर दाखविले, त्यांपैकीं ऐतिहासिक मार्गानें पुनरुद्वाह शास्त्रसंमत आहे कीं नाहीं, हें पाहूं गेल्यास, त्याचा निर्णय फार थोडक्यांत होतो. वेदांत एखाद्या स्त्रीचा पति मृत झाला असतां तिला पुनः लग्न करण्याची मोकळीक सांगितलेली आहे. (प० ऋग्वेद, १८।७।८ वगैरे) आणि मनु, वसिष्ठ, कात्यायन, शातातप, गौतम, वैशंपायन, जाबालि, व्याघ्रपात्, यांच्या स्मृतिग्रंथांतही पुनर्विवाहविधायक वचनें सांपडतात. तसेंच पुनर्विवाहित स्त्रीपासून झालेले मुलगे, ज्यांस पौनर्भव ह्मणतात, त्यांस मनु, याज्ञवल्क्य, नारद, विष्णु इत्यादि स्मृतिकारांनीं अंशग्राहक मानिले असून, त्यांस त्यांनीं दत्तपुत्रापेक्षांही वरस्थान दिलेलें आहे. कलिवर्ज्यधर्मविषयक पौराणिक वचनांवरूनही पुनर्विवाहाची चाल आपणांत पूर्वी होती, परंतु ती अलीकडे लोपली आहे, असें ठरतें. यावरून पुनर्विवाह पूर्व कालीं शास्त्रसंमत होता, असें ह्मणण्यास तरी बिलकुल हरकत नाहीं.

आतां पुराणांत पुनर्विवाहाच्या चालीचा निषेध केला आहे, आणि कलिवर्ज्य धर्मांत तिची गणना आहे, ह्मणून सांप्रत ती शास्त्रसंमत नाहीं, असें जर कोणी ह्मणेल, तर तें बरोबर नाहीं. कारण पराशरस्मृति, जी कलियुगांत प्रधान मानावी, असें सांगितलें आहे, तींत या विधानाला अनुज्ञा आहे व स्मृतिवाक्य पुराणवाक्यापेक्षां अधिक मातब्बर मानावें, असें शास्त्रांत सांगितलें आहे, तेव्हां अन्यत्र पुनर्विवाहनिषेधक वचनें जरी असलीं, तरी वरील स्मृतींत तद्विधायक वचनें ज्यापेक्षां आहेत त्यापेक्षां अशा रीतीचा विवाह सांप्रतही अशास्त्र मानितां येणार नाहीं, हें कबूल केल्यावांचून तोड नाहीं. आतां पुनर्विवाहित विधवेला पुनर्भू ठरवून तिला व तिच्या संततीला शास्त्रांत दोष सांगितले आहेत, तेव्हां, जरी पुनर्विवाह शास्त्रसंमत आहे, असें कबूल केलें तरी, त्याचा कांहीं उपयोग नाहीं, असें जर कोणी ह्मणेल, तर त्यावर आमचें असें उत्तर आहे कीं, ते दोष आतां मानण्याची जरूरी नाहीं; कारण त्यांच्याचबरोबर दुसऱ्या ज्या गोष्टी अशुद्ध ह्मणून शास्त्रांत सांगितल्या आहेत त्या आतां आह्मीं अशुद्ध मानीत नाहीं. याज्ञवल्क्यानें रसविक्रयाचा फार निषेध केला आहे, असें असतां, तो आपण हल्लीं कोठें मानितों? असें जर आहे, तर पुनर्विवाहमात्रच आपण निषिद्ध कां मानावा? हल्लीं त्याची रूढि नाहीं, असें कोणी ह्मणेल, तर त्याला थोडा उपाय आहे. रूढि पाडली ह्मणजे झालें. याप्रमाणें ऐतिहासिक मार्गानें, पुनर्विवाह शास्त्रसंमत आहे किंवा नाहीं, याचा फार लवकर आणि सरळ असा निकाल करितां येतो. परंतु या मार्गानें अर्थवाद करण्याची आमच्या शास्त्रीमंडळांत चाल नाहीं व तो त्यांस संमतही नाहीं; तेव्हां इष्टफलसिद्धीसाठीं त्यांच्याच ह्मणजे एकवाक्यतात्मक मार्गाचेंच अवलंबन करून प्रस्तुत विषयाची जी यथामति सेवा होईल ती करण्याचा आजचा माझा प्रयत्न आहे.

---

## एकवाक्यतात्मक अथवा शास्त्रीय मार्गानें शास्त्रार्थ.

या विषयाची सध्यां अशी स्थिति आहे कीं, साधक व बाधक या

दोन्ही पक्षांकडील लोक पुराव्याचा बोजा एकमेकांवर टाकितात. साधक पक्षाकडील मंडळी असें ह्मणते कीं, पुनरुद्वाहाच्या अभावाविषयीं कोठेंही प्रमाण नाहीं; त्यावर बाधक पक्षाचे लोक असें उत्तर देतात कीं, तो विवाह असावा, असें कोठेंही दिसत नसून, त्याचा निषेध करणारीं अशीं मात्र स्पष्ट वचनें आहेत, व पुनर्विवाहित जोडप्यास दोषी ठरवून त्यास प्रायश्चित्तवचनेंही सांगितलीं आहेत. परंतु याप्रमाणें पूर्वपक्ष उत्तरपक्ष करून अजिंक्य पत्रें मिळविण्याची आमची इच्छा नाहीं. या विषयासंबंधें शास्त्रदृष्ट्या खरा निश्चय काय होतो, एवढेंच काढण्याची आह्मांस जरूरी आहे; यासीठा कोणताच पक्ष न स्वीकारतां पुनर्विवाह शास्त्रसंमत आहे किंवा नाहीं, या प्रश्नाचा बरोबर निकाल होण्यासाठीं तद्विधायक व तन्निषेधक जीं जीं प्रमाणें शास्त्रांत सांपडतील तीं सर्व सांगून नंतर त्यांवरून आमच्या मनाला निर्णय कोणता दिसतो, तें आपल्याला निवेदन करण्याचा माझा विचार आहे.

साधक पक्ष.–'नष्टे मृते' यांत सांगितलेल्या प्रसंगीं पुनरुद्वाह शास्त्रसंमत आहे.

पुनर्विवाहविधायक जीं वचनें शास्त्रांत आढळतात त्यांपैकीं 'नष्टे मृते प्रव्रजिते क्लीबे च पतिते पतौ। पञ्चस्वापत्सु नारीणां पतिरन्यो विधीयते ॥ १ ॥ ह्मणजे 'पति सांडला, मृत झाला, सन्यस्त झाला, पुंस्त्वरहित असला किंवा धर्मभ्रष्ट झाला, तर त्याच्या स्त्रीनें दुसरा पति करावा'. हें वाक्य प्रसिद्ध असून तें साधक पक्षाच्या इमारतीचा पाया आहे. हें वाक्य मनूमध्यें आहे, असें मानण्यास आधार आहे, व वसिष्ठ व नारद यांच्या स्मृतींतही तें आहे, असें मानितात. पराशरस्मृतीमध्यें तर तें स्पष्ट आढळतेंच. या वाक्यावरून वरील पांच आपत्तींपैकीं कोणतीही आपत्ति एकाद्या स्त्रीला प्राप्त झाली असतां, तिनें पुनर्विवाह करावा, असें स्पष्ट सिद्ध होतें. असें साधक पक्षाचें ह्मणणें आहे;

निषेधक पक्ष-परंतु 'नोद्वाहिकेषु' असें एक दुसरें वचन असल्यामुळें 'नष्टे मृते' नियोगपर लाविलें पाहिजे.

परंतु यावर पुनर्विवाहनिषेधक मंडळीचा असा आक्षेप आहे कीं, तुह्मी जें वचन पुनर्विवाहविधायक ह्मणून दाखवितां त्याचा तुमच्या ह्मणण्याप्रमाणें अर्थ होत नाहीं; कारण मनूनेंच 'नोद्वाहिकेषु मंत्रेषु नियोगः कीर्त्यते क्वचित् । न विवाहविधावुक्तं विधवावेदनं पुनः ॥'

ह्मणजे 'विवाहमंत्रांत नियोगाचा कोठें समावेश नाहीं, व विवाह-विधींत विधवाविवाहाचा कोठें उल्लेख नाहीं' असें ह्मटलें आहे, त्यापेक्षां तुह्मी ह्मणतां तसा वरील श्लोकाचा अर्थ न करितां मेधातिथि ह्मणतो त्याप्रमाणें तो नियोगपर लाविला पाहिजे.

निषेधक पक्षाचा वरील आक्षेप थोडासा विचार करण्यासारखा आहे खरा. परंतु वरील वचनाची संगति लावण्याकरितां जी त्यांनीं कोटि लढविली ती, मेधातिथिसारख्या महा विद्वान टीकाकाराचा आश्रय जरी त्यांनीं धरिला आहे तरी, वडाची साल पिंपळाला लावण्यासारखी आहे, असें ह्मटल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. नियोग व विवाह यांचा जो भेद आह्मीं वर दाखविला आहे, त्यांत नियोजित पुरुषाला शास्त्रांत भर्ता किंवा पति, हीं नांवें कधींही दिलीं नसून पति हें नांव संस्कारयुक्त ज्या पुरुषाचा विवाह झाला असेल त्यालाच मात्र मिळावयाचें,असें आह्मीं दाखविलें आहे;आणि याव-[illegible]पति हें नांव ज्या पुरुषाला मिळालें त्याला नियोजित कधींही ह्मणतां येणार नाहीं, हें आपल्या सहजच ध्यानांत येईल. प्रस्तुत श्लोकांत 'पतिरन्यो विधीयते' अशी स्पष्ट उक्ति आहे. असें असतां निषेधपक्षाकडील मंडळी तो नियोगपर लावावा असें ह्मणतात याला वरील उपमा कां देऊं नये? प्रस्तुत श्लोकांत 'पति' हा शब्द आहे, तेव्हां तो श्लोक विवाहित पुरुषासंबंधेंच घेतला पाहिजे, नियोजित पुरुषाला लावितां येणार नाहीं. वरील आक्षेप ज्या वचनावरून त्यांनीं काढिला तें वचन जसें मनुस्मृतींत आहे, तसेंच दुसरेंही एक वचन त्याच स्मृतींत आहे, त्याचीही त्यांना भ्रांति पडलेली दिसते. 'सा चेदक्षतयोनिः स्याद्गतप्रत्यागताऽपिवा ॥' पौनर्भवेण भर्त्रा सा पुनःसंस्कारमर्हति" हें वचन मनुस्मृतींतच आहे, आणि यावरून (सध्यां पुनर्भूविषयक वाद बाजूला ठेवून पाहिलें असतां) स्त्री अक्षतयोनि असेल तर तिचा दुसऱ्या पुरुषाबरोबर संस्कारयुक्त विवाह करितां येतो, असें स्पष्ट सिद्ध होतें. आतां यांत वरील श्लोकाप्रमाणें सर्व स्त्रियांना पुनर्विवाह करण्याचा अधिकार दिला नाहीं हें खरें, तथापि ज्यांना तो करण्याची मोकळीक दिली आहे त्यांच्या पुनर्विवाहाची गणना संस्कारयुक्त विवाहांत केली आहे. असें असतां वरील 'नष्टे मृते०' हा श्लोक

नियोगपर लावावा, असें सांगणें ह्मणजे केवळ साहस करणें आहे, हें सांगावयास नको.

आतां यावर कोणी असें ह्मणेल कीं, येवढ्यावरूनच प्राप्तकालीं मनु विधवेला पुनर्विवाह सांगतो, असें ह्मणतां येणार नाहीं; कारण हें जसें मनूचें वचन पुनरुद्वाहविधायक ह्मणून तुह्मीं दाखविलें, तसेंच त्याचें वरील 'नोद्वाहिकेषु० हें तन्निषेधकही आहे; यासाठीं (संस्कार शब्दावर विशेष जोर न देतां) 'सा चेत्०' हेंही वचन नियोगपर घ्यावें; तरी त्यावर आमचें असें उत्तर आहे कीं, मनूच्या वचनांचा अर्थ केवळ त्याच्याच वचनांकडे लक्ष देऊन जर करावयाचा असता, तर निषेधपक्षाचें हें ह्मणणें बरोबर झालें असतें. परंतु या त्यांच्या आक्षेपावरून शास्त्रार्थ काढितांना ज्या महातत्त्वाचा त्यांनींच स्वीकार केला आहे त्याचा त्यांना विसर पडल्यासारखें दिसतें. वरप्रमाणें 'साचेदक्षतयोनिः स्यात्०' या वचनाचा जर अर्थ केला नाहीं, तर इतर स्मृतिकारांचीं जीं वाक्यें आहेत त्यांना विरोध येतो. 'साचेत्०' यांत अक्षतयोनि विधवेला जर 'पुनः संस्कार' सांगितला आहे, तर तें नियोगपर लावितांच येणार नाहीं; कारण, याज्ञवल्क्याच्या वाक्यावरून असें स्पष्ट दिसेल कीं, संस्कार व नियोग यांची अशी भेसळ कधींही होणार नाहीं. त्यांनीं नियोगपर जीं वाक्यें सांगितलीं आहेत, तीं पुनःसंस्कारवाक्यांहून अगदीं निराळीं असून त्यांचे प्रसिद्ध टीकाकार जे विज्ञानेश्वर यांनींही हा भेद पसंत केला आहे. याज्ञवल्क्य 'अक्षता वा क्षता वापि पुनर्भूः संस्कृता पुनः' असें ह्मणून नंतर खालील नियोगपर वचनें देतोः—'अपुत्रां गुर्वनुज्ञातो देवरःपुत्रकाम्यया। सपिंडो वा सगोत्रो वा घृताभ्यक्त ऋतावियात् ॥ आगर्भसंभवात् गच्छेत्०' वर जो विधवाविवाह मनूनें सांगितला तो नियोगाहून भिन्न आहे; याला दुसरें असें एक प्रमाण आहे कीं, मनूनें जे पुत्रांचे प्रकार सांगितले आहेत त्यांत क्षेत्रज ह्मणजे नियोगापासून झालेला आणि पौनर्भव ह्मणजे पुनर्विवाहित स्त्रीपासून झालेला, असे दोन प्रकार त्यानें केले आहेत. जर वरील वचन नियोगपर लागावें, असा मनूचा उद्देश असता, तर पौनर्भवाचा क्षेत्रज वर्गांतच त्यानें समावेश केला असता. याज्ञवल्क्यस्मृति पाहू

निषे०-'साचेत्' हेंही वचन नियोगपर लावावें.

उत्तर-तेंही तसें लागत नाहीं.

वा. मि. ६९
२



गेलें असतांही असाच भेद दृष्टीस पडतो. मनूप्रमाणें त्यानेंही क्षेत्रज व पौनर्भव असे पुत्रांचे निरनिराळे प्रकार केले आहेत, तेव्हां 'नष्टे मृते०' व 'सा चेत्०' हीं वाक्यें नियोगपर लावितां येणार नाहींत हें उघड झालें.

निषे०-खरें पण या तीन वचनांची परपस्परएकवाक्यता होत नाहीं.

आतां कोणी असें ह्मणेल कीं, 'नष्टे मृते०' व सा 'चेत्०' हीं वचनें नियोगपर लावितां येणार नाहींत, असें जें तुह्मी ह्मणतां, तें आह्मी कबूल करितों; परंतु मनूंतील 'नोद्वाहिकेषु०' या वचनांत विवाहविधीमध्यें विधवेचा उल्लेख नाहीं, असें स्पष्ट लिहिलें आहे तेव्हां, जरी तुह्मी ह्मणतां त्याप्रमाणें 'नष्टे मृते०' व 'सा चेत्०' हीं वचनें नियोगपर न लावितां त्यांचा जसा सरळ अर्थ होईल तसा केला, तथापि त्यांची जेथपर्यंत 'नोद्वाहिकेषु०' या वचनाशीं एकवाक्यता झाली नाहीं, तेथपर्यंत साधक पक्षाकडील मंडळीला त्याचा कांहीं उपयोग नाहीं. जर ह्या वचनद्वयाच्या आधारावर स्त्रियांचा पुनर्विवाह सशास्त्र आहे, असा ते आग्रह धरूं लागले, तर आह्मी 'नोद्वाहिकेषु०' या वचनाच्या आधारानें तो अशास्त्र आहे असें ह्मणूं, आणि स्वस्थ बसूं.

उत्तर-हें ह्मणणें ठीक नाहीं. मनुवचनांची इतर स्मृतिवचनाशीं जर एकवाक्यता आहे, तर त्यांची परस्परही असलीच पाहिजे.

या निषेध पक्षाच्या आक्षेपावर आमचें असें उत्तर आहे कीं, पुनर्विवाहविषयक जर एवढींच वाक्यें शास्त्रांत असतीं, तर ते ह्मणतात त्याप्रमाणें कदाचित् आह्मींही कबूल केलें असतें. परंतु तशी गोष्ट नाहीं. या विषयासंबंधें नारद, शातातप, वशिष्ठ यांचीं अनुक्रमें खालीं लिहिल्याप्रमाणें वचनें आहेत:—'उद्वाहिताऽपि सा कन्या न चेत् संप्राप्तमैथुना। पुनःसंस्कारमर्हेत यथा कन्या तथैव सा ॥ (नारद). वरश्चेत्कुलशीलाभ्यां न युज्येत कदा च न। न मंत्राः कारणं तत्र न च कन्याऽनृतं भवेत्। समाच्छिद्य तु तां कन्यां बलादक्षतयोनिकाम्। पुनर्गुणवते दद्यात्० (शातातप). 'पाणिग्राहे मृते बाला केवलं मंत्रसंस्कृता। सा चेदक्षतयोनिःस्यात्पुनःसंस्कारमर्हति' (वशिष्ठ).

आतां शास्त्रार्थ काढण्यास प्रारंभ करितांना सर्व स्मृति सारख्याच प्रमाणाच्या आहेत, व त्या सर्व एककालीन आहेत, आणि यासाठीं त्या सर्वांची एकवाक्यता झाल्याशिवाय कोणताही शास्त्रार्थ ठरत नाहीं, या ज्या

गोष्टी निषेधक पक्षाकडील मंडळीनें गृहीत केल्या आहेत, त्यांजकडे जर त्यांना दुर्लक्ष्य करावयाचें नसेल, तर वरील मनूचीं 'नष्टे मृते०' व 'सा-चेत्०' हीं वाक्यें त्यांच्याच 'नोद्वाहिकेषु०' या वाक्याला अपवादक आ॰हेत, ह्मणजे 'नोद्वाहिकेषु०' या वचनांत मनूनें साधारण नियम सांगून नंतर तो नियम 'नष्टे मृते०' यांत सांगितलेल्या प्रसंगीं आणि 'सा चेत्०' यांत सांगितलेल्या मर्यादेपर्यंत मोडतां येईल, असें सांगितलें आहे, असें ध॰रल्याखेरीज दुसरा मार्ग नाहीं, हें त्यांना कबूल करावें लागेल. कारण असें जर ते कबूल न करतील, तर मनूचा इतर स्मृतिकारांशीं विरोध येतो. परंतु तें त्यांच्या वरील गृहीत सिद्धांताच्या विरुद्ध आहे. तेव्हां मनूच्या 'नोद्वाहिकेषु०' या वाक्याला 'नष्टे मृते०' व 'सा चेत्०' हीं वाक्यें अ-पवादक आहेत, हें त्यांना कबूल केलें पाहिजे

निषे०---होय. पण पुनर्विवाह अमर्याद तर नाहीं, त्याला संभोगाची मर्यादा राहतेच.

यावर निषेध पक्षाकडील मंडळी जर असें ह्मणेल कीं ठीक आहे. तुह्मीं जीं इतर स्मृतिकारांचीं वाक्यें दाखविलीं त्यांवरून 'नष्टे मृते०' व 'सा चेत्०' हीं वाक्यें 'नोद्वाहिकेषु०' या वाक्याला अपवादक धरून 'नोद्वाहिकेषु०' याचा अर्थ केला पाहिजे, हें आह्मीं पत्करितों, परंतु तेवढ्यानें साधक पक्षाकडील मंडळीचें काम भागत नाहीं. ते ह्म-णतात कीं, 'नष्टे मृते०' या वचनांत स्मृतिकारानें संभोगाची इयत्ता न ठेवितां त्या वचनांत सांगितलेल्या प्रसंगीं स्त्रीस अन्यपतिविधान सांगितलें आहे, तेव्हां त्या वचनाचा सार्वत्रिकच अर्थ कां करूं नये ? पुणें मुक्कामीं श्रीसन्निध जो वाद झाला त्यांत विष्णुशास्त्री वगैरे साधक पक्षाकडील मंडळीचें हेंच ह्मणणें होतें. परंतु तुह्मीं जीं इतर स्मृतिकारांचीं वचनें वर दाखविलींत त्यांच्याशीं जर एकवाक्यता ठेवावयाची आहे, तर त्यावरून तसा अर्थ होत नाहीं.

उत्तर.–हें नि-र्विवाद आहे.

हा निषेध पक्षाचा आक्षेप आह्मीं अक्षरशः कबूल करितों; जर सर्व स्मृतिवचनांची एकवाक्यता करून जो अर्थ निघेल तो काढावयाचा आहे, तर 'नष्टे मृते०' या वचनाचा अर्थ सार्वत्रिक न घेतां 'सा चेत्०' या अपवादक वचनाला जेवढा साजेल तेवढाच घेतला पाहिजे, हें निर्विवाद आहे.

यावर साधक पक्षाकडील मंडळीकडून असा आक्षेप येण्याचा संभव आहे कीं, होय, तुह्मी ह्मणतां ती गोष्ट खरी; परंतु तुह्मांस आह्मी आधीं असें विचारतों कीं, पराशरवचन जर कलियुगीं प्रधान आहे आणि 'नष्टे मृते०' हें वचन जर पराशरस्मृतींत आहे आणि त्या वचनांत व त्या स्मृतींत दुसरे कोठेंही जर संभोगमर्यादेचा उल्लेख नाहीं, तर अन्ययुगींच्या स्मृतींचा आधार घेऊन पराशरवचनाचा तुह्मांस मानेल त्याप्रमाणें संकुचित् अर्थ करण्यास तुह्मांस काय अधिकार आहे.

साध०—परंतु कलियुगीं प्रधान जी पराशरस्मृति तिजवरून असा सिद्धान्त ठरत नाहीं.

पण हें प्रतिपादन ठीक नाहीं. 'नष्टे मृते० ' हें वचन मनु, नारद, वशिष्ठ, पराशर, या चारींही स्मृतींत असून पहिल्या तिहींत त्याचा वरप्रमाणें अर्थ केला आहे. तेव्हां पहिल्या तीन स्मृतिकारांनीं जो त्या वचनाचा अर्थ मानला असेल, तोच पराशराचाही असला पाहिजे, असें मानणें सयुक्तिक आहे. नाहीं तर एकच वचन पहिले तिघे स्मृतिकार एका अर्थानें बोलले व चवथा तेंच वचन, तो स्वतः आपला अर्थ निराळा आहे, असें सांगत नसतांना, दुसऱ्याच अर्थानें बोलला, अशी कल्पना करण्याची अनवस्था अर्थ करणारांना आपल्या माथीं घ्यावी लागते.

उत्तर—पण हें प्रतिपादन ठीक नाहीं. पराशरस्मृतीचाही अन्ययुगीयस्मृतींप्रमाणेंच समर्याद अर्थ केला पाहिजे.

आतां कोणी असें ह्मणेल कीं, तुह्मीं पुनर्विवाहविधायक पराशरस्मृतींतील एक आधार दाखविला हें खरें, परंतु पराशरानें सहगमन करणें, अगर सन्यस्त राहणें, हे आचार विधवांना सांगितले आहेत; त्यांवरून तुह्मीं वर दाखविलेल्या पुनर्विवाहविधायक उक्तीस बाध येतो, तर त्यावर आमचें असें ह्मणणें आहे कीं, ही शंका घेण्याची बिलकूल जरूरी नव्हती. विधवेनें संन्यस्त रहावें, हें चांगलें, असें पराशरानें सांगितलें खरें; परंतु

निषे०—अक्षत योनि विधवेला पुनरुद्वाहाचा अधिकार आहे असें जर असेल, तर स्मृतिकारांनीं विधवांना आचार कां सांगितले !

तिनें पुनरुद्वाह केला तर ती दोषी होते असें त्यानें सांगितलें नाहीं, इ-

उत्तर—जर त्या पुनरुद्वाहन करितील तर तसें आचरण करणें श्रेयस्कर आहे ह्मणून

तकेंच नव्हे, तर 'नष्टे मृते०' या वचनांत सांगितलेल्या पांच आपत्तींपैकीं कोणतीही आपत्ति प्राप्त झाली असतां, तिनें तो करावा, असें मात्र स्पष्ट सांगितलें आहे. 'शुश्रूषेत च जीवस्थं संस्थितं न च लंघयेत्।' तसेंच 'न तु नामाऽपि गृण्हीयात्पत्यौ प्रेते परस्यच' (मनु) या वचनांचीही अशीच व्यवस्था समजावयाची; ह्मणजे हीं वचनें विधवेच्या साधारण धर्माचीं द्योतक असून, तिनें पुनः लग्न न केल्यास, ह्मणजे ती विधवाच राहिल्यास, तिनें कसें वागावें, याबद्दल लिहिलीं आहेत, असें समजावें. अश्वलायनानें सुद्धां 'अज्ञातश्च द्विजो यस्तु विधवामुद्वहेद्यदि। परित्यज्य तां चैव प्रायश्चित्तं समाचरेत्॥' असें जें वचन दिलें आहे तें प्राप्तमैथुना विधवापरच लाविलें पाहिजे, नाहीं तर इतर स्मृतिवचनांशीं त्याचा विरोध येतो.

याप्रमाणें मनु, वशिष्ठ, नारद, शातातप, पराशर इत्यादि स्मृतिकारांची

शेवटीं शास्त्रार्थ ठरला तो.

एकवाक्यता करून पाहिली ह्मणजे विधवेला, ती प्राप्तमैथुना होईपर्यंत, संस्कारयुक्त पुनरुद्वाहाचा अधिकार आहे, असें स्पष्ट सिद्ध होतें.

---

## इतर हरकती व त्यांची निवृत्ति.

आतां कोणी असें ह्मणेल कीं, ठीक आहे. उक्तस्मृतिवचनांचाच जर

१ पुनर्दानवाद.

केवळ अर्थ करावयाचा असेल, तर तुह्मी ह्मणतां तसा, तो होतो, हें खरें. परंतु तेवढ्यानें आमचें समाधान होत नाहीं. तुह्मी जो वरील वचनांचा अर्थ केला तो, त्यांची इतर स्मृतिवचनांशीं एकवाक्यता बिघडल्याशिवाय, होतो कीं नाहीं, तें पाहिलें पाहिजे. कारण तसें केल्याशिवाय खरा अर्थ झाला, असें ह्मणतां येणार नाहीं. तुह्मी ह्मणतां कीं, स्त्री अप्राप्तमैथुना असली ह्मणजे 'नष्टे मृते०' या वचनांत

सांगितलेल्या आपत्तींपैकीं कोणतीही एकादी आपात्ति तिजवर आली असतां, तिला शास्त्रप्रमाणें विधियुक्त पुनर्विवाह करितां येतो. तर आतां तुह्मी ह्मणतां तसें जर घेतलें, तर ' पाणिग्रहणिका मंत्रा नियतं दारलक्षणम् । तेषां निष्ठा तु विज्ञेया विद्वद्भिः सप्तमे पदे ॥ ' या मनुवाक्याचें तुह्मी काय करणार ? यांत तर सप्तपदी झाली ह्मणजे कन्यादान पूर्ण झालें, असें सांगितलें आहे. आणि एकदां पूर्ण दान झालें ह्मणजे मग पुनर्दानाला जागा राहत नाहीं. यास्तव एकदां कोणत्याही कन्येचें पूर्णदान झालें ह्मणजे मग तिचा पति जरी दूषित अगर मृत झाला, तरी तिला पुनर्दान नाहीं, हेंच तुह्मांस पत्करिलें पाहिजे.

आमच्या प्रतिपक्ष्यांनीं जी कोटि लढविली ती आह्मांस कबूल आहे.परंतु जो पाश त्यांनीं आमच्यावर टाकिला आहे, तोच आह्मी उलट त्यांच्यावर टाकितों ह्मणजे झालें. एकदां कन्येचें दान झालें ह्मणजे तिचें पुनर्दान करितां येणार नाहीं, हा अर्थ वरील मनुवचनापासून निष्पन्न होतो, ही गोष्ट खरी. तथापि इतर स्मृतिवचनांशीं त्याची एकवाक्यता होते, असें ठरल्यावांचून तो सर्वव्यापी आहे, असें मात्र ह्मणतां कामा नये. जर ' पाणिग्रहणिका० ' याचा वरील अर्थच कायम धरिला, तर ' स तु यद्यन्यजातीयः पतितः क्लीब एवच । विकर्मस्थः सगोत्रो वा दासो दीर्घामयोऽपिवा ॥ ऊढाऽपिदेया साऽन्यस्मै सहाभरणभूषिता ॥ ' ( कात्यायन. ) ' दत्तामपिहरेत् कन्यां सगोत्रोढां तथैवच ' ( वशिष्ठ ) ' न मंत्राः कारणं तत्र नच कन्याऽनृतंभवेत् । समाछिद्य तु तां कन्यां बलादक्षतयोनिकाम् ॥ पुनर्गुणवते दद्यात् ' ( शातातप ) ह्या अन्य स्मृतिकारांच्या वचनांचें काय करावयाचें ? या वचनांत कन्येचें एकदां पूर्णदान करणें, नंतर तिला परत घेणें, आणि पुनः तिचें यथाविधि दान करणें, इतक्या गोष्टींचा समावेश होतो. जर वरील ' पाणिग्रहणिका मंत्रा० ' या वाक्याचा सर्वव्यापि अर्थ केला, तर या कात्यायनादि वचनांचा वेडावांकडा अर्थ केल्यावांचून त्यांची त्याच्याशीं एकवाक्यता राहत नाहीं. ' ऊढा ' व ' मंत्र ' या शब्दांचे सरळ शब्दार्थ सोडून देऊन सप्तपदीच्या आंत त्यांची व्याप्ति कशी तरी लावणें, हें किती स्वारस्यघातक आहे, हें सांगावयास नको. शिवाय, असा अर्थ केल्यानें वरील वचनांतील कांहीं स्पष्ट शब्दांकडे दुर्लक्ष्य केल्यावांचून

चालत नाहीं; कारण जरी ऊढा वगैरे कांहीं शब्दांचा अर्थ अपूर्ण दानार्थी केला, तरी वरील वचनें पूर्णदानापेक्षेनें लिहिलीं आहेत, हें त्यांतील 'हरेत्' 'समाछिद्य,' व 'पुनर्दान,' ह्या शब्दांवरून स्पष्ट होतें. जर प्रतिपक्ष्यांच्या ह्मणण्याप्रमाणें हीं वचनें अपूर्णदानद्योतक असतील, तर 'हरेत्' इत्यादि पूर्णदानद्योतक शब्दांचा अर्थ काय ? ह्यावरून आपल्या सहजच ध्यानीं येईल कीं, निषेधक मंडळीचें प्रतिपादन स्वीकारिलें ह्मणजे 'पाणिग्रहणिका०' या वचनाला अपवाद असा जर कात्यायनादिवचनांचा अर्थ केला नाहीं, तर स्मृतिकारांवर अयुक्तवादाचा दोष येऊन एकवाक्यता बिघडते. यासाठीं वरील कात्यायनादिवचनें अपवादक मानून सप्तपदीनें दानपूर्णता होते व नंतर स्त्री पुनः देतां येत नाहीं असा जो 'पाणिग्रहणिका०' या मनुवाक्यांत नियम सांगितला आहे, तो सर्वव्यापी नसून अपवादकक्षम असा साधारण नियम आहे, असें धरिलें पाहिजे.

यावर निषेधक मंडळीचा आणखी असा एक आक्षेप आहे कीं, कात्यायनादिवचनें जर अपवादक घेतलीं, तर त्याप्रमाणें सगोत्रास दिलेल्या कन्येचेंही पुनर्दान केलें पाहिजे, असें कबूल करावें लागतें. परंतु याचा 'सगोत्रोढांपुत्रवत्प्रतिपालयेत्' या स्मृतिवचनाशीं विरोध येतो.

परंतु असें ह्मणणें ह्मणजे पुनः वरप्रमाणेंच चुकी करणें आहे. वर आह्मीं दाखविलें आहे कीं, 'पाणिग्रहणिका०' या वचनाला जो विरोध आला, तो तें सर्वव्यापी धरिल्यामुळें आला. तसेंच वरील आक्षेपांत 'सगोत्रोढा' याला जो निषेधक मंडळी विरोध दाखवितात तोही ते तें सर्वव्यापी धरितात ह्मणून येतो. परंतु तें सर्वव्यापी जर धरिलें नाहीं, तर तो येणार नाहीं. 'सगोत्रोढा०' यांत जें पालन करावयाचें ह्मणून लिहिलें आहे तें, जर पुनर्दान झालें नाहीं, तर करावयाचें, असें समजलें ह्मणजे झालें.

पुनर्दान करणें हें युक्त आहे, ह्याला दुसरें एक असें प्रमाण आहे कीं, जें दान सहेतुक असतें त्याचा हेतु तें दान घेणाराकडून जर तडीस गेला नाहीं, तर तें त्याजपासून परत घेणें हें बिलकूल गैरवाजवी नाहीं. पुष्कळ दानें याप्रमाणें परत घेण्याची वहिवाट आहे. अग्निहोत्र चालविण्यासाठीं जर राजानें भूमि दान दिलेली असली, आणि प्रतिगृहित्याकडून जर तो

हेतु सिद्धीस गेला नाहीं, तर राजा दिलेलें दान परत घेतो, आणि हें त्याचें करणें शास्त्रविरुद्ध आहे, असें कोणीही समजत नाहीं. लग्नामध्यें कन्येचें जें दान करितात, तें तरी प्रजोत्पत्त्यादि सुखें तिला प्राप्त व्हावीं ह्मणून केलेलें असतें. आतां ज्याला तें दान करावयाचें त्याजकडून जर तो मृत झाल्यानें अथवा दोषयुक्त ठरल्यानें तीं सुखें तिला प्राप्त होणार नाहींत, तर तें दान परत घेण्यास हरकत ती कोणती? नारदांनीं 'कर्ता ममायं कर्मेति' या स्मृतिवचनांत प्रतिग्रहीता कर्मकुर्वाण झाला ह्मणजे त्याला दिलेलें दान परत घेण्यास बिलकूल हरकत नाहीं, असें अगदीं स्पष्ट सांगितलें आहे. तेव्हां स्त्री क्षतयोनि होण्यापूर्वीं जर तिचा पति मृत्यु पावला तर त्याजकडून दानाचा हेतु मुळींच तडीस गेला नाहीं, असें होतें. यासाठीं वरील नारदवाक्यानें तिला परत घेणें व तिचें पुनर्दान करणें सशास्त्र ठरतें. येथें कोणी जर अशी शंका घेईल कीं, एकदां कन्येचें पूर्णदान झालें ह्मणजे तिजवरील स्वत्व नवऱ्यास जातें, ह्मणून तिचें पुनः दान करण्यास दुसऱ्यास अधिकार राहत नाहीं. तर ही शंका वरील वचनावरून दूर होते. कारण त्या वचनांत प्राप्तकालीं हरण व पुनर्दान हीं सांगितलीं असल्यामुळें वचनबलानें स्वत्व परत येतें असेंच मानिलें पाहिजे. कारण स्वत्व परत आल्यावांचून पुनर्दानाला जागा राहत नाहीं. दुसरी अशी एक गोष्ट आहे कीं, स्त्रीचें भर्त्याशीं पूर्ण ऐक्य होण्यास संभोगाची अपेक्षा आहे. 'चतुर्थीहोममंत्रेण त्वङ्मांसहृदयेन्द्रियैः । भर्त्रा संयुज्यते पत्नी तद्गोत्रा तेन सा भवेत् ॥' तसेंच आपस्तम्बसूत्र 'मंत्रैरस्थिमांसत्वचैस्सह, एकत्वे सहते भर्तुः पिण्डे गोत्रे च सूतके.' या वचनावरून जेथपर्यंत संभोग झाला नाहीं तेथपर्यंत स्त्री परत घेतां येईल, असें मानण्यास हरकत दिसत नाहीं. आतां हें परत घेणें सकारण असलें पाहिजे, हें सांगावयास नको. 'नष्टे मृते०' वचनांत हीं कारणें कोणतीं तें सांगितलेलें आहे. तेव्हां जर स्त्री अक्षतयोनि असेल तर निर्दिष्ट कारणासाठीं तिला परत घेऊन तिचें पुनर्दान करणें, हें दोषार्ह होणार नाहीं, हें आपल्या सहज ध्यानीं येईल.

आतां 'सकृत्कन्याप्रदीयते,' 'न दत्वा कस्यचित्कन्यां पुनर्दद्याद्विचक्षणः,' इत्यादि जीं मनुवाक्यें आहेत त्यांची व्यवस्था काय करावी असें कोणी विचारील तर त्या प्रश्नाचा निकाल करणें मुळींच कठिण नाहीं.

वरील अशा प्रकारच्या दुसऱ्या वचनांप्रमाणेंच तींही साधारण नियामक समजून वर सांगितलेले अपवाद त्यांनाही लागतात असें समजलें ह्मणजे झालें.

इतकें झालें तरी आणखी एका वाक्यासंबंधें निषेधक पक्षाचें अजून बोलणें राहण्याचा संभव आहे. ते असें ह्मणतील कीं, याज्ञवल्क्यांनीं ' लक्षण्यांस्त्रियमुद्वहेत् अनन्यपूर्विकां कान्तां असपिंडां यवीयसीम् । अरोगिणीं भ्रातृमतीमसमानार्षगोत्रजाम् ' । असें ह्मटलें आहे यावरून ते पुनर्दानाचा निषेध करितात, असें स्पष्ट होतें. परंतु हा त्यांचा समज अगदीं भ्रांतिमूलक आहे. कारण वरील वाक्यांत एक तर त्यांनीं अनन्यपूर्विकेबरोबरच लक्षण्या, अरोगिणी, भ्रातृमती इत्यादि गोंविल्या आहेत. परंतु यावरून तो ज्या स्त्रीला बंधु नाहींत, अगर जी सुलक्षणा नाहीं तिच्या विवाहाचा निषेध करितो , असें कोणीच मानीत नाहीं. दुसरें, जर अनन्यपूर्विका स्त्रीचा विवाह निषिद्ध मानिला, तर वाग्दत्ता वगैरेंचाही निषिद्ध कां मानूं नये ? कारण बौधायनमताप्रमाणें वाग्दत्ता ही अनन्यपूर्विका होते. ( पहा, बौधायनवचन वाचादत्ता मनोदत्ता इ० ) परंतु हा विवाह निषिद्ध नाहीं, हें सर्वमान्य आहे. वरील वचनांत याज्ञवल्क्यांनीं वधूचे जे गुण सांगितले आहेत त्यांपैकीं असपिंडा आणि असमानार्षगोत्रजा हे मात्र अवश्य मानिले पाहिजेत हें खरें, कारण ते अदृष्टार्थ आहेत. परंतु बाकीचे दृष्ट विरोध असल्या कारणानें अवश्य मानण्याचें कारण नाहीं. विज्ञानेश्वरांनींही मिताक्षरेमध्यें हाच भेद केला आहे. ते ह्मणतात कीं, ' सपिंडासु समानगोत्रासु समानप्रवरासु भार्यात्वमेव नोत्पद्यते ' ह्मणजे सपिंडा, समानगोत्रा, आणि समानप्रवरा अशी स्त्री भार्या होऊं शकणार नाहीं, तेव्हां वर जे याज्ञवल्क्यांनीं गुण सांगितले, ते वरानें पहावे अशी त्यांची शिफारस आहे, याहून यांचा अधिक मतलब असावा असें दिसत नाहीं. आतां इतकें खरें कीं, कान्ता जशी भ्रातृमती, सुलक्षणा, अशी मिळाली तर चांगली, तशीच अनन्यपूर्वाही जर मिळेल तर बरेंच; परंतु यावरून ती तशी नसल्यास याज्ञवल्क्य तिच्या विवाहाचा निषेध करितात, असें मानण्यास मात्र जागा नाहीं.

आतां यावर कोणी कदाचित् असें ह्मणेल कीं, ठीक आहे. अक्षतयोनि स्त्रीचा पति वारला किंवा दूषित ठरला तर तिला परत घेऊन तिचें पुनर्दान करावें, हें तुह्मीं सिद्ध केलेंत, परंतु यापासून तुह्मांला फलनिष्पत्ति काय ? जर तसें दान करण्यास विधि असेल तर करा. मनूंनीं ' पाणिग्रहणिका मंत्राः कन्यास्वेवप्रतिष्ठिताः । नाऽकन्यासु ' असें सांगितलें आहे आणि कन्या शब्दाचा अर्थ आह्मीं दत्तावधि ह्मणजे एकदां दान होई पावेतों असा समजतों. तेव्हां जरी इतर प्रमाणांनीं अक्षतयोनि स्त्रीचें पुनर्दान तुह्मीं सिद्ध केलें, तथापि त्याला शास्त्रांत विधान सांगितलेलें नाहीं, याकरितां तुमची सर्व खटाटोप व्यर्थ गेला.

२ विधानवाद

गोष्ट खरी. जर आमचे प्रतिपक्षी ह्मणतात त्याप्रमाणें कन्या शब्दाचा अर्थ असता, तर त्यांनीं या ठिकाणीं आह्मांला खालीं पडावयास लाविलें असतें यांत संशय नाहीं. परंतु कन्या शब्दाचा अर्थ स्मृतिग्रंथांत काय केलेला आहे हें जर पाहिलें तर आमचे व त्यांचे पुष्कळ श्रम वांचतील. मनूंचे प्रसिद्ध टीकाकार जे मेधातिथि व कुल्लूक यांनीं कन्या शब्दाचा अर्थ दत्तावधि न करितां अक्षतयोनिपरच केला आहे. मनूंनींही ' पाणिग्रहणिका० ' या वचनाचे पूर्वी ' अकन्येति यः कन्यां ब्रूयात् स शतं प्राप्नुयाद्दण्डम्, ' असें जें वचन लिहिलें आहे त्याचेंही स्वारस्य कन्याशब्दाचा अर्थ अक्षतयोनि केल्याखेरीज राहत नाहीं. ' अलंकृत्य कन्यामुदकपूर्वं दद्यात् , कन्यां प्रयच्छेत् ' इत्यादि आश्वलायन, बोधायन वचनांचीही एकवाक्यता कन्याशब्दाचा अर्थ वरप्रमाणें केल्यानेंच होते; तसेंच मनुवचनांचीही समजलें पाहिजे. यावरून ज्या स्त्रीचें दान झालें आहे ( जी विवाहित आहे ) ती कन्या असूं शकते, असें त्यांचें मत आहे. पराशरही ' विधवा या भवेत् कन्या निर्दोषा भर्तृवर्जिता । तस्या वासः पितुर्वेश्म० ' या वचनांत तेंच कबूल करितात, व नारदांनींही ' उद्वाहिताऽपि सा कन्या न चेत् संप्राप्तमैथुना । पुनः संस्कारमर्हेत यथा कन्या तथैवसा ' या उक्तींत तोच अर्थ व्यक्त केला आहे. याप्रमाणें कन्याशब्दाचा अर्थ दत्तावधि न घेतां अक्षतयोनिपरच घेतला पाहिजे. याला इतकीं स्पष्ट प्रमाणें असतां एकदां एखा-

ह्या स्त्रीचें दान होऊन ती विवाहित झाली ह्मणजे तिचें कन्यात्व जातें असें कल्पून कन्या या शब्दाचा अर्थ दत्तावधि करून ‘ पाणिग्रहणिका मंत्रा० ’ या मनुवाक्याचा आधार घेऊन गतभर्तृका स्त्री अप्राप्तमैथुना असली तरी तिच्या पुनर्दानाला विधानविधि नाहीं, असें ह्मणणें या साहसाला काय ह्मणावें ?

आतां हा संस्कार ग्राह्य नव्हे असें जर कोणी ह्मणेल, तर तेंही बरोबर नाहीं. कारण तसें जर असतें तर वरील ‘ उद्वाहिताऽपि ’ या वचनांत नारदांनीं पुनःसंस्कार हा शब्द घातला नसता. पुनःसंस्कार हा शब्द घालण्यांत पहिल्यानें झालेला पाणिग्रहणसंस्कार तोच पुनः करावयाचा असाच नारदांचा आशय असला पाहिजे. आणि त्याचें स्वरूप त्यांनीं ‘ यथा कन्या तथैव सा ’ या वचनानें चांगलें निर्दिष्ट केलें आहे. तेव्हां शेवटीं असें ठरतें कीं, पुनःसंस्कार हा केवळ प्रथम संस्काराची पुनरावृत्ति आहे. आणि ह्मणून तो ग्राह्य आहे किंवा नाहीं याबद्दल शंका घ्यावयास नको.

३ पुनर्भूवाद.

आतां वर जो पुनर्भूत्वाचा विषय आह्मी बाजूला ठेविला होता, त्याचा विचार करणें जरूर आहे. कारण तो विषय इतका महत्वाचा आहे कीं, त्याचा निर्णय झाल्यावांचून पुनरुद्वाह सशास्त्र ठरणेंही फुकट आहे; कारण कोणतीही स्त्री पुनरुद्वाहित झाली असतां, मग ती प्राप्तमैथुना असो किंवा अप्राप्तमैथुना असो, जर तिची गणना पुनर्भूत होईल, तर पुनर्विवाह शास्त्रसंमत आहे, असें ठरण्यांत कांहीं तत्व नाहीं. कारण पुनर्भूला मोठे दोष सांगितले असून तिच्या संततीची एक वेगळीच जाती केल्यासारखें दिसतें. तेव्हां पुनर्भूविषयक स्मृतिवचनें कोणतीं आहेत व तीं सर्व प्रकारच्या पुनर्भूस लागतात कीं कांहीं त्यांतून मोकळ्या राहतात, तें पाहिलें पाहिजे.

पुनर्भूविषयक जीं वचनें स्मृतींतून आढळतात तीं येणेंप्रमाणेः—मनु—‘ साचेदक्षतयोनिःस्याद्गतप्रत्यागताऽपिवा । पौनर्भवेण भर्त्रा सा पुनःसंस्कार मर्हति ’ ॥ याज्ञवल्क्य—‘ क्षता च अक्षता च पुनर्भूःसंस्कृता पुनः ’ नारदः—‘ कन्यैवाक्षतयोनिर्या पाणिग्रहणदूषिता । पुनर्भूः प्रथमा नाम पुनःसंस्कारकर्मणा ॥ देशधर्मानवेक्ष्य स्त्री गुरुभिर्या प्रदीयते । उत्पन्नसाहसान्यस्मै सा द्वितीया प्रकीर्तिता ॥ असत्सु देवरेषु स्त्री बांधवैर्या प्रदीयते ।

ग्रं. सं.

सवर्णाय सापिंडाय सा तृतीया प्रकीर्तिता ॥ तसेंच बौधायन सात प्रकारच्या पुनर्भू सांगतातः—' वाचादत्ता, मनोदत्ता, अग्निपरिगता, सप्तमं पदंनीता, भुक्ता, गृहीतगर्भा, प्रसूता, चेति सप्तविधपुनर्भूस्तां गृहीत्वा न प्रजाधर्मं विन्दते '

प्रथमदर्शनीं हीं वचनें पुनर्विवाहाचे सशास्त्रतेचा समूळ उच्छेद करितात असें दिसतें, कारण त्यांवरून कोणत्याही स्त्रीचें एकदां दान झालें ह्मणजे मग तें मनोदान असो किंवा प्रत्यक्ष दान असो, त्या स्त्रीचा पति मृत अगर दूषित झालेला असो अगर नसो, आणि ती प्राप्तमैथुना असो अगर अप्राप्तमैथुना असो, तिचें पुनर्दान करितां येत नाहीं आणि तें केलें असतां ती पुनर्भूच्या दोषास पात्र होते, असें ठरतें. परंतु या सर्व वचनांची एकवाक्यता करून दुसऱ्या स्मृतिवचनांशीं तीं ताडून पाहिलीं ह्मणजे असें कबूल करावें लागेल कीं, या वचनांत पुनर्भूचे जे सात वर्ग केले आहेत, त्यांपैकीं कांहीं सदोष व कांहीं निर्दोष असे मनिले पाहिजेत. आजपर्यंतच्या कबूल झालेल्या शास्त्रप्रमाणें सुद्धां वरील बौधायनाच्या पुनर्भूचे दोन वर्ग केले जातात. एक पहिल्या तिहींचा व दुसरा राहिलेल्या चोहोंचा. असे वर्ग न केल्यास वाग्दानांतर ज्या कन्येचा पति मृत अगर दूषित होईल ती व भुक्त अगर गर्भिणी स्त्री या दोघींचीही एकच स्थिति होऊन दोघींपैकीं कोणतीचाही पुनर्विवाह झाला असतां ती पुनर्भूच्या दोषास सारखीच पात्र होईल. परंतु असा अर्थ करणें, हें अगदीं गैर असून तो टीकाकार, निबंधकार व आधुनिक शास्त्री यांसही असंमतच आहे.

पुनर्विवाहनिषेधक पक्षाकडील मंडळी सप्तपदीपर्यंत कन्येचा दुसऱ्या पतीशीं विवाह झाला असतां तिला पुनर्भूत्वाचा दोष लागत नाहीं, असें कबूल करितात. ते ह्मणतात कीं, बौधायनवचनाप्रमाणें मनोदत्तेपासून प्रसूतेपर्यंत सर्व प्रकारच्या स्त्रिया पुनर्विवाहित झाल्या असतां, पुनर्भूत्वाच्या दोषास पात्र आहेत, असें जर ह्मटलें, तर खालील नारद व याज्ञवल्क्य यांच्या वचनांशीं बौधायनवचनांची एकवाक्यता होत नाहीं. तीं वचनें अशीं:—दत्त्वान्यायेन यः कन्यां वराय न ददाति ताम् । अदुष्टश्चेद्वरो राज्ञा स दण्ड्यः; नारद ' सकृत् प्रदीयते कन्या हरंस्तां चोरदण्डभाक् दत्तामपि हरेत् कन्यां श्रेयांश्चेद्वर आव्रजेत्—याज्ञवल्क्य; यासाठीं त्यांचें असें ह्मणणें आहे कीं, सप्तपदीपर्यंत पुनर्दान अथवा पुनर्विवाह केल्यास

हरकत नाहीं. विज्ञानेश्वरांचेंही असेंच मत आहे. ' सकृदेव कन्या प्रदीयते ' या वचनास चांगला वर मिळाला तर पुनर्दान करावें, असा जो अपवाद आहे तो सप्तदीच्या पूर्वीं घ्यावयाचा, पुढें नाहीं, असें ते ह्मणतात. धर्मसिंधुकारही याच मताचे अनुवादक आहेत. शास्त्रामध्यें दत्ताप्रदानिकाविषयीं जो निषेध आहे तो सप्तपदी झाल्यानंतर मानावयाचा असें त्यांचें मत आहे. ' सकृत् कन्या प्रदीयते ' व ' न दत्वा कस्यचित्कन्यां पुनर्दद्यात् विचक्षणः । दत्वा पुनः प्रयच्छन्हि प्राप्नोति पुरुषोनृतम् ' या मनुवाक्यांचा जर शब्दार्थच घेतला, तर एकदां वाग्दान झालें ह्मणजे पुनः त्या कन्येचें दान वर्ज्य आहे असा अर्थ होतो ; परंतु तसा अर्थ केल्यानें वरील नारद व याज्ञवल्क्य वचनांशीं त्यांचा विरोध येतो, यासाठीं ' पाणिग्रहणिका मंत्रा नियतं दारलक्षणम् । तेषां निष्ठातु विज्ञेया विद्वद्भिः सप्तमे पदे ॥ या वचनाच्या आधारानें सप्तपदीपर्यंत पुनर्दानाची मोकळीक मानिली आहे.

याप्रमाणें नारद व याज्ञवल्क्य यांच्या वचनांशीं विरोध येतो ह्मणून निषेधक पक्षाकडील मंडळी जर सप्तपदीपर्यंत पुनर्दानाची सशास्त्रता कबूल करण्यास तयार आहेत, तर तशाच कारणासाठीं ती सीमा त्यांनीं कां उल्लंघू नये तें समजत नाहीं. जशीं वर दर्शित केलेलीं नारद-याज्ञवल्क्यांचीं पुनर्दानविषयक वचनें आहेत तशीं तद्विषयक इतर स्मृतिकारांचींही खालील वचनें आहेतः— ' स तु यद्यन्यजातीयः पतितः क्लीबएवच । विकर्मस्थःसगोत्रो वा दासो दीर्घामयोऽपिवा । ऊढापि देया सान्यस्मै सहाभरणभूषणा ॥ कात्यायन. कुलशीलविहीनस्य षण्डादिपतितस्यच । अपस्मारिशविधर्मस्यरोगिणां वेशधारिणाम् दत्तामपि हरेत् कन्यां सगोत्रोढां तथैव च ॥ वसिष्ठ.

पुनर्दान करणें, हें कोठपर्यंत सशास्त्र आहे, हें या सर्व वचनांची एकवाक्यता झाल्यावांचून ठरवितां येणार नाहीं. कोणताही शास्त्रार्थ काढणें झाला तरी ज्या विषयासंबंधें तो काढणें असेल तद्विषयक सर्व वचनांची एकवाक्यता झाल्याशिवाय तो निघत नाहीं. असें निषेध पक्षाकडील मंडळीनेंच गृहीत घेतलेलें आहे. पुनर्दानसंबंधाच्या वरील सर्व वाक्यांची एकवाक्यता करावयाची ह्मटली ह्मणजे पुनर्भूत्वाची सीमा सप्तपदीच्या

पलीकडे ढकलल्याखेरीज ती होत नाहीं, हें त्या वचनांवरून सहज ध्यानांत येईल.

आतां कांहींचें ह्मणणें आहे कीं, कैमुतिकन्यायानें या वचनांतील ऊढा या शब्दाचा अर्थ वाग्दत्ता यापेक्षां जास्त करूं नये. कारण सप्तपदीनें भार्यात्व स्थापित होतें, असें मनूनीं सांगितलें आहे, तेव्हां ऊढा शब्दाचा अर्थ त्या मर्यादेच्या पलीकडे नेणें, हें बरोबर होणार नाहीं. परंतु यावर आमचें असें ह्मणणें आहे कीं, ऊढा या शब्दाचा तसा अर्थ करण्याची आह्मांस जरूर दिसत नाहीं. निर्णयसिंधुकार, कमलाकर भट्ट, यांनीं हीं वचनें लाविर्तानाही तो तसा केला नाहीं आणि तो तसा करून वरील वचनांचा जरी निकाल लाविला, तरी तेवढ्यानें निषेधक पक्षाच्या मंडळींचें काम भागत नाहीं.

कारण वरील वचनांचा जरी त्यांनीं तसा अर्थ केला, तरी खालील नारद, शातातप, वशिष्ठ, गौतम व विश्वामित्र यांच्या वचनांची व्यवस्था कशी करावयाची हा प्रश्न बाकी राहतोच. तीं वचनें खालीं दिल्याप्रमाणें आहेत:—'उद्वाहिताऽपि सा कन्या न चेत् संप्राप्तमैथुना । पुन:संस्कारमर्हेत यथा कन्या तथैवसा ॥' नारद. 'वरश्चेत् कुलशीलाभ्यां न युज्येत कदाचन । न मंत्राः कारणं तत्र न च कन्यानृतंभवेत् ॥ समाच्छिद्य तु तां कन्यां बलादक्षतयोनिकाम् । पुनर्गुणवते दद्यात् ॥' शातातप 'मरणानंतरं भर्तुर्येद्यनाहतयोनयः । स्त्रियोविवाहमर्हंति नात्र कार्या विचारणा ॥' गौतम. 'अस्पृष्टलिंगयोनीनामात्रिंशतिवयस्त्रियां । पुनर्विवाहः कर्तव्यः चतुर्षु च युगेषु च ॥' विश्वामित्र. 'पाणिग्राहे मृते बाला केवलं मन्त्रसंस्कृता । साचेदक्षतयोनिः स्यात् पुन:संस्कारमर्हति ॥' वशिष्ठ. या वचनांत 'संप्राप्तमैथुनत्व' ह्मणजे 'संभोग' ही पुनर्विवाहाला मर्यादा सांगितली आहे; आणि 'संभोग' व सप्तपदी' यांत अंतर आहे, असें बौधायनानें मानिलेलें असून, वरील वचनांत 'उद्वाहिताऽपि सा कन्या नचेत् संप्राप्तमैथुना' ह्मणजे 'कन्या जरी विवाहित' असली तरी जर ती 'संप्राप्तमैथुना नसेल' ह्मणून जें लिहिलें आहे, त्यावरूनही तें स्पष्ट होतें. तेव्हा वरील वचनें 'सप्तपदी' व 'संभोग' यांच्या मध्यंगत कालास लागतात, हें सांगावयास नको.

आतां हीं वचनें नियोगपर लावावीं, असें जर कोणी ह्मणेल, तर तें बिलकूल चालणार नाहीं. कारण ' संस्कारमर्हति ' ' यथा कन्या तथैव सा ' ' नच कन्याऽनृतं भवेत् ' वगैरे ज्या उक्ती वरील वचनांत आहेत त्यांच्याशीं या सूचनेचा विरोध येतो. कारण, नियोगाला संस्काराची आवश्यकता नाहीं, आणि कन्यानृताच्या भीतीचें निरसन करण्याचेंही कारण नाहीं. तसेंच ' यथा कन्या तथैव सा ' ह्या वाक्यानें ती पुनर्दान करण्यास योग्य होते. कारण, मनूनें ' कन्या देया न तु अकन्या ' असें सांगितलें आहे. व नारदांनींहि अशा स्त्रीस कन्यात्व सांगून, मैथुनाची अपेक्षा केली आहे. ह्यावरून हीं वचनें सप्तपदी व संभोग ह्यांचे मध्यंगत कालास लागतात; हें निर्विवाद आहे. व असाच मेधातिथि आणि कुल्लूक भट्ट यांनींही ह्या वाक्यांचा अर्थ केला आहे. तेव्हां शेवटीं असें ठरतें कीं, जसा वचनबलानें बौधायन, याज्ञवल्क्य, नारद, वशिष्ठ व मनु यांच्या पुनर्भूविषयक वचनांचा धर्मसिंधूकारांनीं व इतरांनीं सप्तपदीपर्यंत संकोच केला आहे, तसा तो वचनबलानें संभोगापर्यंत केला पाहिजे. आणि हें एकदां पत्करिलें, म्हणजे संभोगापर्यंत स्त्रीचा सकारण पुनरुद्वाह झाला असतां, पुनर्भूत्वाच्या दोषास ती पात्र होत नाहीं.

आतां कांहींचें म्हणणें असें आहे कीं, पुनरुद्वाह वैध असेल, ह्मणजे विधिप्रमाणें झाला असेल, तर तो केव्हांही झाला असला, तथापि स्त्रीस पुनर्भूत्वाचा दोष प्राप्त होत नाहीं. ते ह्मणतात कीं, असा जो दोष येतो, तो पुनःसंबंध अवैध झाला असेल—म्हणजे विधिप्रमाणें झाला नसेल, तरच प्राप्त होतो, आणि याला ते खालील मनु, वशिष्ठ, ब्रम्हपुराण इत्यादि वचनांचा आधार दाखवितात. तीं वचनें:— ' या पत्या वा परित्यक्ता विधवा च स्वयेच्छया । उत्पादयेत् पुनर्भूत्वा स पौनर्भव उच्यते मनु. ' या क्लीबं पतितं उन्मतं वा भर्तारमुत्सृज्यान्यं पतिं विन्दते ' मृतेव सा पुनर्भूर्भवति ' वशिष्ठ. ( या वचनांत मृतेव हें पद चांगलें बसत नाहीं. असो. ) तसेंच ' मृते भर्तरि या नारी त्यक्तवत्यथ तं स्वयम् । सवर्णाचनयेद्गर्भं भर्तुःपौनर्भवं सुतम् ॥ यदि सा बालविधवा बलात्त्यक्ताऽथवा क्वचित् । तदा भूयस्तु संस्कार्या गृहीता येन केन चित्

ब्रह्मपुराण इ० त्यांचें ह्मणणें असें कीं, जेव्हां स्त्री, सकारण कां होईना, परंतु आपणच होऊन कामवासनेनें दुसऱ्याजवळ संबंध करिते, तेव्हां ती पुनर्भूत्वाच्या दोषास पात्र होते. परंतु जिचा संबंध दांडगाईचा नसून, संस्कारानें झाला आहे, ती पुनर्भूचे लक्षणांत मूळींच पडत नाहीं. परंतु हें त्यांचें ह्मणणें खालील नारद व याज्ञवल्क्य यांच्या वचनांशीं जुळत नाहीं. पुनर्भूत्वाचा दोष हा संस्काराचे अभावावर अगर सद्भावावर अवलंबून ठेवून चालत नाहीं, हें ' अक्षता वा क्षता वाऽपि पुनर्भूः संस्कृता पुनः ' या याज्ञवल्क्यांच्या वचनावरून व ' कन्यैवाक्षतयोनिर्या पाणिग्रहणदूषिता । पुनर्भूः प्रथमा प्रोक्ता पुनःसंस्कारमर्हति ॥' या नारदवचनावरून स्पष्ट होईल; कारण, यांत स्त्रीला संस्कृता असूनही पुनर्भूत्व सांगितलें आहे. तेव्हां वैधपुनर्विवाह केव्हांही झाला तरी पुनर्भूत्वाचा दोष त्यास लागत नाहीं, असें जर मानलें, तर हीं वचनें व्यर्थ होतील, व तसेंच बोधायनवचनही अगदीं व्यर्थ जाईल. स्त्री प्राप्तमैथुना असो अगर नसो, वैधपुनर्विवाहास पुनर्भूत्वाचा दोष कधींच लागत नाहीं, असें ह्मणणारांचे प्रतिपादनास दुसरी अशी एक नड आहे कीं, असंस्कृतत्व हेंच जर पुनर्भूचें अवश्य लक्षण मानिलें, तर पुनर्भू व स्वैरिणी यांमध्यें भेद मुळींच राहत नाहीं. परंतु तो याज्ञवल्क्य व नारद यांनीं केला आहे. व तसेंच मनूंनीं पौनर्भव, कुण्ड, गोलक, असे जे पुरुषांचे प्रकार केले आहेत, त्यांमध्यें भेदाचें कारण उरत नाहीं. जर स्त्री विवाहाची अपेक्षा न करितां अन्य पुरुषाशीं संबंध करील, तर त्या पुरुषाला जार ह्मटलें पाहिजे, व त्याची संतति जारज ह्मणजे कुण्ड अथवा गोलक होईल ( मनु—' अमृते जारजः कुण्डो मृते भर्तरि गोलकः ' ). परंतु पुनर्भूचीं अपत्यें जारजांत समाविष्ट होत नाहींत. तीं क्षेत्रजांत कदाचित् पडतील. तेव्हां अशा रीतीनें पुनर्भू शब्दाची व्याख्या केली ह्मणजे एक तर प्रत्यक्ष वचनविरोध येतो व दुसरें कांहीं स्मृतिवचनांचें स्वारस्य व सार्थकता जाते. हें इष्ट नाहीं, व असें प्रतिपादन तर सांगितलेल्या नारद, कात्यायन, वशिष्ठ, इत्यादिकांचे वचनांतील ' न चेत् संप्राप्तमैथुना ' वगैरे स्पष्ट सांगितलेल्या सीमेचें उल्लंघन करितें.

यासाठीं दोन्ही पक्षीं विचार पाहतां, सदोष पुनर्भूत्वाची मर्यादा संभोगापासून सुरू होते, असें ह्मणणें सयुक्तिक दिसतें; आणि ह्मणून जो-

पर्यंत स्त्री अक्षतयोनि आहे, तोंपर्यंत निर्दिष्ट आपत्ति प्राप्त झाली असतां, तिला पुनरुद्वाह करण्यास शास्त्रसंमति आहे, त्यापलीकडे मात्र नाहीं, असें शेवटीं ठरतें.

आतां, कांहीं ह्मणतात कीं, अक्षतयोनींचा अर्थ आसप्तपदीक करावाः ह्मणजे सप्तपदीपर्यंत स्त्री अक्षतयोनि असतेच, तेव्हां तेथपर्यंत आपत्ति प्राप्त झाली असतां, तिचा पुनरुद्वाह करितां येईल, असें मानावें. ह्मणजे 'तेषां निष्ठा तु विज्ञेया विद्वद्भिः सप्तमे पदे' असें जें मनुवचन आहे, त्याला बाध येणार नाहीं. परंतु तसा अर्थ करण्याची जरूरी दिसत नाहीं. विवाहमन्त्रांची निष्ठा सप्तपदीच्या ठिकाणीं होते, असें जें मनुवचन आहे, तें या प्रसंगीं मुळींच लागत नाहीं. कारण, सर्व मनुवचनांमध्यें, एकदां वाग्दान झालें ह्मणजे त्यानंतर पुनर्दानाचा संभव नाहीं, असा अर्थ असतां त्या वचनांना निषेधपक्षाकडील मंडळी जर फक्त दोषाभावें ह्मणजे पति दूषित अगर मृत झाला नाहीं, तर मान देतात, तर मग वरील 'तेषां निष्ठा तु विज्ञेया विद्वद्भिः सप्तमे पदे' या सप्तपदीच्या वचनालाही तोच नियम कां लावूं नये ? एका वचनाचा अर्थ करण्याला जो नियम लावावयाचा, तोच सर्व वचनांचा अर्थ करण्यासही लागू केला पाहिजे. वर सांगितलेल्या स्मृतिवचनावरून काढलेला सिद्धांत—ह्मणजे सप्तपदी झाल्यानंतर कारण उत्पन्न झाल्यास स्त्रीचा पुनर्विवाह विहित आहे—हा सिद्धांत निर्णयसिंधुकार कमलाकर भट्ट यांसही संमत आहे. वाग्दत्ता कन्या मन्त्रोपनीता नसतांना जर गतभर्तृका झाली, तर तिचे पित्यानें पुनर्दान करणें, हें सशास्त्र आहे, असें दाखवून, ते पुढें लिहितातः-यत्तु नारदः— 'उद्वाहितापि सा कन्या न चेत् संप्राप्तमैथुना । पुनःसंस्कारमर्हेत यथा कन्या तथैव सा ॥' इति । यच्च कात्यायनः, 'वरो यद्यन्यजातीयः पतितः क्लीब एव च । विकर्मस्थः सगोत्रो वा दासो दीर्घामयोपि वा । ऊढापि देया सान्यस्मै सहाभरणभूषणा ॥' इति । इदं कलौ निषिद्धं । देवरेण सुतोत्पत्तिः दत्ता कन्या न दीयते । इत्यादित्यपुराणे कलौ निषेधात् । दत्ता शब्द ऊढापरः । आतां वरील नारद आणि कात्यायन वचनांमधील ऊढा व उद्वाहिता या पदांचा अर्थ पूर्णदानपर ते करितात, हें स्पष्ट आहे. पूर्वीच वासिष्ठवचनांत पूर्णदानाच्या पूर्वीची गोष्ट सांगून पुढील वचनांत पूर्णदानानंतरची व्यवस्था ते घेतात, व ती कलिवर्ज्य आहे ह्मणून मात्र सांग-

तात. ह्यांच्या कांहीं शास्त्रीलोकांच्या मताप्रमाणें, ऊढा, उद्वाहिता या शब्दांचा अर्थ सप्तपदीच्या पूर्वी, असा जर कमलाकर भट्ट करिते, तर त्यांस नारदादिवचनांस कलिवर्ज्यांत टाकण्याचें कारण नव्हतें. तीं वचनें पूर्वीच्या वसिष्ठवचनाप्रमाणेंच पूर्णदानाच्या आधींच्या काळीं लागू घेतलीं, तर त्यांत कलिवर्ज्य असें कांहींच नाहीं. तशीं लग्नें आतांच्या काळींही सशास्त्र आहेत, असें सर्व मानीत आहेत. भट्टांनीं ऊढा पदाचा अर्थ सप्तपदीच्या आधीं असा न करितां उलटा कलिनिषेधांपैकीं दत्ता पदाचा अर्थ ऊढा असा केला आहे. यावरून भट्टांच्या मतें सप्तपदी झाल्यानें-तरही पूर्व युगीं कन्येचा पुनर्विवाह सशास्त्र होता, असें स्पष्ट होतें. ( पहा. निर्णय सिंधु, पत्र २६९, मुंबई आवृत्ति. )

ह्याप्रमाणें अप्राप्तसंभोगा स्त्रीला पुनर्भू दोषाचें अप्राप्तत्व सिद्ध झाल्यानें तिच्या अपत्यांस पौनर्भव दोष प्राप्त होत नाहीं, हें वेगळें सांगावयास नको. वाग्दत्तेचा, कारणामुळें, अन्यपतीशीं विवाह झाला असतां, तिचा पुत्र जर पौनर्भव मानिला जात नाहीं, तर ह्या वरील प्रकारच्या स्त्रीचाही पुत्र पौनर्भव होऊं नये, हें उघड आहे.

आतां कलिवर्ज्य धर्मप्रकरणामध्यें विधवाविवाहनिषेधक वचनें आहेत, त्यांचा विचार करणें आवश्यक आहे. तीं वचनें बहुतेक पौराणिक आहेत व पौराणिक वचनें याज्ञवल्क्यादींच्या मतानें स्मृतिवचनांपेक्षां दुर्बल आहेत. तेव्हां ' कलौ पाराशरः स्मृतः ' या वचनानें कलिप्रमाण जी पराशरस्मृति त्या स्मृतीप्रमाणें जर आपत्कालीं स्त्रीचा पुनर्विवाह विहित आहे, तर तिजला पुराणवचनांचा बाध येऊं नये. पराशरस्मृतीमध्यें अमुकच कालपर्यंत पुनर्विवाह विहित आहे, असें सांगितलें नाहीं, व त्या स्मृतीमध्यें पौनर्भव व पुनर्भू यांविषयीं उल्लेखही नाहीं. यास्तव कलियुगामध्यें पुनर्विवाहास-तो केव्हांही केला असतां, दोष नाहीं, असें मानिलें पाहिजे. बरें, दुसरें असें जरी म्हटलें कीं, पराशरवचन इतर स्मृतिवचनांच्या बलानें अक्षतयोनिपरच लावणें जरूर आहे, तरी निदान इतकें त्याजपासून निघतें कीं, त्या कालापर्यंत तरी कलियुगामध्यें पुनर्विवाहास बाध नाहीं. आतां पुराणवचनें हीं स्मृतिवचनांपेक्षां बलवत्तर आहेत, असें घेऊन चाललें, तरी

४ कलिवर्ज्यप्रकरण.

एकवाक्यतेच्या नियमानें त्यापासून जो अर्थ निघतो, तो पाहिला असतां, एकवाक्यतेच्या नियमानें अक्षतयोनि स्त्रीच्या पुनर्विवाहास बाध नाहीं, असें दिसून येतें. हीं कलिनिषेधक वचनें खालीं लिहिल्याप्रमाणें आहेतः— ‘ ऊढायाः पुनरुद्वाहं ज्येष्ठांशं गोवधं तथा । कलौ पंच न कुर्वीत भ्रातृजायां कमंडलुम् ’ ॥ हेमाद्रि. ‘ दत्तायाश्चैव कन्यायाः पुनर्दानं परस्य च ॥ बृहन्नारदीय पुराण. ‘ स्त्रीणां पुनर्विवाहस्तु देवरात्पुत्रसंततिः ॥ ब्रह्मपुराण. ‘ देवरेण सुतोत्पत्ति र्दत्ता कन्या न दीयते ’ आणि ‘ बालायाः क्षतयोन्यास्तु वरेणान्येन संस्कृतिः ॥ ’ आदित्यपुराण. या वचनांतील ‘ दत्ता ’ या पदाचा अर्थ जसा सरळ दिसतो, तसाच करावयाचा म्हटला म्हणजे एकदां कन्या दत्ता झाली कीं तिचा पुनर्विवाह मुळींच करितां येत नाहीं, असें कबूल केलें पाहिजे. परंतु हा अर्थ चुकीचा आहे, कारण तो रूढीच्या विरुद्ध असून, त्यानें वरील वचनांची एकवाक्यता राहत नाहीं. यासाठीं ‘ दत्ता ’ या पदाचा अर्थ केवळ ‘ दिलेली ’ असा न करितां, तो कमलाकर भट्ट करितात त्याप्रमाणें ‘ ऊढा ’ म्हणजे ‘ विवाहिता ’ असाच केला पाहिजे. तसेंच वरील वचनांतील हेमाद्रि व बृहन्नारदीय पुराणांतील वाक्यें हीं साधारण नियामक समजून, आदित्यपुराणांतील वाक्यें हीं विशेषनियामक धरिलीं पाहिजेत. कारण, तसें न मानल्यास त्या वाक्यांना स्थळ राहत नाहीं. यासाठीं निर्दिष्ट वचनांवरून आदित्यपुराणांतील उक्तीप्रमाणें, क्षतयोनीचा पुनर्विवाह कलियुगांत वर्ज्य आहे, परंतु अक्षतयोनीचा शास्त्रसंमतच आहे, असें मानणें जरूर आहे.

ही कलिवर्ज्य धर्मसंबंधीं विचारसरणि ध्यानांत आणिली असतां, एक शंका उत्पन्न होते ती अशीः—जर प्राप्तसंभोगा स्त्रीचा पुनर्विवाह कलीमध्यें निषिद्ध आहे, तर अशा स्त्रीचा पुनर्विवाह अन्ययुगीं संमत होता, असें ध्वनित होतें. व माझ्या आतांपर्यंत केलेल्या प्रतिपादनावरून हा विवाह पूर्व युगींही सशास्त्र नव्हता, असें सिद्ध झालेलें आहे. तेव्हां ह्या दोन गोष्टी परस्परविरोधी होतात. व त्यांतील एकीची सत्यता कबूल केली, तर दुसरी असत्य ठरते. अनियत विधवाविवाह प्रथम संमत होता, असें म्हटलें म्हणजे पुराणगत वाक्यांचें समर्थन होतें. पण तो असंमत

होता असें ठरविलेलें वायां जातें. बरें, विधवाविवाह अक्षतयोनि स्त्रीचाच पूर्व कालीं संमत होता, असें ह्मटलें तर पुराणांतील वचनांचा विचार नीटसा जुळत नाहीं. ही स्थिति टाळण्यास एक मार्ग आहे. तो हा कीं, कलिवर्ज्य ह्मणून ज्या गोष्टी सांगितल्या आहेत, त्या युगांतरीं तशाच होत्या, असें न समजणें. अमुक अमुक कामें कलीमध्यें करूं नयेत, असें सांगितल्यानें तीं कर्मे अवश्यमेव कलीच्या अगोदरच्या युगांत केलीं जातच असत, असें मानण्यास आधार नाहीं. शिवाय, अन्ययुगीं जी गोष्ट रूढ नव्हती, तीच गोष्ट कलीमध्यें करूं नये, असें सांगितल्याचें आपणांस आढळतें. उदाहरणार्थ, ब्रह्मपुराण—' स्त्रीणां पुनर्विवाहस्तु देवरात्पुत्रसंततिः। स्वातंत्र्यं न कलियुगे...॥' यांत स्त्रीस्वातंत्र्य कलींत नसावें ह्मणून सांगितलें, पण पूर्वीही नव्हतें. असें आपणांस पक्कें माहित आहे, कारण 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' वगैरे अनेक वाक्यें त्यासंबंधानें आपल्यास स्मृतींतून आढळतात. ह्या दृष्टीनें पाहिलें असतां, प्राप्तसंभोगा स्त्रीचा पुनर्विवाह कलिवर्ज्यांत घातलेला आहे, ह्मणून तो पूर्वकालीं विहित होता, असें मानण्याची जरूरी नाहीं.

बरें, यद्यकदाचित् हा पुनर्विवाह वर्ज्य असें ह्मणून चाललें, तरी ज्याप्रमाणें, संन्यासग्रहण कलिवर्ज्य असतां, आचार्यांनीं तें स्थापित केलें, त्या प्रमाणें असा पुनर्विवाह आचार्यांना संमत वाटल्यास स्थापित करितां येईल. संन्यासग्रहणाच्या उक्ततेप्रमाणेंच अप्राप्तमैथुना स्त्रीच्या पुनर्विवाहाची उक्तता श्रीस स्मृतींत सांपडणारी आहे; व जर अशा स्त्रियांस पुनर्विवाहाची मोकळीक असणें, ही गोष्ट समाजास इष्ट आहे, व प्रत्येक मनुष्यास त्यांचे शोचनीय स्थितीची कळकळ येऊन दुःख होतें, तर ती मोकळीक हल्लींचे धर्माधिकारी आचार्य व विद्वान् शास्त्रीमंडळ यांनीं द्यावी, हें योग्य आहे.

उपसंहार.

वरील मजकुरावरून असा सिद्धांत ठरतो कीं, शास्त्ररीत्या स्त्री जेथपर्यंत अक्षतयोयोनि-ह्मणजे अप्राप्तमैथुना आहे-तेथपर्यंत तिचा, शास्त्रनिर्दिष्ट कारणें उपस्थित झालीं असतां, ह्मणजे पति नष्ट अगर मृत अगर पतित अगर क्लीब झाला असतां, पुनर्विवाह उक्त आहे, व तसा झाला असतां, त्या स्त्रीस कांहीं दोष लागत नाहीं. इतर

१९१५३ ३०

स्त्रियांप्रमाणेंच ती राहते, व तिची प्रजा इतर ज्या स्त्रियांचें एकदांच दान झालें आहे, त्यांचे प्रजेप्रमाणेंच निर्दोषी असते. हा सिद्धांत, पुणें मुक्कामीं वादामध्यें विष्णुशास्त्रिप्रभृति मंडळीनें जो पक्ष उचलिला होता तो, व त्याविरुद्ध निषेधवादी शास्त्री यांनीं जें प्रतिपादन केलें तें, या दोहोंशींही मिळत नाहीं. वरील सिद्धांत हा त्या दोघांच्या प्रतिपादनाचा मध्यवर्ती आहे, हें वरील लेखावरून दिसून आलें असेलच.

हा विषय बराच विस्तृत आहे, तेव्हां त्याचें लहानशा निबंधामध्यें संपूर्ण विवेचन करणें अशक्य आहे. तथापि जितकें करवेल तितकें करून शास्त्रसिद्धांत थोडक्यांत सांगितला आहे. विनंति इतकीच आहे कीं, प्रत्येकानें ह्याचें निरभिमानपणानें मनन करून आपली खात्री करून घ्यावी, व वर लिहिलेला सिद्धांत खरा वाटत असल्यास तो अमलांत आणण्यास झटावें. प्रस्तुत विषय ' पुनर्विवाहाविषयीं शास्त्रार्थ ' हा आहे, यास्तव ह्यांत दुसऱ्या विचारांस स्थान दिलें नाहीं.

कित्येक लोकांस हा निघालेला सिद्धांत अप्रिय होईल हें खरें. परंतु जें ह्मणून खरें आहे तें प्रिय असो किंवा अप्रिय असो, प्रत्येक प्रांजलबुद्धीचा मनुष्य ग्रहण करील, अशी उमेद आहे. हा निबंध लिहिण्यांत केवळ सत्यान्वेषण हाच उद्देश आहे, यास्तव हाच सिद्धांत ठरला पाहिजे, असा आग्रह नाहीं. परंतु वरील प्रतिपादनावरून हाच सिद्धांत जर खरा ठरत आहे, तर कित्येकांस अप्रिय होईल ह्मणून त्याच्या उपपादनाच्या संबंधानें भीरुता अंगीकारणें प्रशस्त होणार नाहीं. आतां, जर हा सिद्धांत कित्येकांस मनापासून सकारण चुकीचा वाटत असेल, तर त्यांस एवढीच विनंति आहे कीं, केवळ उपहास न करितां, त्यांनीं लेखनद्वारा आपलीं कारणें प्रगट करावीं, व अशा रीतीनें वादे वादे तत्वबोधाचा उदय होइल, असें करावें.

समाप्त.

REFBK-0019153